



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार ८ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४





## हत्येच्या आरोपातून बाबा राम रहीमची निर्दोष मुक्तता

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पत्रकार रामचंद्र छत्रपती यांच्या हत्येच्या आरोपात जन्मठेपीची शिक्षा भोगत असलेले गुरमित राम रहीम यांना पंजाब हरियाणा हायकोर्टाने निर्दोष मुक्त केले आहे. तर, तीन आरोपी कुलदीप सिंह, निर्मल सिंह, कृष्ण लाल यांची जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली आहे.१७ जानेवारी २०१९ मध्ये डेरा सच्चा सौदाचे प्रमुख बाबा राम रहीम यांना दोषी ठरवून सीबीआयच्या विशेष न्यायालयाने त्यांना सात वर्षांची शिक्षा सुनावली होती. आरोपींनी याविरोधात हाय कोर्टात धाव घेतली होती. आज झालेल्या सुनावणीमध्ये हायकोर्टाने राम रहीम यांच्या विरोधात ठोस पुरावे नसल्याचे सांगत त्यांनी निर्दोष मुक्तता केली. दरम्यान, याविरोधात सीबीआयने सुप्रीम कोर्टात दाद मागितली आहे.दरम्यान, हत्येच्या आरोपातून राम रहीम यांची सुटका झाली असली तरी साध्वींच्या यौन शोषणाच्या आरोपात त्यांना १० वर्षांची शिक्षा झाली आहे. त्यामुळे त्यांना अजूनही तुरुंगातच राहावे लागणार आहे. पत्रकार रामचंद्र छत्रपती यांनी बाबा राम रहीम आणि त्यांच्या डेरा सच्चाबाबत काही बातम्या आपल्या वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केल्या होत्या, त्यानंतर २०२२ मध्ये गोळी मारून त्यांची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणाचा तपास सीबीआय करत होती. या प्रकरणाचे धागेदोरे बाबा राम रहीम प्रमुख आरोपी असल्याचे सांगत सीबीआयकडून त्यांना अटक करण्यात आली होती. सीबीआयच्या विशेष न्यायालयाने त्यांना शिक्षा देखील सुनावली होती.






## 130 नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

### ■ नक्षल चळवळीला मोठा हादरा! ■ बड्या नेत्यांचा समावेश

**गडचिरोली /प्रतिनिधी :** देशातील नक्षलवाद पूर्णपणे मोडीत काढण्यासाठी केंद्र सरकारने ३१ मार्च २०२६ ची डेडलाइन निश्चित केली असतानाच, तेलंगणाची राजधानी हैदराबादमध्ये नक्षली चळवळीला मोठा हादरा बसला आहे. शनिवारी एका विशेष कार्यक्रमात प्रतिबंधित नक्षलवादी संघटनेच्या १३० नक्षलवाद्यांनी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यासमोर शस्त्रे खाली ठेवून आत्मसमर्पण केले. यामध्ये अनेक बड्या नेत्यांचा समावेश असून, मोठ्या प्रमाणात अत्याधुनिक शस्त्रास्त्रेही पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. काही दिवसांपूर्वी सर्वोच्च नेता पॉलीट ब्युरो सदस्य देवजी, केंद्रीय समिती सदस्य संग्राम याच्यासह चार नेत्यांनी आत्मसमर्पण केले होते.



**नक्षलवाद संपवण्याचे उद्दिष्ट-**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे समाप्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांची वाढती कारवाई आणि सरकारच्या प्रभावी पुनर्वसन धोरणामुळे नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडल्याचे चित्र दिसत आहे. एका बाजूला अनेक भागांत चकमकींमध्ये नक्षलवादी मारले जात असताना, दुसरीकडे मोठ्या संख्येने नक्षलवादी मुख्य प्रवाहात परतत आहेत. या सामूहिक आत्मसमर्पणाला नक्षलविरोधी मोहिमेतील ऐतिहासिक यश मानले जात आहे.

**१२५ नक्षलवादी छत्तीसगडमधील-** आत्मसमर्पण करणा-या १३० जणांपैकी १२५ नक्षलवादी छत्तीसगडमधील आहेत, तर ४ तेलंगणा आणि १ आंध्र प्रदेशचा आहे. यामध्ये संघटनेच्या धोरण निश्चितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारे ३ राज्य समिती सदस्य, १० विभागीय समिती सदस्य, ४६ एरिया कमिटी सदस्य आणि ७६ दलम सदस्यांचा समावेश आहे. आत्मसमर्पणावेळी नक्षलवाद्यांनी ३१ ए.के.-४७ रायफल्स, २१ इन्सास रायफल्स, २० एसएलआर रायफल्स आणि एक इन्सास एलएमजी रायफल यांसह मोठ्या प्रमाणात दारूगोळा प्रशासनाकडे सुपूर्द केला. या प्रसंगी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी आत्मसमर्पण करणा-यांचे स्वागत केले. महात्मा गांधींच्या या देशात हिंसक (पान २ वर)

## पुढचे दोन दिवस राज्यात उष्णतेचा हाय अलर्ट



### कमाल तापमान चाळीशी गाठणार

**नागपूर/प्रतिनिधी :** राज्यात आता प्रचंड उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. कमाल तापमानाचा पारा ३६ अंश सेल्सिअस पार करून चाळीशी गाठतानाचे चित्र आहे. दरम्यान हवामान विभागाने पुढील दोन दिवस राज्यभर उष्णतेचे अलर्ट दिले आहेत. मुंबई, पालघर, ठाणे, रायगड या जिल्ह्यांना उष्ण व आर्द्र हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. पुढील दोन दिवस राज्यभरात कमाल तापमानात वाढ होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. विदर्भात पुढील दोन दिवसांत पारा तापणार असून तीन जिल्ह्यांना उन्हाचा तडाखा बसणार आहे. (पान २ वर)

### अमरावतीत सर्वाधिक तापमान

**आज सर्वाधिक तापमानाची नोंद अमरावती जिल्ह्यात झाली. ४०.८ अंश सेल्सिअस तापमान अमरावतीत नोंदवले गेले. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातील तापमान हे ३६ ते ३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. प्रादेशिक हवामान खात्याने विदर्भात पुढील दोन दिवस तापमानाचा हाय अलर्ट दिला आहे. अकोला, अमरावती आणि वर्ध्यात पुढील दोन दिवस पारा चाळीशी पार जाण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. वर्धा, अकोला आणि अमरावतीला पुढील दोन दिवसांसाठी उन्हाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. या जिल्ह्यात तापमान सामान्यपेक्षा ५ अंश सेल्सिअसने जास्त राहील. तर विदर्भातील इतर जिल्ह्यांत तापमान सामान्यपेक्षा २ ते ३ अंश सेल्सिअस जास्त राहणार असल्याची माहितीही देण्यात आली आहे . पुढील दोन दिवस विदर्भातील उर्वरित जिल्ह्यांचे तापमान ३८ ते ४० अंश राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.**

## देशातील हॉटेल, रेस्टॉरंट इंडस्ट्री ठप्प?

## घरगुती सिलिंडरचे दर 60 रुपयांनी वाढले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडर ६० रुपयांनी महाग केले आहे. दिल्लीत १४.२ किलोचा ख्क्र गॅस आता ९१३ रुपयांना मिळेल. आधी तो ८५३ रुपयांना मिळत होता. तर, १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरमध्ये ११५ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तो आता १८८३ रुपयांना मिळेल. वाढलेल्या किमती ७ मार्चपासून लागू होतील.अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्धामुळे देशात गॅस तुटवड्याची शक्यता वर्तवली जात असतानाच सरकारने गॅसच्या दरात वाढ केली आहे. या परिस्थितीचा विचार करून, सरकारने आपत्कालीन अधिकारांचा वापर करत देशातील सर्व तेल रिफायनरी कंपन्यांना एलपीजी उत्पादन वाढवण्याचे आदेश दिले आहेत. मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम होउ शकतो. हा धोका लक्षात घेउन सरकारने हे आदेश जारी केले आहेत. यात म्हटले आहे की, आता रिफायनरीज प्रोपेन आणि ब्युटेनचा वापर केवळ स्वयंपाकाचा गॅस बनवण्यासाठी करतील. इराण-इस्रायल संघर्षाचे पडसाद आता भारतातही उमटू लागले असून त्याचा थेट परिणाम एलपीजी पुरवठ्यावर होताना दिसत आहे. केंद्र सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता थांबवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे देशभरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि फूड इंडस्ट्रीसमोर मोठे संकट निर्माण झाले असून पुढील काही दिवसांत हा उद्योग (पान २ वर)



### नेपाळ निवडणुकीत मोठा उलटफेर!

## बालेन शाह यांनी माजी पंतप्रधान केपी ओली यांचा केला पराभव

**काठमांडू/वृत्तसंस्था :** नेपाळमधील निवडणुकीत मोठा उलटफेर झाल्याचे पाहालायला मिळत आहे. आरएसपी नेते आणि रॅपरमधून राजकारणी बनलेले बालेन शाह यांनी नेपाळच्या झापा-५ मतदारसंघात चार वेळा पंतप्रधान राहिलेले के.पी. शर्मा ओली यांचा सुमारे ५०,००० मतांनी पराभव केला. राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे नेते आणि काठमांडूचे माजी महापौर, ज्यांना फक्त बालेन म्हणून ओळखले जाते, ते त्यांच्या पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार आहेत.



निवडणूक आयोगाने सांगितले की, ३५ वर्षीय बालेन यांना ६८,३४८ मते मिळाली, तर ७४ वर्षीय ओली यांना १८,७३४ मते मिळाली. कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळने ओली यांना पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून उभे केले होते. गेल्या वर्षी नेपाळमध्ये झालेल्या हिंसक 'जनरल झेड' निदर्शनांनंतर गुरुवारी झालेली सार्वत्रिक निवडणूक ही पहिलीच होती, यात राजकारणात पिढीजात बदल आणि हिमालयीन देशात भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाची मागणी करण्यात आली होती. बालेन शाह यांच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाला नेपाळमध्ये प्रचंड विजय मिळण्याची शक्यता आहे. शाह यांनी झापा-५ जागेवर ओली यांना आव्हान दिले आणि त्यांचा निर्णय योग्य असल्याचे सिद्ध केले. या जागेवर एकूण १०६,३७२ मते पडली. देशभरात आरएसपीच्या बाजूने जोरदार लाट असूनही, माजी पंतप्रधान (पान २ वर)

## मणिपूरमध्ये आदिवासींवर अत्याचार होताना गप्प का होता?

### ममतादीदींचा राष्ट्रपतींवर पलटवार



**कोलकाता/वृत्तसंस्था :** नवव्या आंतरराष्ट्रीय संथाल परिषदेत सहभागी होण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये आलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी लहान जागेबद्दल नाराजी व्यक्त केली. प्रस्थापित प्रोटोकॉलनुसार मुख्यमंत्री किंवा राज्य सरकारचा कोणताही मंत्री त्यांचे स्वागत करण्यासाठी उपस्थित नव्हता, याबद्दलही त्यांनी दुःख व्यक्त केले. यावर कोणताही वैयक्तिक्र आक्षेप नाही, परंतु देशाच्या राष्ट्रपतींसाठी निर्धारित प्रोटोकॉलचे पालन केले पाहिजे, अशी अपेक्षा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली होती. यावर आता मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी जोरदार पलटवार केला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, परिषदेसाठी निवडलेले ठिकाण खूप लहान होते, त्यामुळे मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहू शकले नाहीत. या ठिकाणी पाच हजार लोकांसाठी पुरेशी जागाही नव्हती. ममता बॅनर्जी मला लहान बहिणीसारख्या आहेत, ममता बॅनर्जी माझ्यावर नाराज आहेत, असे मला वाटत नाही. परंतु तरीही इतके लहान ठिकाण का देण्यात आले, हे समजत नाही. यातून असे दिसून येते की, कार्यक्रमाला उपस्थित राहावे आणि नंतर निघून जावे, असा त्यांचा हेतू होता. बिधाननगर मैदान मोठे आहे. या मोठ्या मैदानात आंतरराष्ट्रीय संथाल परिषद झाली असती तर सुमारे पाच लाख लोक उपस्थित राहू शकले असते. एवढे मोठे मैदान उपलब्ध असताना परिषदेसाठी एवढी लहान जागा का निवडली गेली, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावरून ममता बॅनर्जी यांनी प्रत्युत्तर दिले.मी राष्ट्रपतींचा आदर करते, पण जर कोणी ५० वेळा भेट दिली तर प्रत्येक कार्यक्रमाला उपस्थित राहणे शक्य नाही. मी सध्या आंदोलन करत आहे. तसेच राष्ट्रपती सांगत आहेत, त्या कार्यक्रमाबाबत मला काहीच माहिती नाही. राज्य सरकारला या कार्यक्रमाच्या आयोजकांबद्दल, (पान २ वर)

## माध्यमांनी भीती दाखवू नये; हे देशहिताचे नाही-फडणवीस

**नागपूर/प्रतिनिधी :** इराण-अमेरिका-इस्रायल संघर्षामुळे भारताच्या इंधन आयातीवर मोठा परिणाम होत आहे. गॅस टंचाई टाळण्यासाठी केंद्र सरकारने उपाययोजना सुरू केल्या आहेत. माध्यमांनी भीती निर्माण करू नये, ते देशहीत व समाजहिताचे नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात प्रसार माध्यमासोबत बोलताना नमूद केले.

ते म्हणाले, केंद्र सरकार योग्यरित्या व गांभीर्याने गॅस उपलब्धतेचा विषय हाताळत आहे. नागरिकांमध्ये विनाकारण भीतीचे वातावरण तयार करू नये, असे आवाहन त्यांनी माध्यमाना केले. इराण-अमेरिका-इस्त्रायल संघर्षामुळे भारताच्या इंधन आयातीवर मोठा परिणाम होत आहे. गॅस टंचाई टाळण्यासाठी केंद्र सरकारने उपाययोजना सुरू केल्या आहेत. ज्यामुळे घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत होणार नाही. सरकारी तेल कंपन्यांना घरगुती एलपीजी उत्पादन वाढवण्यास सांगण्यात आले आहे. काही ठिकाणी व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवू शकतो. सध्या देशात गॅसचा साठा पुरेसा आहे, घाबरून जाण्याचे कारण नाही, मात्र खबरदारी म्हणून उपाययोजना केल्या जात असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. त्यानंतरही गॅसच्या तुटवड्याचा येत बातम्या आहेत. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांनी भीती निर्माण करू नये असे आवाहन केले. यावेळी त्यांनी राज्याला अर्थसंकल्पातून भरभरून मिळाले असून विदर्भही राज्याचा भाग असल्याने विदर्भालाही भरपूर मिळाले आहे, असे सांगितले.



**कर्जमाफीसाठी समिती-** राज्यातील शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी समिती स्थापन केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतक-यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्ज माफी योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेनुसार आता ज्या शेतक-यांचे दोन लाखांपर्यंत कर्ज थकीत आहे, त्यांना आता कर्जमाफी मिळणार आहे. एवढेच नाही तर जे शेतकरी कर्ज घेउन नियमित परतफेड करतात अशा पात्र शेतक-यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्यात येईल अशी घोषणाही या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. बँकिंग यंत्रणा सक्षम असावी, यासाठी समितीच्या शिफारशीनुसार निर्णय घेउ. समितीच्या शिफारशीनुसार दीर्घकालीन योजना करण्यात येणार आहेत. समितीच्या शिफारशी आणि निकषानुसार कर्जमुक्त करण्यासाठी दीर्घकालीन योजना केल्या जातील, अशी घोषणाही देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.गेल्या काही दिवसांपासून शेतक-यांच्या कर्जमाफीचा मुद्दा चांगलाच तापला होता. शेतक-यांना कर्जमाफी मिळावी अशी मागणी विरोधकांकडून सुरू होती. शेतक-यांना कर्जमाफी मिळावी यासाठी नागपुरात प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वात शेतक-यांनी मोठे आंदोलन देखील केले होते. त्यावेळी सरकारकडून शेतक-यांना कर्जमाफी देउ असा शब्द देण्यात आला होता. अखेर आता याबाबत सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्ज माफी योजना जाहीर केली आहे.




## शेजारील राष्ट्रांवरील हल्ले थांबवणार; इराणची घोषणा

**तेहरान/वृत्तसंस्था :** अमेरिका-इस्त्रायलच्या संयुक्त हल्ल्यांनंतर संतापलेल्या इराणने शेजारील राष्ट्रांवरही हल्ले केले होते. परंतु आता शेजारील राष्ट्रांवर हल्ले करणार नाही असे इराणच्या राष्ट्रपतींनी म्हटले आहे; परंतु त्यासाठी




एक अटही ठेवली आहे. जोवर शेजारील राष्ट्रांच्या भूमीचा वापर आमच्यावरील हल्ल्यासाठी केला जात नाही तोपर्यंत आम्हीही या राष्ट्रांवर हल्ला करणार नाही. इराणच्या अंतरिम लीडरशीप कॉन्सिलने याला मंजुरी दिली आहे. त्यामुळे मध्य पूर्वेतील आखाती देशांमधील तणाव कमी होण्याची शक्यता आहे. राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्या हवाल्याने इराणी माध्यमांनी बातमी दिली आहे. त्यानुसार, राष्ट्रपतींनी मागील काही दिवसांपासून शेजारील राष्ट्रांवर केलेल्या हल्ल्याची माफीही मागितली आहे. (पान २ वर)

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीने खळबळ

### इराणवर सर्वात मोठा हल्ला होऊ शकतो

**वाशिंग्टन/वृत्तसंस्था :** अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्ध आणखी भडकण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. अमेरिका-इस्त्रायलने संयुक्तप्रणे इराणवर केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर इराणनेही अमेरिका-इस्त्रायलला जोरदार प्रत्युत्तर दिलं. तसेच इराणने काही आखाती देशांवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आज इराणच्या अध्यक्षांनी आखाती राष्ट्रांची माफी देखील मागितली. मात्र, त्यानंतरही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा धमकी दिल्यामुळे जगात खळबळ उडाली आहे.आज इराणवर आणखी मोठा हल्ला केला जाउ शकतो, असं वक्तव्य डोनाल्ड ट्रम्प यांनी केलं आहे. याबाबत ट्रम्प यांनी ट्रु थ सोशलवर पोस्ट करत इराणवर पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे. दरम्यान, ट्रम्प यांच्या या धमकीमुळे अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. इराणने मध्यपूर्वेतील शेजारी राष्ट्रांची माफी मागितली आणि शरणागती पत्करली आहे. तसंच इराणने वचन दिलं की ते आता त्यांच्यावर (आखाती देशांवर) गोळीबार करणार नाहीत. इराणने हे आश्वासन फक्त आणि फक्त अमेरिका, इस्त्रायलच्या हल्ल्यामुळेच दिलं. अन्यथा ते मध्यपूर्वेवर ताबा मिळवून राज्य करू इच्छित होते. मागच्या हजारो वर्षांत पहिल्यांदा इराणला त्याच्या शेजारील मध्य पूर्वेकडील देशांकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे मध्य पूर्वेकडील काही राष्ट्रांनी मला धन्यवाद अध्यक्षही म्हटलं, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.



इराण आता मध्य पूर्वेचा दादा राहिलेला नाही तर मध्य पूर्वेतील पराभूत राष्ट्र बनलं आहे, तसेच इराण शरण येईपर्यंत अनेक दशकं असंच पराभूत राष्ट्र राहील किंवा पूर्णपणे कोसळेल. मात्र, आज इराणवर मोठा हल्ला होउ शकतो. इराणच्या वाईट वर्तनामुळे ज्या क्षेत्रांना आणि लोकसंख्येला आतापर्यंत लक्ष्य मानलं जात नव्हतं, त्यांनाही धोका निर्माण झाला आहे, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं. इराणने शेजारी असलेल्या मुस्लीम राष्ट्रांची माफी मागत क्षेपणास्त्र हल्ले थांबवत (पान २ वर)

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# वडिलांवर मुलाने केला प्राणघातक हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** वडिलांनी मुलाला दिलेल्या पैसे परत मागितले. यामुळे रागवलेल्या मुलाने आपल्या दोन मित्रा सह मिळून वडिलांवर हॉकी स्टिक, पाईप आणि तलवारीने हल्ला केल्याची घटना नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या उस्मान नगर जवळील मेहबूब नगर येथे समोर आली आहे. मेहबूब खान महमूद खान (वय ५७) असे हल्ल्यात जखमी झालेल्या वडिलांचे नाव आहे.तर अरबाज खान मेहबूब खान आरोपी मुलगा आहे. माहिती नुसार जखमी महबूब खान महमूद खान यांनी काही दिवसापूर्वी आरोपी मुलगा अरबाज खान ला घर बनवण्यासाठी ४५ हजार रुपये दिले होते. पैसे दिल्यानंतर आरोपीने घर बनवण्याच्या जागी घरच विकून टाकले. यामुळे मेहबूब खान यांनी आपले ४५ हजार रुपये मुलाला परत मागितले. यामुळे आरोपी त्यांच्यावर चिडला आणि त्याने आपल्या दोन मित्रासह मिळून वडिलांवर हॉकी स्टिक, लोहेचे पाईप आणि तलवारीने हल्ला केला. हल्ल्यात मेहबूब खान जखमी झाले. घटनेनंतर आरोपी तेथून पळाले. नागरिकांनी त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणात नागपुरी गेट पोलिसांनी आरोपींविरुद्ध कलम ११८(२),३(५) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. तिन्ही आरोपींचा शोध पोलीस घेत आहे.

## शेंडगावमध्ये गाडगेबाबा स्मारकाचे भूमिपूजन आज

# श्रीधर नाईक यांनी स्मारकाकरिता दिली पाच एकर शेती

**अमरावती/प्रतिनिधीः-** निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबा स्मारक समिती विश्वस्त संस्थेच्यावतीने अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेंडगाव मध्ये संत गाडगेबाबा स्मारकाचे भूमिपूजन आज रविवार ८ मार्च रोजी हभप संजय महाराज पाचपोर , जनार्दन पंत बोथे गुरुजी, अविनाश महाराज वानखडे, हभप वासुदेवराव महाराज महल्ले यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती शनिवारी पत्रकार परिषदेमध्ये भाजपा नेता सुनील खराटे यांनी दिली.

त्यांनी सांगितले की गाडगे महाराज यांच्या जन्म गावी त्यांचे स्मारक अपेक्षित आहे. गावातील गटा तटातील राजकारणामुळे व शासकीय उदासीनतेमुळे स्मारक होऊ न शकल्याने संजय महाराज पाचपोर यांच्या प्रेरणेने गावातील नागरिक श्रीधर नाईक यांनी स्मारकाकरिता स्वतःची पाच एकर शेती व सोबत टप्प्याटप्प्याने ५५ लक्ष रुपये दान देण्याची घोषणा केली आहे. तसेच त्यांचे मित्र प्रदीप मलिये यांनी १ लाख विटा देण्याचे कबूल केले आहे. बाकी उर्वरित कार्य संजय महाराज पाचपोर यांच्या मदतीने भव्य असे दगडी स्मारक, गुरुकुल, गौशाला व वृद्धाश्रम प्रकल्पांतर्गत होणार आहे. भूमिपूजन सोहळा रविवारी सकाळी ९ वाजता शेंडगाव लगत श्रीधर नाईक यांच्या शेतात होणार आहे.



मुख्य अतिथी म्हणून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार बळवंत वानखडे,डॉ.अनिल बोंडे, माजी खासदार आनंदराव अडसूळ, नवनीत राणा, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, एसपी विशाल आनंद, एएसपी पंकज कुमार, आमदार गजानन लवटे, प्रवीण तायडे, प्रकाश भारसाकळे, हरीश पिंपळे, प्रवीण पोटे, राजेश वानखडे यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. पूजन सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये सुनील खराटे यांच्या सोबत श्रीधर नाईक, प्रदीप मलिये, प्रा. विनोद बिजवे, राजेंद्र गायगोले, हभप ज्ञानेश्वर तिडके उपस्थित होते.

पान १ व १० वरून

## घरगुती सिलिंडरचे दर 60 रुपयांनी

ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीत केलेल्या नाकेबंदीमुळे मध्यपूर्वेतून येणा-या एलपीजी टँकरची वाहतूक विस्कळीत झाली आहे. भारतातील एलपीजीचा मोठा हिस्सा आयातीवर अवलंबून असल्याने या परिस्थितीचा थेट परिणाम देशातील गॅस पुरवठ्यावर होत आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना घरगुती गॅसचा तुटवडा भासू नये, यासाठी केंद्र सरकारने कमर्शियल एलपीजीचा पुरवठा थांबवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

**निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी**

या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम हाटेल आणि रेस्टारंट उद्योगावर होत आहे. नागपूर रेसिडेंट हाटेल असोसिएशनने या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. युद्धाच्या कठीण परिस्थितीत आम्ही केंद्र सरकारसोबत आहोत, मात्र एलपीजीवरील निर्बंध सरसकट न लावता टप्प्याटप्प्याने लागू करावेत, अशी संघटनेची भूमिका आहे.

**नागपुरात आर्थिक संकट?**

नागपूर रेसिडेंट हाटेल असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्य सुदर्शन वझलवार यांनी सांगितले की, कमर्शियल गॅसचा पुरवठा पूर्णपणे बंद राहिला तर पुढील चार ते पाच दिवसांत देशातील हॉटेल इंडस्ट्री बंद करण्याची वेळ येउ शकते. हजारो छोटे-मोठे हॉटेल व्यवसाय या गॅसवर अवलंबून असल्याने त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहू शकते, अशीही त्यांनी भीती व्यक्त केली.

**पुण्यातही व्यावसायिक गॅस पुरवठा बंद**

दरम्यान, पुण्यातही व्यावसायिक वापरासाठीचा गॅस पुरवठा बंद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. बीपीसीएलच्या शिक्रापूर प्लांटमध्ये आणि एचपीसीएलच्या चाकण येथील प्लांटमध्ये कमर्शियल सिलेंडरचा पुरवठा थांबवण्यात आला आहे. डीलर्सना पुढील आदेश मिळेपर्यंत कमर्शियल सिलेंडर घेण्यासाठी गाड्या पाठवू नयेत, अशा सूचना तेल कंपन्यांकडून देण्यात आल्या आहेत.

**राज्य सरकारने केंद्राशी बोलून मधला मार्ग काढावा**

तेल कंपन्यांनी डीलर्सना पाठवलेल्या संदेशात स्पष्ट म्हटले आहे की, युद्धजन्य परिस्थितीमुळे कमर्शियल वापराचा गॅस पुरवठा पुढील सूचनेपर्यंत थांबवण्यात येत आहे. कृपया सिलेंडर घेण्यासाठी गाड्या पाठवू नयेत. परिस्थिती सुधारल्यानंतर पुढील माहिती देण्यात येईल. दरम्यान, या गंभीर परिस्थितीत राज्य सरकारने केंद्र सरकारशी चर्चा करून हाटेल आणि रेस्टारंट उद्योगासाठी काही मधला मार्ग काढावा, अशी मागणीही उद्योग संघटनांकडून करण्यात येत आहे.

## 130 नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

आणि सशस्त्र मार्गाने कोणत्याही समस्येचे निराकरण होउ शकत नाही. भरकटलेल्यांनी आता लोकशाही आणि शांततेच्या मार्गावर परतावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांनी नक्षलवाद्यांना बुलेटचे राजकारण सोडून बॅलेटच्या राजकारणात सहभागी होण्याचे आवाहन केले. लोकशाहीत जनतेची सेवा आणि हक्कांची लढाई लढण्याचे निवडणूक हेच सर्वात मोठे माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

**गणपतीने मुख्य प्रवाहात यावे-** नक्षलवादी संघटनेचा सर्वोच्च नेता गणपती यानेही हिंसेचा मार्ग सोडावा, सरकार त्याला पूर्ण सुरक्षा आणि सन्मानजनक पुनर्वसन देईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. राज्य सरकार आत्मसमर्पण करणा-यांना रोजगार, शिक्षण आणि सुरक्षेसह सर्वतोपरी मदत करेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. गेल्या काही वर्षांत नक्षलग्रस्त भागात झालेली विकासकामे, रस्ते आणि आरोग्य सुविधांमुळे नक्षलवाद्यांचा जनाधार घटत चालल्याचे या मोठ्या शरणागतीवरू न स्पष्ट होत आहे.

## पुढचे दोन दिवस राज्यात

पुढील दोन दिवसांत राज्यातील कमाल तापमान दोन ते तीन अंशांनी वाढणार आहे. महिन्याच्या अखेरीस तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे जाईल असा अंदाज हवामानतज्ज्ञ एस. डी. सानप यांनी वर्तवला आहे.

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, महाराष्ट्र आणि गुजरात या दोन राज्यांमध्ये पुढील सात दिवस तापमानाचा पारा हा दोन ते तीन अंशांनी वाढण्याची शक्यता आहे. मुंबई-कोकण या किनारपट्टीच्या भागात ८ आणि ९ मार्च रोजी उष्ण आणि आर्द्र तापमानाची शक्यता आहे. तसा यलो अलर्ट हवामान खात्याने दिला आहे.

***पुण्यात उकाड्याने लाही लाही-*** पुण्यात आता चांगलाच उकाडा जाणवू लागला आहे. गेल्या दोन दिवसांपासून सरासरीपेक्षा दोन अंश जास्त तापमानाची नोंद झाली आहे . ३६ ते ३७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद पुणे शहरात होत आहे. येत्या काही दिवसांत तापमान वाढण्याची शक्यता आहे. या महिन्याच्या अखेरीस तापमान ४० अंशावर जाण्याची शक्यता आहे.

मराठवाड्याचा पारा वाढला

मराठवाड्यातही गेल्या चार दिवसांपासून तापमानात लक्षणीय वाढ दिसून आली आहे. बहुतांश ठिकाणी कमाल तापमानाचा पारा हा ३६ ते ३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचला आहे. आज परभणी जिल्ह्यात ३८.५ अंश सेल्सिअसची नोंद झाली. धाराशिवमध्ये ३६.२. छत्रपती संभाजीनगर ३७,७ बीड ३६.६, उद्गीर ३७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुढील दोन दिवसांत दक्षिण महाराष्ट्रात हळूहळू तापमानात वाढ होणार आहे.

## बालेन शाह यांनी माजी पंतप्रधान

दाहाल यांनी रु कुम पूर्व-१ जागा १०,२४० मतांनी जिंकण्यात यश मिळवले.

आकडेवारीनुसार, आरएसपीने ६० पेक्षा जास्त जागा जिंकल्या आहेत. दरम्यान, नेपाळी काँग्रेसने फक्त नउ जागा जिंकल्या आहेत. ओलींचा पक्ष, नेपाळ कम्युनिस्ट पक्षने तीन जागा जिंकल्या आहेत आणि नेपाळ कम्युनिस्ट पक्षाने दोन जागा जिंकल्या आहेत. या आकडेवारीनुसार, शहा यांचे पंतप्रधानपद जवळजवळ निश्चित मानले जात आहे. जनरेशन-झी च्या आंदोलनापूर्वी नेपाळमध्ये सत्ता असलेल्या पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाला सध्याच्या सार्वत्रिक निवडणुकीत दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. पक्षाचे उपाध्यक्ष बिष्णू पौडेल, गोकर्ण बिस्ता, सरचिटणीस शंकर पोखरेल, सचिव महेश बसनेट, भानुभक्त ढकाल आणि राजन भट्टाराई यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. नेपाळ संसदेच्या एकूण २७५ जागांसाठी ५ मार्च रोजी मतदान झाले. यापैकी १६५ जागांसाठी थेट मतदानाद्वारे आणि उर्वरित ११० जागांसाठी प्रमाणशीर प्रतिनिधित्व प्रणालीद्वारे निवडणुका घेण्यात आल्या. निवडणूक आयोगाच्या मते, यावेळी सुमारे ६० टक्के मतदान झाले.

## मणिपूरमध्ये आदिवासींवर

निधीबद्दल किंवा त्याच्या संघटनेबद्दल माहिती देण्यात आली नव्हती. राष्ट्रपती जेव्हा राज्याला भेट देतात, तेव्हा त्यांना सूचित केले जाते. परंतु त्यांना संबंधित आंतरराष्ट्रीय परिषदेची माहिती नव्हती किंवा राज्य सरकार त्यात सहभागी नव्हते, असे ममता बॅनर्जी यांनी स्पष्ट केले.मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रपतींवर टीका करताना म्हटले की, त्यांना भाजपचा अजेंडा पुढे नेण्यासाठी पाठवण्यात आले आहे. राष्ट्रपती भाजपाच्या धोरणांना बळी पडल्या आहेत. भाजपाची प्राथमिकता राजकारण आहे, पण माझी प्राथमिकता जनता आहे. मणिपूरमध्ये आदिवासींवर अत्याचार होत असताना राष्ट्रपती गप्प का होत्या? राजस्थान आणि महाराष्ट्रात आदिवासींवर होणा-या कथित अत्याचारांबद्दल राष्ट्रपतींनी प्रश्न का उपस्थित केले नाहीत, असा प्रश्नही ममता बॅनर्जी यांनी विचारला.

दरम्यान, निवडणुकीपूर्वी राजकारण करू नका. राज्य सरकारने कोणताही कार्यक्रम थांबवण्याचा प्रयत्न केला नाही आणि त्याचा त्याच्याशी कोणताही संबंध नाही. माझ्या सरकारची प्राथमिकता राज्यातील जनतेचे कल्याण आहे, असे ममता बॅनर्जी यांनी सांगितले.

## शेजारील राष्ट्रांवरील हल्ले

इराणच्या राष्ट्रपतींच्या घोषणेनंतर कतारमधील लोकांच्या मोबाईलवर एक मेसेजही पाठवण्यात आला आहे. त्यात आता सुरक्षेचा धोका संपुष्टात आला आहे. परिस्थिती सामान्य झाली आहे असे त्यात म्हटले आहे. सौदी अरेबिया आणि यूएईने इराणी हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्याची तयारी केली होती त्यावेळी इराणने शेजारील राष्ट्रांवर हल्ले रोखण्याची घोषणा केली आहे. तर इराणी राष्ट्रपतींनी माफी मागितल्यानंतरही कतारची राजधानी दोहा येथे स्फोटाचा आवाज ऐकायला आल्याची बातमी अल जजीरा वृत्तसंस्थेने दिली. क्षेपणास्त्रे जमिनीवर पडण्याआधी त्याला पाडण्यात यश आले असे बातमीत म्हटले आहे. इराणी राष्ट्रपतींनी शेजारील राष्ट्रांवर हल्ला करणार नाही म्हटल्यानंतरही हा हल्ला झाला. दोहा येथे सुरक्षेसाठी सायरन वाजवण्यात आले. सध्या इराणमधील वरिष्ठांकडून घेण्यात आलेल्या निर्णयाची जमिनीवरील सैन्याला माहिती करून दिली आहे की नाही याची स्पष्टता नाही. कतारच्या संरक्षण मंत्रालयानेही इराणी मिसाईल हल्ल्याची पुष्टी केली आहे. दरम्यान, इराणी सैन्यदलाने आमच्या देशाला लक्ष्य करून केलेला क्षेपणास्त्र हल्ला आम्ही रोखला आहे असे कतारच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले. परंतु किती क्षेपणास्त्रे डागण्यात आली आणि कोणत्या ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले याबद्दल अधिक माहिती देण्यात आलेली नाही. पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि अझरबैजान एकत्रितपणे इराणवर हल्ला करण्याची शक्यता आहे. त्यातच इराणकडून ही घोषणा करण्यात आल्याने आता या तिन्ही देशांची भूमिका काय असेल हे लवकरच समोर येईल.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीने

असल्याची घोषणा केली. इराणचे अध्यक्ष ड?. मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलं की, इराणच्या तात्पुरत्या नेतृत्व परिषदेने शेजारील देशांवरील हल्ले आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण थांबविण्याचा निर्णय घेतला. जोपर्यंत इतर देशातून हल्ले होणार नाहीत, तोपर्यंत इराणही हल्ले करणार नाही. पेझेश्कियान म्हणाले, मी शेजारच्या देशांची माफी मागतो. इतर देशांवर आक्रमण करण्याचा आमचा कोणताही हेतू नव्हता. तथापि अमेरिका आणि इस्त्रायलसमोर शरणागती पत्करणार नाही, असेही पेझेश्कियान यांनी स्पष्ट केले. इराणने बिनशर्त शरणागती पत्करावी, अशी इच्छा शत्रूंनी व्यक्त केली. त्यांची इच्छा त्यांच्याबरोबरच त्यांच्या थडग्यात पुरली जाईल, असेही पेझेश्कियान म्हणाले.

## चिखलदरा महोत्सवात व्यापकता

बचतगटांनी तयार केलेले वस्तूचे प्रदर्शन व विक्रीमुळे यामुळे निर्माण होणाऱ्या आर्थिक स्थैर्यतेमुळे महिलांच्या जीवनात आमुलाग्र बदल निर्माण होत आहे. ही बाब लाडक्या बहिणींच्या सक्षमतेसाठी महत्वपूर्ण आहे. उमेदच्या माध्यमातून महिलांना उद्योजक बनविण्यात येत आहे. त्यासाठी महिलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. महिलांना रोजगार निर्मितीसाठी फिरते भांडवल उपलब्ध करून दिले जाईल. आज अमरावतीत महिला बचतगटात २ लाख २० हजार महिला सहभागी आहेत. महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या वैदर्भी महोत्सवाचे यश हाच खरा महिला दिन असल्याचे ते यावेळी म्हणाले.

राज्यशासन २०२६ मध्ये आरोग्यविषयक यंत्रणा अधिक विकसित करण्यावर भर देत आहे. या पार्श्वभूमीवर अमरावतीमध्ये टाटा ट्रस्टचे हॉस्पीटल स्थापन करण्यात येणार आहे. चिखलदरा महोत्सवात महिला बचतगटांनी निर्माण केलेल्या वस्तू, खाद्यान्ने यांचे प्रदर्शन तसेच विक्री केंद्र स्थापन करण्यात यावे. चिखलदऱ्याच्या कॉफीचे ब्रॅंडिंग करून येथील आदिवासी महिलांना आर्थिक सक्षम करण्यावर भर देण्यात येणार आहे. लाडक्या बहिणींची योजना सुरुच राहणार आहे. शिवाय महिला सक्षमीकरण, उद्योजकता विकास आणि ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणे, हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. या महोत्सवात एकूण १५६ स्टॉल्स लावण्यात आले असून, त्यापैकी ११० स्टॉल्सवर महिलांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंची विक्री केली जात आहे, तर ४६ स्टॉल्सवर खवय्यांसाठी खाद्यपदार्थांची मेजवानी आहे. ' द फ्लेवर ऑफ महाराष्ट्र ' अंतर्गत सिंधुदुर्गचे कोकणी पदार्थ, कोल्हापुरी, जळगाव आणि नागपूरच्या विशिष्ट जेवणाचा आस्वाद अमरावतीकरांना घेत आहेत. या स्टॉल्सला पालकमंत्री बावनकुळे यांनी भेट देवून या महिलांशी संवाद साधला. महिलांचा उद्यमशीलपणा बघून त्यांचे कौतुक केले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण आणि एकल महिलांना उपयुक्त ठरणाऱ्या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. महिला व बालकल्याण विभागाच्या पोर्टलचे उदघाटन यावेळी करण्यात आले. त्यांनी याप्रसंगी महिलांच्या कामाचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी महापात्र यांनी केले. यावेळी दिंडी युवा वारकरी मंडळींनी टाळ मृदुंगाच्या गजरात मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्षिप्रा मानकर यांनी केले.

**अमरावतीत १ लक्ष घरांचे पट्टेवाटप** २०२६ मध्ये अमरावती जिल्ह्यात १ लाख लखपती दिदी बनवायच्या आहेत. शेतकऱ्यांना २ लक्ष रुपयांची कर्जमाफी व नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजार मिळणार आहेत. सूर्यघर योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी सर्वांनी या योजनेत सहभागी व्हावे. शहराच्या विकासावर भर देण्यात येत असून राजकमल ब्रीजसाठी १२५ कोटी मिळाले आहे. विविध मंडळात राजस्व अभियानांतर्गत सर्व सेवा नागरिकांना पुरविण्यात येत आहे. तुकडेबंदी कायदा जावून अमरावतीत १ लक्ष घरांचे पट्टेवाटप करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री बावनकुळे म्हणाले.

## ७ हजारांची लाच घेताना तलाठी

पंचासमक्ष मान्य केले आणि ती रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात ताब्यात घेतले.

या प्रकरणी आरोपी तलाठीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती एसीबीकडून देण्यात आली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक बापू बांगर व अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक सुनील किनगे, पोलीस निरीक्षक सुजाता बन्सोड तसेच पथकातील कर्मचारी प्रमोद रायपुरे, युवराज राठोड व सतीश कीटुकले यांनी केली.

## घरासमोरून दुचाकी लंपास;

तपासणी केली. तसेच गोपनीय बातमीदारांच्या मदतीने संशयितांचा माग काढण्यात आला. या दरम्यान पोलिसांनी शुभम पुरुषोत्तम कोकणे (वय २८, रा. यशोदा नगर) आणि विक्की उर्फ शुटर दामोदर अंबरते (वय ३२, रा. शोभा बगर, गाडगेनगर) या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीदरम्यान त्यांनी दुचाकी चोरीची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून स्प्लेंडर प्लस (३० हजार रुपये) व स्प्लेंडर प्रो (४० हजार रुपये) अशा दोन दुचाकी जप्त केल्या. त्यापैकी एक वाहन फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यातील तर दुसरे सिटी कोतवाली पोलीस ठाण्यातील गुन्ह्यातील असल्याचे उघड झाले.

तपासात अटक केलेले दोन्ही आरोपी हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक निलेश गावंडे, उपनिरीक्षक राहुल महाजन, सहायक पोलीस उपनिरीक्षक योगेश श्रीवास तसेच पोलीस कर्मचारी हरीश चौधरी, जयेश परिवाले, रोशन वऱ्हाडे, अखिल दळवी आणि जावेद पटेल यांनी पार पाडली.

## ५२ वर्षीय महिलेची गळफास घेऊन

करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पवार करीत आहेत. पोलिसांकडून आत्महत्येमागील नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

## खंडेलवाल ज्वेलर्सचे अमरावतीत

नैसर्गिक व लॅब-ग्रोन हिरे, माणिक, पन्ना, मोती, कुंदन, पोलकी, मंदिर शैलीतील दागिने, पारंपरिक महाराष्ट्रीयन दागिने तसेच हलके आणि किफायतशीर दागिन्यांचा मोठा संग्रह उपलब्ध आहे. हिऱ्यांच्या दागिन्यांवर ५० टक्क्यांपर्यंत आणि सोन्याच्या दागिन्यांवर २५ टक्क्यांपर्यंत मेकिंग चार्ज सवलत देण्यात येत असल्याची माहिती नितीन खंडेलवाल यांनी दिली.

तसेच 'हेड्स तुमचे, सोन्याचा दर तुमचा' यासारख्या आकर्षक योजनाही ग्राहकांसाठी सुरू करण्यात आल्या आहेत. आजच्या दराने बुकिंग करून ३१ डिसेंबरपर्यंत सोन्याची किंमत सुरक्षित ठेवण्याचा पर्याय उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. एसआयपी पद्धतीने सोन्यात गुंतवणूक करण्याबाबत मार्गदर्शनही दिले जात आहे.

पारदर्शक व्यवहार, दागिन्यांची शुद्धता आणि ग्राहकांचा अढळ विश्वास हीच खंडेलवाल ज्वेलर्सची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या अकोला येथे दोन, अमरावती जिल्ह्यातील वरुड, वाशिम आणि बुलढाणा येथे प्रत्येकी एक असे एकूण अनेक शोरूम कार्यरत आहेत.दरम्यान, अमरावतीतील हे विशेष प्रदर्शन ७, ८ आणि ९ मार्चपर्यंत सुरू राहणार असून प्रत्येक खरेदीवर आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देऊन विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## विहिरीत वृध्द व्यक्तीचा आढळला

का केली कि या मृत्यूमागे काही दुसरे कारण आहे, हे अद्याप समोर आलेले नाही. त्यांच्या घरचे सदस्य आणि शेजारी घटनास्थळी उपस्थित होते. ही घटना परिसरात धक्कादायक ठरली. लोणी पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून चौकशी सुरू केली असून, मृत्यूशी संबंधित सर्व बाजूंचा सखोल तपास केला जात आहे. पोलिसांनी शेतातील विहिरीसह आसपासचे क्षेत्र सील करुन, घटनास्थळी असलेल्या साक्षीदारांची माहिती नोंदवली आहे. मृत्यूमागील नेमके कारण समजून घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे आणि पोलिसांनी संभाव्य सर्व बाबींचा अभ्यास करत या घटनेचा निष्पक्ष तपास करण्याचे आश्वासन दिले आहे.

## कु-हा हद्दीत गोवंश वाहतूकीचा

कार्यवाही सुरू आहे. ही धडक कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने केली. पोलीस अंमलदार संतोष तेलंग, निरंजन आमटे, रुपेश चंडिकापूरे, आकाश इंगोले आणि चालक किशोर सुने यांनीही या कारवाईत सक्रिय सहभाग घेतला.

## कच्चे तेलाचा टँकर देण्याच्या

रक्कम दिल्यानंतर टँकरची डिलिव्हरी मिळेल, असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. आवश्यकतेमुळे फिर्यादींनी आरोपींना १० लाख रुपये दिले. मात्र, त्यानंतर डिलिव्हरी घेण्यासाठी हिंगणघाट येथे गेल्यानंतर समजले की, संबंधित कंपनीकडे अशी कोणतीही रक्कम जमा करण्यात आलेली नाही. तपासात आरोपींनी घेतलेली रक्कम आपसात वाटून घेतल्याचे समोर आले. त्यानंतर फिर्यादींनी संपर्क साधल्यानंतर ३० जुलै २०२५ रोजी आरोपींनी २ लाख रुपये परत केले, मात्र उर्वरित ८ लाख रुपये परत न करता फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी हमीद खान गफार खान, मुसादीक खान हमीद खान (रा. वरुड वेस जिंतुर, जि. परभणी), दीपक भोसले (रा. जालना) आणि सलीम अहमद ऊर्फ हाजी तसेच एसएस ट्रेडर्स (रा. अमरावती) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६ (२), ३१८ (४), ३ (५) बी आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या लेखी तक्रारीच्या आधारे आणि पोलिस उपायुक्त (परिमंडळ-२) यांच्या मार्गदर्शनानुसार राजापेठ पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज समाधान

नुसार अचलपूर तालुक्यातील परसापूर येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर कार्यक्रम संपन्न झाले. शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या, तक्रारी व प्रलंबित प्रश्न यांचे तात्काळ निराकरण करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून शासन नागरिकांच्या दारी येऊन त्यांच्या समस्या ऐकण्याचा एक प्रभावी प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी व्यक्त केले. समाधान शिबिराचा उद्देश प्रास्ताविके व्दारे तहसिलदार अचलपूर सुदर्शन शहारे यांनी दिली. प्रास्ताविकेमधून बळीराजा पांदन रस्ता योजना, तुकडे बंदी कायदा, मामलतदार कायदा, मातोश्री पांदण योजना, महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनाची माहिती त्यांनी या प्रसंगी दिली.यावेळी उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते तहसिल कार्यालय अचलपूर अंतर्गत महसूल प्रशासनामार्फत विविध सेवा बाबत दाखले प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.या शिबिराच्या माध्यमातून अचलपूर तहसिल कार्यालय महसूल प्रशासनाव्दारे देण्यात येणा-या सेवामध्ये विविध दाखले, ७/१२, फेरफार, नमुना ९ वाटप, १५५ आदेश, भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ आदेश वाटप, संजय गांधी, श्रावण बाळ योनजा आदेश वाटप, पुरवठा विभाग राशन कार्ड वाटप इत्यादी मिळूण एकूण ६९५ ग्रामस्थाना लाभ देण्यात आला.यामुळे एकाच ठिकाणी ग्रामस्थांना मोठी सुविधा उपलब्ध झाली.सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महसूल कर्मचारी रोशन ग. महानकर यांनी केले. आभार प्रदर्शन राहुल केदारे, निरिक्षण अधिकारी अचलपूर यांनी केले.

## पत्नीच्या विरहाने तरुणाची

त्यांनी आरडाओरडा सुरू केला आणि परिसरातील नागरिक घटनास्थळी जमा झाले. तत्काळ वलगाव पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि चंदूला जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासाअंती त्याला मृत घोषित केले. चंदूने नेमके कोणत्या कारणामुळे आपले जीवन संपवले, याबाबत अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. वलगाव पोलीसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## सराफा व्यापाऱ्याने लंपास केले

तीन महिने पर्यंत ठोसर यांनी दर महिन्याला २० हजार रुपये संतोष मिश्रा यांना दिले. यानंतर आर्थिक तंगी असल्याचे सांगितले आणि त्यांना उडवा उडवीचे उत्तर देऊ लागले. पैसे देणे ही त्यांनी बंद केले. संतोष मिश्राने जेव्हा आपले दागिने परत मागितले तर ठोसर त्यांना वेगवेगळे कारण सांगत होते. यामुळे संतोष मिश्रा यांनी पोलीस ठाण्यात जाण्याचे म्हटले तर ठोसरने त्यांना धमकीविले. यामुळे त्यांनी खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यावर मुकेश ठोसर व महिले विरुद्ध कलम ३१६(२), ३१८(४),३५१(२),३(५) अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

**आज दिनांक रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार** निमखेड **निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत** निमखेड **यांनी बोलविल्यानुसार निमखेड येथे हजर झालो.** जन्म/ मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी **ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नाव** मोहम्मद मुन्ताजीर मोहम्मद शब्बीर **अर्जात नमुद जन्म/ मृत्यू** दिनांक १६-२-१९६५ **च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.**

**१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे** निमखेड **येथील स्थनिक रहिवासी आहेत.**

**२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो, तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील. आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.**

**३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहित वेळेत न होण्याचे कारण** प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे **हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे. दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमूद करा)**

**करिता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.**

| पंचाचे नाव | सही |
|---|---|
| **१. पंकज न. राऊत (पोलीस पाटील)** | **१. पंकज न. राऊत** |
| **२. जे.व्ही. यावले (ग्रामसेवक)** | **२. जे.व्ही. यावले** |
| **३. प्रल्हाद प. सिरसाठ(सरपंच)** | **३. प्रल्हाद प. सिरसाठ** |
| **४. जी. जी. फुटाणे** | **४. जी. जी. फुटाणे** |

शिक्का

निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय, निमखेडपंचायत समिती, चांदूर बाजार जि. अम.

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

**आज दिनांक रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार** निमखेड **निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत** निमखेड **यांनी बोलविल्यानुसार निमखेड येथे हजर झालो.** जन्म/ मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी **ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नाव** मोहम्मद जहांगीर मोहम्मद रफीक **अर्जात नमुद जन्म/ मृत्यू** दिनांक १६-१-१९७२ **च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.**

**१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे** निमखेड **येथील स्थनिक रहिवासी आहेत.**

**२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो, तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील. आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.**

**३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहित वेळेत न होण्याचे कारण हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे. दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमूद करा)**

**करिता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.**

| पंचाचे नाव | सही |
|---|---|
| **१. पंकज न. राऊत (पोलीस पाटील)** | **१. पंकज न. राऊत** |
| **२. जे.व्ही. यावले (ग्रामसेवक)** | **२. जे.व्ही. यावले** |
| **३. प्रल्हाद प. सिरसाठ(सरपंच)** | **३. प्रल्हाद प. सिरसाठ** |
| **४. जी. जी. फुटाणे** | **४. जी. जी. फुटाणे** |

शिक्का

निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय, निमखेड पंचायत समिती, चांदूर बाजार जि. अम.

अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ रविवार, ८ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# ‘उमेश’च्या सहाय्याने ‘राजू’ची ग्रामीणमध्ये गरुडझेप

## धरमकाटा परिसर बनला वरली-मटक्याचा केंद्रबिंदू; ग्रामीण पोलिसांची अर्थपूर्ण डोळेझाक?

**समीर ठाकूर**

***अकोला :*** *अकोट शहरातील अवैध धंद्यांवर अलीकडेच बातम्यांमधून प्रकाशझोत पडताच शहरातील वरली-मटका, जुगार आणि इतर गैरप्रकारांना अचानक ब्रेक लागला. मात्र शहरातील धंद्यांना कुलूप लागताच या साखळीतील प्रमुख कलेक्शन एजंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ‘जेंटलमेन’ राजूने परिस्थितीचा अचूक अंदाज घेत आपले अवैध जाळे थेट अकोट ग्रामीण पोलिसांच्या हद्दीत हलविल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.*

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, राजूने ‘उमेश’ नामक स्थानिक व्यक्तीला हाताशी धरत ग्रामीण हद्दीतील धरमकाटा परिसरात वरली-मटक्याचे नवे अड्डे उभारले आहेत. शहरात कारवाईची शक्यता निर्माण होताच हा गोरखधंदा ग्रामीण भागात स्थलांतरित करण्यात आला असून दिवसभर ग्रामीण भागातील नागरिकांच्या खिशावर लाखोंचा डल्ला मारला जात असल्याची चर्चा आहे.

या अवैध साखळीत ‘गांजेवाला हाफिज’ आणि ‘महादेव’ हे दोघे राजूचे भागीदार म्हणून सक्रिय असल्याची माहिती समोर येत आहे. तर ग्रामीण भागात लहान पातळीवर धंदा चालवणाऱ्या आकाश, राजू आणि इमरान या नावांचीही चर्चा असून या सर्वांना अवैध धंदा सुरू ठेवण्यासाठी अनधिकृत ‘परवानगी’ जेंटलमेन राजूनेच मिळवून दिली असल्याची माहिती स्थानिक सूत्रांनी दिली.

धरमकाटा परिसरात सुरू असलेला हा वरली-मटक्याचा अड्डा आता संपूर्ण ग्रामीण भागातील खायवाडीचा मुख्य केंद्रबिंदू बनल्याची माहिती आहे. विविध गावांतून जमा होणारा पैसा येथेच उतरविला जात असल्याची चर्चा असून यामागे संगनमताचा संशयही व्यक्त केला जात आहे. दरम्यान, धरमकाटा परिसरात सुरू असलेल्या या अवैध वरली-मटका अड्ड्यांवर ग्रामीण पोलिस प्रशासन कारवाई करणार का, की नेहमीप्रमाणेच याकडे अर्थपूर्ण डोळेझाक होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



### शहर बंद होताच ग्रामीणची ‘लॉटरी’

अकोट शहरात अवैध धंद्यांवर दबाव वाढताच या साखळीतील प्रमुख सूत्रधारांनी लगेचच ग्रामीण भागाचा पर्याय निवडल्याचे चित्र आहे. शहरातील अड्डे बंद पडताच राजूने ग्रामीण यंत्रणेतील काही ‘झारीतील शुक्राचार्य’ हाताशी घेत धरमकाटा परिसरात वरली-मटक्याचे बस्तान थाटल्याची चर्चा रंगली आहे. परिणामी शहरात धंदे बंद झाले असले तरी ग्रामीण भागात मात्र अवैध व्यवहारांना अक्षरशः उधाण आल्याचे बोलले जात आहे. परिणामी ’हफ्ता’ वाढल्याने ग्रामीणची लॉटरी लागली असल्याची चर्चा रंगली आहे.

### उमरा बीट बनले अवैध धंद्यांचे ‘हॉटस्पॉट’

अकोट ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील उमरा बीट सध्या विविध अवैध धंद्यांचे केंद्र बनल्याची माहिती समोर येत आहे. या परिसरातून दारू आणि गुटख्याची तस्करी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे बोलले जाते. त्यातच वरली-मटक्याचे अनेक अड्डेही याच बीटमध्ये कार्यरत असल्याने हा भाग अवैध धंद्यांचा ‘हॉटस्पॉट’ ठरत असल्याची चर्चा आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, ग्रामीण भागातील गरीब व सर्वसामान्य लोकांना झटपट पैशाचे आमिष दाखवत या मटक्याच्या जाळ्यात ओढले जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटण्याची भीती व्यक्त होत आहे.

### ग्रामीण भागात नकली नोटांचा ‘पाऊस’ पडण्याची भीती?

ग्रामीण भागात सर्वाधिक शेतकरी, शेतमजूर आणि गरीब कुटुंबे वरली-मटक्याच्या आमिषाला बळी पडत असल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागातील अज्ञानी व आर्थिकदृष्ट्या कमकुवत नागरिकांचा फायदा घेत या अवैध साखळीतून नकली नोटा चलनात टाकल्या जात असल्याचीही चर्चा सुरू झाली आहे.

मटक्याच्या जिंकलेल्या रकमेच्या मोबदल्यात काहींना नकली नोटा दिल्या जात असल्याचा संशय व्यक्त केला जात असून त्यामुळे ग्रामीण भाग नकली नोटांच्या सरक्युलेशनचा केंद्रबिंदू बनण्याची भीती व्यक्त होत आहे. परिणामी आगामी काळात या टोळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरीब लोकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या गंभीर प्रकाराकडे पोलिस प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

---

# आज दहा दिवसीय श्रामणेर शिबिराच समारोप

### भारतीय बौद्ध महासभा वतिने आयोजन

■ **प्रतिनिधी | रिसोड** ■

रिसोड शहरातील बौद्ध धम्म अनुयायांसाठी आणि तरुण पिढीला धम्म संस्कारांची ओळख करून देण्यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित १० दिवसीय भव्य श्रामणेर शिबिराचा समारोप आज, ८ मार्च रोजी होत आहे.गेल्या १० दिवसांपासून रिसोड शहर धम्ममय झाले असून,या शिबिराच्या माध्यमातून श्रामणेर संघाला कठोर शिस्त आणि धम्माचे सखोल प्रशिक्षण देण्यात येत आहे.



धम्म संस्कारांची शिदोरी हे श्रामणेर शिबिर २७ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात सुरू झाले.तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची कास धरून, जीवनात सदाचार आणि नैतिकतेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश आहे.शिबिरात सहभागी झालेल्या श्रामणेरांना पहाटेपासून ते रात्रीपर्यंत धम्म नियमावलीचे पालन करावे लागत आहे.यामध्ये त्रिशरण, पंचशील,अष्टशील आणि धम्मपद वाचनासह ध्यानधारणेचे धडे दिले जात आहेत.या शिबिराचे मुख्य आकर्षण म्हणजे पुज्य भंते महेंद्र बोधी यांची वंदनीय उपस्थिती आहे.भंतेजींनी आपल्या प्रवचनातून उपस्थितांना मानवी जीवनात धम्माचे महत्त्व आणि शांतीचा मार्ग कसा अवलंबावा,यावर प्रकाश टाकला.तसेच केंद्रीय शिक्षक राहुल हेलोडे हे अत्यंत कल्पकतेने आणि अभ्यासपूर्ण पद्धतीने श्रामणेर संघाला प्रशिक्षण देत आहेत.शिबिरा दरम्यान वंचित बहुजन आघाडीच्या विविध पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन आयोजनाचे कौतुक केले. यामध्ये डॉ. रवींद्र मोरे पाटील, तालुका अध्यक्ष महेश तिडके, माजी शहराध्यक्ष प्रदीप खंडारे, महासचिव जियाउर खान आणि युवा शहराध्यक्ष सदानंद गायकवाड यांनी शिबिरास भेट देऊन आपले विचार मांडले. आयोजकांचे अहोरात्र परिश्रम शिबिराच्या यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष माधव हिवाळे यांच्या नेतृत्वाखाली मोठी टीम कार्यरत आहे.यामध्ये देविदास सोनुने, कैलास सर्वे,शालीग्राम पठाडे यांनी व्यवस्थापनाची धुरा सांभाळली आहे.तसेच महिला आघाडीच्या वतीने संध्याताई पंडित, महानंदाताई वाठोरे, प्रमिला शेवाळे आणि मीना चव्हाण या भगिनी श्रामणेरांच्या भोजन व्यवस्थेपासून ते इतर नियोजनापर्यंत अहोरात्र परिश्रम घेत आहेत. दिनांक ८ मार्च २०२६ रोजी या १० दिवसीय शिबिराचा सांगता समारंभ आयोजित करण्यात आला आहे.सकाळी भिक्खू संघाची भव्य धम्मरॅली काढण्यात येणार असून कार्यक्रमाचा समारोप होईल.

---

# आज स्त्री सन्मान व बक्षीस वितरण सोहळा



■ **प्रतिनिधी | कारंजा** ■

कारंजा-मानोरा मतदारसंघात महिला जागतिक दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि. ४ मार्च ते ७ मार्च दरम्यान विविध सामाजिक, आरोग्य व सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना मतदारसंघातील महिलांनी मोठ्या उत्साहाने प्रतिसाद देत हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवला.

या उपक्रमांतर्गत महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले. ४ मार्च रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र पोहा येथे, ५ मार्च रोजी धामणी (खडी), ६ मार्च रोजी मनभा आणि ७ मार्च रोजी उंबर्डा बाजार व धनज (बु.) येथे आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमध्ये मोठ्या संख्येने महिलांनी आरोग्य तपासणी करून घेतली. यासोबतच महिलांमधील कला व वक्तृत्वाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले. ५ मार्च रोजी विठोली व विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा येथे वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. ६ मार्च रोजी विठोली व पंचायत समिती कारंजा येथील सभागृहात रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. तर ७ मार्च रोजी विठोली व पंचायत समिती कारंजा येथे एकपात्री प्रयोग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या सर्व स्पर्धांमध्ये शेकडो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. दरम्यान, या स्पर्धांमधील विजेत्यांचा गौरव करण्यासाठी व महिलांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी स्त्री सन्मान सोहळा व बक्षीस वितरण कार्यक्रम दि. ८ मार्च रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ११ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळा केंद्र विठोली येथे तर दुपारी ३ वाजता कारंजा येथील शेतकरी निवास सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

हा स्त्री सन्मान सोहळा व बक्षीस वितरण कार्यक्रम कारंजा-मानोरा मतदारसंघाच्या आ. सई प्रकाशदादा डहाके यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

---

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी समाजाने एकत्र यावे - आम्रपाली आघम

■ **प्रतिनिधी | वाशिम** ■

८ मार्च हा दिवस जगभर आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश महिलांच्या अधिकारांबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणे आणि समाजात समानतेची भावना बळकट करणे हा आहे. महिलांच्या कर्तृत्वाचा इतिहासही अत्यंत प्रेरणादायी असून २१ व्या शतकातील महिलांनी राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडवून स्वराज्याची पायाभरणी केली. सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या शिक्षणासाठी मोठे कार्य करून



समाजात परिवर्तन घडवले. रमाई (रामाबाई आंबेडकर) यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यात मोठा आधार दिला. झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी शौर्य आणि धैर्याचे उदाहरण देत स्वातंत्र्यासाठी लढा दिला, तर मदर तेरेसा यांनी मानवसेवेच्या माध्यमातून जगभरात करुणा आणि सेवाभावाचा संदेश दिला. या महान महिलांचे कार्य आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून महिलांच्या सक्षमीकरण आचार विचार मार्गदर्शन हे अंगीकारणे गरजेचे आहे. आजच्या आधुनिक काळात महिला शिक्षण, आरोग्य, प्रशासन, उद्योग, क्रीडा तसेच सामाजिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत.

महिलांनी स्वतःच्या कर्तृत्वाच्या जोरावर अनेक क्षेत्रांत यश संपादन केले असले तरी ग्रामीण भागात अजूनही महिलांना विविध सामाजिक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

---

# जागतिक वन्यजीव दिन साजरा

■ **प्रतिनिधी | वाशिम** ■

राष्ट्रीय हरित सेना एस एम सी इंग्लिश स्कूल व सामाजिक वनीकरण परिक्षेत्र वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक वन्यजीव दिन साजरा करण्यात आला .यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य मीना उबगडे होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक वनीकरण विभागाचे वनरक्षक भगवान वानखेडे होते उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणामध्ये वन्यजीवांना असलेले महत्त्व विशद केले.

---

# विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त विविध उपक्रम

■ **प्रतिनिधी | मालेगाव** ■

स्थानिक बाल शिवाजी मराठी विद्यानिकेतन माध्यमिक विद्यालय श्री स्वामी समर्थ बालसंस्कार विद्या मंदिर वीर शिवाजी कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय च्या वतीने दि. ८ मार्च रविवार रोजी अतिशय भव्य अशा जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये संस्थेचे सचिव रंजना अरविंद देशमुख यांच्या अतिशय कल्पक आणि दूरदर्शी दृष्टिकोनातून केवळ मनोरंजनात्मकच नव्हे तर महिलांच्या जीवनात येणाऱ्या अडीअडचणी तसेच त्यांच्या आरोग्य संबंधी असणारे प्रश्न समजून घेण्यासाठी



या कार्यक्रमांमध्ये प्रसिद्ध अशा डॉक्टर तज्ञांकडून महिलांचे व किशोरवयीन मुलींचे भव्य असे आरोग्य तपासणी शिबिर सुद्धा आयोजित केलेले आहे या भव्य अशा आरोग्य तपासणी शिबिरास प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉक्टर महेश देशमुख, डॉक्टर यशश्री महेश देशमुख यांच्याकडून किशोरवयीन मुली व महिला यांच्या आरोग्याबद्दल असणाऱ्या समस्या जाणून घेण्यासाठी त्यांच्या फ्री बॉडी चेक अप म्हणजे संपूर्ण शरीर तपासणीचे आयोजन करण्यात आले आहे ग्रामीण भागातील स्त्रिया आपल्या आरोग्य व त्यासंबंधी असणाऱ्या समस्या यांच्याकडे कायमस्वरूपी दुर्लक्ष करतात त्या अनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तसेच डॉक्टर निखिल कानडे, हे अतिशय उत्कृष्ट असे आरोग्य सल्लागार असून ते महिलांना व किशोरवयीन मुलींना आपलेआरोग्य जपणूक व त्याबाबतीत असणाऱ्या समस्या व उपाय याविषयी सखोल असे मार्गदर्शन करणार आहेत तसेच डॉ. सपना निखिल कानडे अहिल्यानगर ह्या जागतिक आरोग्य सल्लागार असून त्या कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या महिला व किशोरवयीन मुली यांना आहार आणि आपले सौंदर्य याविषयी अतिशय मोलाचे असे मार्गदर्शन करणार आहेत.

---

# स्वप्न ते स्वावलंबन : ‘स्वरा गृह उद्योग’ची प्रेरणादायी वाटचाल

### महिला दिनविशेष



शिक्षण घेतल्यानंतर स्वाभिमानाने जीवन जगता यावे, ही प्रत्येक महिलेची साधी आणि स्वाभाविक इच्छा असते. हीच इच्छा प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न म्हणजे ‘स्वरा गृह उद्योग’. ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबनाची प्रेरणा देणारी ही यशोगाथा स्वाभिमान, परस्पर सहकार्य आणि जिद्दीची प्रेरणादायी कहाणी म्हणावी लागेल.

वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील वाई येथील रहिवासी असलेल्या मंजुषा राजेंद्र ठाकरे या कारंजा येथील लोकसंचालित साधन केंद्राच्या उपाध्यक्ष आहेत. एम.ए. आणि बी.एड. असे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी स्वतःच्या शिक्षणाचा उपयोग समाजासाठी करायचा निर्धार केला. महिलांना रोजगाराची संधी मिळावी आणि त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात, या उद्देशाने जानेवारी २०२१ मध्ये त्यांनी ‘स्वरा गृह उद्योग’ या उपक्रमाची सुरुवात केली.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अंतर्गत कारंजा येथील लोकसंचालित साधन केंद्रामार्फत नाबार्डच्या सहाय्याने ‘रूरल मार्ट’ हा उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमामध्ये महिलांच्या बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या माध्यमातून आपल्या केंद्रातून तयार होणारी किमान एक उत्पादित वस्तू विक्रीसाठी असावी, या उद्देशाने मंजुषा ठाकरे यांनी श्री स्वामी समर्थ महिला समूहातील चार-पाच महिलांना सोबत घेऊन ‘स्वरा हँडमेड पापड’ तयार करण्यास सुरुवात केली.

‘चव आपल्या घरची’ हे ध्येयवाक्य जपत शुद्धता, गुणवत्ता आणि पुरेसे प्रमाण यावर भर देत या उद्योगाची सुरुवात झाली. पहिल्याच वर्षापासून ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळू लागला. मागणी वाढू लागल्याने उद्योगासाठी लागणारे मनुष्यबळ अपुरे पडू लागले. त्यामुळे २०२३ मध्ये उद्योगात आधुनिक यंत्रसामग्री बसविण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेच्या माध्यमातून नवीन यंत्रसामग्री बसविण्यात आली आणि त्यानंतर उद्योगाची प्रगती झपाट्याने वाढू लागली. सुरुवातीला दिवसाला केवळ दहा किलो उत्पादन होत



असताना ते अनेक पटींनी वाढले. ग्राहकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी पापडांसह विविध खाद्यपदार्थांचे उत्पादन सुरू करण्यात आले. आज उद्योगामध्ये दहा पेक्षा अधिक प्रकारच्या वस्तू तयार केल्या जातात.

विक्रीसाठी पारंपरिक जाहिरातींवर अवलंबून न राहता ग्राहकांशी थेट संपर्क साधण्यावर भर देण्यात आला. होम डिलिव्हरी पद्धतीमुळे ग्राहकांच्या आवडीनिवडी जाणून घेणे सोपे झाले. ग्राहकांच्या अपेक्षेनुसार उत्पादनात बदल करण्याची लवचिकता ठेवण्यात आली. तसेच मोठ्या जाहिराती करण्याऐवजी दरवर्षी शेकडो ग्राहकांना चवीसाठी सॅम्पल देण्याची पद्धत अवलंबली गेली. ‘वस्तूची चव ग्राहकाला आवडली तर तो परत येतोच,’ या विश्वासामुळे ग्राहकांचा प्रतिसाद सातत्याने वाढत गेला.

या यशस्वी वाटचालीदरम्यान २०२५ मध्ये महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त यशस्वी उद्योजिका म्हणून मंजुषा ठाकरे यांना महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सन्मानामुळे स्वरा उद्योगाच्या संपूर्ण टीमचा उत्साह द्विगुणित झाला. याशिवाय स्वरा गृह उद्योगाच्या स्थापनेपासून सलग पाच वर्षे त्यांना सावित्रीबाई फुले पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. लोकसंचालित साधन केंद्र उमरडा बाजार आणि अल्पसंख्यांक सीएमआरसी कारंजा यांच्या वतीनेही त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. गावपातळीवर ग्रामपंचायत वाई यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत ‘अहिल्याबाई होळकर पुरस्काराने’ त्यांचा सन्मान केला.

२०२४ ते २०२६ या कालावधीत अनेक महिलांनी उद्योग उभारणीसाठी मार्गदर्शन घेण्यासाठी स्वरा गृह उद्योगाकडे येण्यास सुरुवात केली. या माध्यमातून अनेक महिलांना उद्योगाची प्रेरणा मिळाली आणि त्यांना नव्या संधींचे दार उघडले. पारंपरिक विक्री व्यवस्थेला पर्याय म्हणून ‘डायरेक्ट सेलिंग’ या तत्त्वावर चालणाऱ्या स्वरा गृह उद्योगाला २०२६ मध्ये आणखी एक सन्मान मिळाला. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या ‘महाविकास २०२६ – थेट विक्री परिषद’ अंतर्गत ‘आद्य’ पुरस्काराने उद्योगाचा गौरव करण्यात आला. या प्रवासात अनेक अडचणी आणि आव्हाने आली, पण ‘अडचणी या सोडवण्यासाठीच असतात’ या विश्वासाने स्वरा उद्योगाची टीम सातत्याने पुढे जात राहिली. मंजुषा ठाकरे सांगतात, ‘मी जरी पुरस्कार स्वीकारत असले तरी त्यामागे अनेक महिलांचे परिश्रम आहेत. स्वरा गृह उद्योगाचे यश हे त्या सर्व महिलांचे आहे.’ स्वरा गृह उद्योगाचा उद्देश केवळ आर्थिक उलाढाल वाढवणे हा नसून ग्रामीण भागातील महिलांना उद्योगाची प्रेरणा देणे हा आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या मार्गदर्शनाने ग्रामीण भागात हजारो उद्योग उभे राहून लाखो महिलांना रोजगार मिळावा आणि आर्थिक स्वावलंबन निर्माण व्हावे, हीच या उपक्रमामागील खरी प्रेरणा आहे.

आज ‘स्वरा गृह उद्योग’ ही उद्योगसंस्था ग्रामीण महिलांच्या स्वाभिमान, सहकार्य आणि आत्मविश्वासाची प्रेरणादायी यशोगाथा कथा ठरली आहे.

**श्वेता पोटुडे - राऊत**
जिल्हा माहिती अधिकारी,
वाशिम

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १०० ■ रविवार ८ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# फांद्या छाटण्याचे कंत्राट... झाडांचीच कत्तल!

## कंत्राटदाराच्या कारभारावर पालिकेचा चाबूक; अनिल खिचरे यांच्यावर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील धोकादायक ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटण्याचे कंत्राट देण्यात आले असताना कंत्राटदाराने चक्क डेरेदार झाडेच तोडल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. या वृक्षसंहाराची दखल घेत वर्धा नगरपालिकेने संबंधित कंत्राटदार अनिल खिचरे यांच्याविरुद्ध फौजदारी कारवाई करत पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनीही या तक्रारीची दखल घेत गुन्हा नोंदविला असून या प्रकरणामुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.

शहरातील धोकादायक ठरणाऱ्या झाडांच्या केवळ फांद्या छाटण्याचे कंत्राट वर्धा नगरपालिकेने दिले होते. मात्र काही ठिकाणी नियमांना धाब्यावर बसवत कंत्राटदाराने संपूर्ण झाडेच मुळापासून तोडल्याचे उघड झाले. हिरव्यागार झाडांवर चाललेल्या या कुऱ्हाडीमुळे पर्यावरणप्रेमींमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे.



वृक्षतोड रोखण्याबाबत चर्चा सुरू असताना सदस्य निलेश खोंड

शनिवार, ७ मार्च रोजी दुपारी २ वाजता स्थानिक वृक्ष प्राधिकरण समितीची बैठक पार पडली. या बैठकीला नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, मुख्याधिकारी विजय देशमुख आणि वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत शहरातील बेकायदा यांनी प्रभाग क्रमांक १५ मधील सानेवाडी परिसरासह शहरातील काही भागात झालेल्या अवैध वृक्षतोडीचा मुद्दा ठळकपणे मांडला. कंत्राटदाराला केवळ धोकादायक फांद्या छाटण्याचा अधिकार असताना काही ठिकाणी डेरेदार वृक्षच मुळासकट तोडल्याचे त्यांनी बैठकीच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकाराने बैठकीत उपस्थित सदस्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त झाली.

या गंभीर प्रकाराची दखल घेत समितीने एकमताने संबंधित कंत्राटदारावर फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार वर्धा नगरपालिकेच्या वतीने पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिस विभागानेही या प्रकरणी गुन्हा नोंदविला आहे.

शहरातील हरित संपत्तीवर अशा प्रकारे घाला घालणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

वृक्ष प्राधिकरण समितीच्या बैठकीला पालिकेचे उपाध्यक्ष प्रदीपसिंग ठाकूर, मुरलीधर बेलखोडे, सुरेश आहुजा, राखी पांडे, प्रियंका खंगार, स्नेहा आकारे, शुभांगी कोलते, डॉ. सचिन पावडे, श्यामकांत भेंडे, पवन बोधनकर, सुभाष पाटणकर, भाग्यश्री बोरकर आदी उपस्थित होते.

# ज्वाळांनी गाठला बंद कारखाना; अग्निशमन दलाच्या धडाडीने वाचली एमआयडीसी

**वर्धा जनमाध्यम :** सेवाग्राम मार्गावरील एमआयडीसी औद्योगिक वसाहतीत अनेक वर्षांपासून ओसाड पडलेल्या शिप्रा उद्योग परिसरात शनिवारी सकाळी अचानक लागलेल्या आगीने काही काळ भीतीचे सावट निर्माण केले. बंद कारखान्याच्या आवारात साचलेल्या कचऱ्याने आणि वेस्ट मटेरियलने पेट घेतल्याने ज्वाळांनी क्षणातच रौद्ररूप धारण केले. मात्र वर्धा नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने धाडसी आणि वेळीच केलेल्या प्रयत्नांमुळे ही आग दोन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर आटोक्यात आणण्यात यश आले. त्यामुळे मोठा अनर्थ टळल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

सेवाग्राम मार्गावरील एमआयडीसी परिसरात वैद्य यांच्या मालकीची शिप्रा कंपनी आहे. ही कंपनी अनेक वर्षांपासून बंद असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा आणि वापरात नसलेले साहित्य साचले होते. शनिवारी सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास अचानक कंपनीच्या परिसरातून धूर निघताना दिसला. काही क्षणांतच कचऱ्याने पेट घेत ज्वाळा उंचावू लागल्या आणि बंद पडलेल्या उद्योग परिसरात आगीने धुमसत रौद्ररूप धारण केले.

आगीच्या ज्वाळा वाढताना पाहून परिसरातील नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली. तातडीने वर्धा नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला माहिती देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान अग्निशमन बंबासह तात्काळ घटनास्थळी दाखल



झाले. जवानांनी क्षणाचाही विलंब न करता पाण्याचा मारा सुरू करत आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

जवळपास दोन तासांच्या अथक आणि शर्थीच्या प्रयत्नांनंतर अखेर आगीच्या ज्वाळा शांत करण्यात अग्निशमन दलाला यश आले. आग वेळीच आटोक्यात आल्यामुळे परिसरातील इतर उद्योग, यंत्रसामग्री किंवा मालमत्तेला धोका निर्माण होण्यापासून बचाव झाला. त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, ही आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण वृत्त लिहिस्तोवर स्पष्ट झाले नव्हते. या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी अग्निशमन विभागाचे अशोक लोखंडे, विशाल नाईक, सुजात अली, अश्विन खंडारे, प्रशिल देशमुख, गौरव शेगावकर, मयूर सोनवणे आणि अमोल शेंडे यांनी धाडसी प्रयत्न करत परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. आगीच्या या घटनेमुळे काही काळ एमआयडीसी परिसरात चिंतेचे वातावरण पसरले होते. मात्र अग्निशमन दलाच्या तत्परतेने आणि जिद्दीने संकट टळल्याने नागरिकांनी दिलासा व्यक्त केला.

# दारू पिऊन ऑटो चालविणाऱ्या चालकावर पोलिसांची कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या चालकांवर वाहतूक नियंत्रण शाखेकडून कडक कारवाई सुरू असून शनिवारी (७ मार्च) बसस्थानक परिसरात दारूच्या नशेत ऑटो चालविणाऱ्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस अंमलदार संजय भांडेकर, अनिल तिवारी, दिलीप कामडी आणि मुकेश राऊत यांनी बसस्टँडसमोरील मार्गावर पेट्रोलिंग करत वाहन तपासणी मोहीम राबविली. यावेळी एमएच ३१ एफ ८७७१ क्रमांकाचा ऑटो चालक भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालविताना आढळून आला. सदर चालक प्रलय मुकेश साखरे (वय ४२, रा. हवलदारपुरा,



वर्धा) याच्यावर दारू प्राशन केल्याचा संशय आल्याने त्याला वाहतूक नियंत्रण शाखेत आणून ब्रिथ ॲनालाईझरद्वारे तपासणी करण्यात आली. तपासणीत त्याच्या रक्तातात अल्कोहोलचे प्रमाण आढळून आले. त्यामुळे त्याच्याविरुद्ध मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये वर्धा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच ऑटो रिक्षाची कागदपत्रे उपलब्ध नसल्याने संबंधित वाहन वानिशा, वर्धा येथे जप्त करण्यात आले. वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी नागरिकांना दारू पिऊन वाहन चालवू नये, असे आवाहन केले आहे.

# नागपूर रोडवर बस-कारची समोरासमोर धडक


### कार चालक जखमी

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर रोडवरील मामा-भांजा दर्गाहसमोर शनिवारी सायंकाळी



बस आणि कारमध्ये समोरासमोर धडक होऊन अपघात झाला. या अपघातात कार चालक जखमी झाला असून दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने बसमधील प्रवासी सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची एमएच-४० वाय-५३०९ क्रमांकाची बस नागपूरहून वर्ध्याकडे येत होती. सायंकाळी सुमारे ७.१५ वाजताच्या सुमारास बस मामा-भांजा दर्गाहसमोर पोहोचली असता विरुद्ध दिशेने येणाऱ्या एमएच-३२ एएस-



९९३० क्रमांकाच्या कारने बसला समोरून जोरदार धडक दिली.

या धडकेत कारच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. बसलाही धडकेचा फटका बसला. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. जखमी कार चालकाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.

दरम्यान, अपघातामुळे काही काळ नागपूर रोडवरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली. या प्रकरणाची पुढील चौकशी सुरू आहे.

# आज महिला दिनानिमित्त हिंदी विद्यापीठात रेस वॉकिंग

## महिला सशक्तीकरणाच्या विविध पैलूंवर तज्ज्ञांचे व्याख्यान उद्या

**वर्धा जनमाध्यम :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यापीठ येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आज रविवार, ८ मार्च रोजी रेस वॉकिंग स्पर्धा तर उद्या सोमवार, ९ मार्च रोजी महिला सशक्तीकरणावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

आज रविवार रोजी सकाळी आयोजित करण्यात आलेल्या रेस वॉकिंगची सुरुवात फादर कामिल बुल्के आंतरराष्ट्रीय विद्यार्थी वसतिगृह येथून होणार असून समारोप छत्रपती शिवाजी ममहारा प्रवेशद्वाराजवळ करण्यात येणार आहे. या उपक्रमात विद्यापीठातील



शिक्षक, कर्मचारी, संशोधक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. महिला सक्षमीकरणाचा संदेश देत आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करणे हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले.

याशिवाय उद्या सोमवार, ९ मार्च रोजी दुपारी १२ वाजता गालिब सभागृहात महिला सशक्तीकरणाचे विविध पैलू या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या कुलगुरू कुमुद शर्मा असतील.

मुख्य वक्त्या म्हणून गिता भट्ट मार्गदर्शन करणार असून कार्यक्रमात विद्यापीठाच्या अंतर्गत तक्रार समितीच्या अध्यक्षा अनुपमा गुप्ता तसेच आवासीय लेखिका क्षमा कौल या विशेष वक्त्या म्हणून उपस्थित राहतील.

या कार्यक्रमांद्वारे महिलांच्या सशक्तीकरणाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत समाजात सकारात्मक विचारांची रुजवात करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# नारीशक्तीचा गौरव आज

## पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान सोहळा, अंगणवाडी सेविका-मदतनिसांचा कला व सांस्कृतिक महोत्सव

**वर्धा जनमाध्यम :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आज, रविवार ८ मार्च रोजी वर्ध्यात नारीशक्ती सन्मान सोहळा आणि अंगणवाडी सेविका-मदतनिसांचा कला व सांस्कृतिक महोत्सव आयोजित केला जात आहे. हा कार्यक्रम चरखा सभागृह, सेवाग्राम येथे सकाळी १०.३० वाजता सुरू होणार असून, संपूर्ण दिवस रंगतदार सांस्कृतिक प्रदर्शनांनी उजळून नारीशक्तीचा गौरव करणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन व अध्यक्ष म्हणून पालकमंत्री डॉ. भोयर उपस्थित राहणार आहेत. यावेळी खासदार अमर काळे, आमदार दादाराव केचे, अभिजित वंजारी, सुधाकर



अडबाले, समीर कुणावार, राजेश बकाने, सुमित वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, गिमाटेक्स संचालक प्रेमलतादेवी मोहोता, एमआयटी पुणे प्रा. स्वाती कराड-चाटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले यांची उपस्थिती अपेक्षित आहे.

कार्यक्रमात अंगणवाडी सेविका-मदतनिसांनी नृत्य, गायन, अभिनय आणि विविध सांस्कृतिक कला सादर करून उपस्थितांचे मन जिंकण्याची तयारी केली आहे. संध्याकाळी ७.३० वाजता कला व सांस्कृतिक महोत्सवाचे बक्षीस वितरण व समारोप करण्यात येणार आहे.

आजच्या या सोहळ्यातून नारीशक्तीला सन्मान, सेविका-मदतनिसांच्या योगदानाचा गौरव आणि कलात्मक प्रतिभेचा उत्सव एकत्र साजरा होणार आहे. उपस्थितांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन महिलांच्या

# १.१० किलोचा थायरॉईड गलगंड काढण्यात डॉक्टरांना यश

## वर्ध्यातील ७२ वर्षीय रुग्णावर यशस्वी शस्त्रक्रिया

**वर्धा जनमाध्यम :** आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांनी अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडत ७२ वर्षीय रुग्णाच्या गळ्यातील तब्बल १.१० किलो वजनाचा थायरॉईड गलगंड काढून टाकण्यात यश मिळवले. या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला दीर्घकाळापासून होत असलेल्या त्रासातून मोठा दिलासा मिळाला आहे. अब्बास खान (वय ७२) यांच्या गळ्यात काही वर्षांपासून थायरॉईडची गाठ वाढत होती. गाठीचा आकार मोठा झाल्यामुळे त्यांना श्वास घेण्यास अडचण, अन्न गिळताना त्रास तसेच गळ्यावर सतत दबाव जाणवत होता. तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

ही शस्त्रक्रिया डॉ. श्रद्धा जैन (प्राध्यापक व विभागप्रमुख, ईएनटी विभाग) यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. त्यांच्या



टीममध्ये डॉ. चंद्रवीर सिंग, डॉ. मेघा कावळे आणि डॉ. गौतम एन. यांचा समावेश होता. रुग्णाला सुरक्षितरीत्या भूल देण्याची जबाबदारी डॉ. जयश्री सेन आणि त्यांच्या एनेस्थीसिया टीमने पार पाडली.

काही तास चाललेल्या शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांनी गळ्यातील मोठी थायरॉईड गाठ पूर्णपणे काढण्यात यश मिळवले. काढलेल्या गाठीचे वजन सुमारे १.१० किलो असून ती रक्तवाहिन्यांनी भरलेली मोठी गाठ होती. शस्त्रक्रियेनंतर गाठीचा नमुना पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली असून त्यांना आता श्वास घेणे व अन्न गिळणे सोपे झाले आहे. थायरॉईड ग्रंथी पूर्णपणे काढल्यामुळे पुढील काळात रुग्णाला हार्मोन संतुलनासाठी नियमित औषधे घ्यावी लागतील, अशी माहिती डॉक्टरांनी दिली.

# लंडनच्या जागतिक मंचावर वर्ध्याचा आवाज

## न्या. सी. एल. थुल प्रमुख अतिथी

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्याचे सुपुत्र आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे माजी न्यायमूर्ती सी. एल. थुल यांना बी, आर, आंबेडकर यांच्या नावाने आयोजित करण्यात येणाऱ्या वर्ल्ड लीडर डॉ. बी. आर. आंबेडकर इंटरनॅशनल अवॉर्ड-२०२६ या जागतिक सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. हा मानाचा कार्यकम लंडन येथे ८, ९ आणि १० मे २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.या तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन जागतिक नेते टेकमीडिया प्रा. लि. यांच्या पुढाकारातून एध्एए विद्यापीठ येथे होणार आहे. ८ मे रोजी आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिसंवाद आयोजित करण्यात येणार असून त्यात समता, न्याय, सुशासन, मानवाधिकार, शांतता आणि नवोपक्रम या विषयांवर जगभरातील विद्वान मार्गदर्शन करणार आहेत.९ मे रोजी आंतरराष्ट्रीय व्यवसाय परिसंवाद होणार असून त्यात विविध देशांतील उद्योजक, कॉर्पोरेट क्षेत्रातील प्रतिनिधी, नवोन्मेषक तसेच जागतिक स्तरावरील व्यावसायिक नेते सहभागी होणार आहेत. तर १० मे रोजी डॉ. आंबेडकर यांच्या



सन्मानार्थ आंबेडकर गौरव सोहळा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थेचे संचालक शिरीष रामटेके यांनी दिली.

न्या. थुल यांनी महाराष्ट्र अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आयोगाचे तसेच महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम करताना सामाजिक न्याय, मानवाधिकार आणि समतेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना या जागतिक सोहळ्यास निमंत्रित करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे युनायटेड इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल मॅनेजमेंट या प्रतिष्ठित संस्थेने त्यांना मॅनेजमेंट आणि लीडरशिप विषयात मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली आहे. देश-विदेशातील अनेक प्रतिष्ठित मंचांवर त्यांनी कायदा, मानवाधिकार आणि सामाजिक न्याय या विषयांवर व्याख्याने दिली आहेत.लंडन येथे होणाऱ्या या जागतिक कार्यक्रमासाठी न्या. थुल यांना मिळालेल्या आमंत्रणामुळे वर्धा शहरासह संपूर्ण विदर्भात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

# ‘हीट वेव्ह’चा इशारा; वर्ध्यात उकाड्याची झळ तीव्र

## पुढील दोन दिवस तापमान वाढणार; नागरिकांना दक्षतेचा सल्ला

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असून वर्धा जिल्ह्यावर ‘हीट वेव्ह’ची छाया दाटली आहे. नागपूर येथील प्रादेशिक हवामान वेधशाळेने वर्धा, अकोला आणि अमरावती जिल्ह्यांसाठी पुढील दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. शनिवारी जिल्ह्यात सूर्य अक्षरशः आग ओकत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. कडक उन्हामुळे दुपारच्या सुमारास शहरातील रस्त्यांवरील वर्दळही काही प्रमाणात कमी झाल्याचे दिसून आले.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील दोन दिवस कमाल तापमानात सामान्यापेक्षा सुमारे ३ ते ४ अंश सेल्सियसने वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या वर्धा जिल्ह्यात तापमानाने ४० अंश सेल्सियसचा टप्पा ओलांडला असून उष्ण वाऱ्यांमुळे उकाड्याची तीव्रता अधिक जाणवत आहे. परिणामी दुपारच्या वेळेत उष्णतेचा तडाखा अधिक तीव्र होत



असल्याचे नागरिकांना अनुभवायला मिळत आहे.

दरम्यान, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासन व हवामान विभागाकडून करण्यात आले आहे. तज्ज्ञांच्या मते दुपारच्या वेळी कडक उन्हामुळे उष्माघाताचा धोका वाढू शकतो. त्यामुळे शक्यतो दुपारी घराबाहेर पडणे टाळावे तसेच शरीरातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी व द्रवपदार्थांचे सेवन करावे, असा सल्ला देण्यात आला आहे.

उकाड्यात अशी घ्या काळजी

दुपारी १२ ते ३ या वेळेत शक्यतो घराबाहेर जाणे टाळावे.

दिवसभर पाणी, लिंबूपाणी, ताक किंवा इतर द्रवपदार्थ घ्यावेत.

हलके, सैल व फिकट रंगाचे सूती कपडे परिधान करावेत.

बाहेर पडताना टोपी, गॉगल किंवा छत्रीचा वापर करावा.

चहा, कॉफी व कार्बोनेटेड पेयांचे सेवन मर्यादित ठेवावे.

उन्हाच्या वाढत्या तडाख्यामुळे पुढील काही दिवस नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांनी अधोरेखित केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय



## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# सर्वसमावेशक अर्थसंकल्प

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत अर्थसंकल्प सादर केला. नव्या पिढीतील नेतृत्वाकडे राज्यांची सूत्र गेल्यापासून साधारणतः गेल्या दहा वर्षांत देशातील अनेक राज्यांत परकीय गुंतवणुकीसाठी, केंद्राच्या योजनांमध्ये अधिक वाटा मिळवण्यासाठी, नवोद्योग आणि नवोपचारांना आकर्षित करण्यासाठी, पायाभूत सुविधांच्या विस्तारातून आपले राज्य अधिकाधिक उद्योगस्नेही करण्यासाठी निकोप स्पर्धा सुरू आहे. या सर्व नवनेतृत्वामध्ये फडणवीस यांचा नंबर सर्वात वर आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील कारभाराकडे, इथल्या योजना आणि त्यासाठीच्या विविध तरतुदींकडे इतर राज्यांचे बारकाईने लक्ष असते. त्या सर्व विकासेच्छु नवनेतृत्वाने अनुकरण करावे, असाच महाराष्ट्राचा यंदाचा अर्थसंकल्प आहे, यात वाद नाही. फडणवीस यांच्या दूरदृष्टीचा, सम्यक विचारांचा आणि विकासशील नीतीचा प्रत्यय त्यातील वाक्या-वाक्यातून येतो आहे. कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा-खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास-वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळाचे स्वच्छ दर्शन होते. सामाजिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्राचा विचार करून, त्यातल्या बाबींवर भरघोस तरतुदी करूनही राजकोषीय तूट स्थूल उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या आत ठेवण्याचे कौशल्य अर्थसंकल्पात साधले आहे, हे विशेष. देशातली सगळीच राज्य कर्जांच्या ओझ्याखाली वाकत चालली आहेत. वाढते शहरीकरण, या शहरांना सुविधा पुरवण्याचा ताण, अस्थिर राजकारण आणि त्यामुळे करावा लागणारा मतदाराचा अधिकाधिक अनुनय, त्यातून आलेल्या 'फुकट वाटप योजना' आणि कर आकारणीचे केंद्रीकरण, यांमुळे राज्य कात्रीत सापडली आहेत. महाराष्ट्र यात वेगळा नाही. तरीही यावेळचा अर्थसंकल्प सर्वंकष वाटतो आहे, तो फडणवीस यांच्या धाडस आणि आत्मविश्वासामुळे. वातावरणीय बदल, पर्यावरणाचं रक्षण, सार्वजनिक स्वच्छता, नैसर्गिक संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि किफायती वापर, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन, त्यासाठी तंत्रशिक्षणाचा प्रसार, सर्वांसाठी आरोग्य आणि रोजगाराच्या पुरेशा संधी हे आजच्या 'जेन-झी' चे जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत. अर्थसंकल्पाने या सगळ्याच क्षेत्रांना योग्यरीत्या न्याय दिला असून त्यातून राज्याची भविष्याची दिशाही स्पष्ट केली आहे. राज्यासाठी आणि राज्यातील जनतेसाठी अत्यंत दिलासादायक अर्थसंकल्प म्हणून या अर्थसंकल्पाची नोंद करावी लागेल. महाराष्ट्र हे देशातील विकसित राज्य आहे. विकसित राज्यासमोरही अनेक आव्हाने असतात. मागास राज्यांची थोडीशी प्रगतीही आकड्यांमध्ये, टक्केवारीत मोठी दिसते. विकसित राज्यांचे तसे नसते. एका विशिष्ट स्थितीला पोहोचल्यानंतर त्यानंतरची प्रगती आकड्यांमध्ये धीम्या गतीनेच पुढे सरकताना दिसते. विकसित राज्यातील जनतेच्या आकांक्षाही विकसितच असतात! त्या आकांक्षा पुर्ण करण्यासाठी लागणारी गुंतवणूक, नावीन्यपूर्ण कल्पनांचे प्रयोग राबवण्यासाठी घ्यावी लागणारी जोखीम सोपी नसते. राज्य प्रगतीच्या वरच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर राज्यकर्त्यांसमोर उभी राहणारी आव्हानेही त्याच उंचीची असतात. कालच्या अर्थसंकल्पात या आव्हानांची जाणीव पदोपदी दिसते आहे. राज्य शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येही गेली काही वर्षं आघाडीवर आहे. परस्परविरोधी; पण हे सत्य आहे. हा विरोधाभास संपवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल म्हणून या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी निश्चितच दिलासादायक ठरू शकते. एकूण कर्जातला दोन लाखांचा वाटा सरकारने उचलला, तरी बऱ्याच शेतकऱ्यांना त्यातून पुढच्या प्रयत्नांसाठी दिलासा मिळू शकतो. अशी कर्जमाफी यापूर्वी झाली नाही, असे नाही. त्या प्रत्येक वेळी तात्कालिक दिलासाही मिळाला. तो आवश्यक असला, तरी त्याने समस्या संपली नाही. पशुपालन, मत्स्यव्यवसायाची जोड हेच शेतीतल्या समस्यांना अधिक शाश्वत उत्तर आहे. 'प्राकृतिक शेती अभियान', 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना', आणि 'मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना' समस्येवरचा दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय ठरू शकतात. महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक वीज, पाणी आणि अर्थ पुरवठा या तिन्हींचाही अर्थसंकल्पात साकल्याने केलेला विचार ग्रामीण महाराष्ट्रात नवचैतन्य आणल्याशिवाय राहणार नाही. परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र हे देशातले पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. हल्ली असा एकही आठवडा जात नाही, जेव्हा कोणत्या ना कोणत्या राष्ट्राचा प्रमुख किंवा औद्योगिक शिष्टमंडळ मुंबई भेटीवर नसते. फडणवीस यांनी या आघाडीवर राज्याची आघाडी कायम ठेवली आहेच; पण अशा गुंतवणूकदारांना अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पायाभूत विकासासाठी केलेल्या तरतुदी अधिक आश्वासक आहेत. राज्यात आठ ते दहा 'एज्युसिटी' विकसित करण्याची, महामुंबईत नवी झोपडी उभी राहू नये यासाठी 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क', मुंबई आणि परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून भुयारी मार्गांचे जाळे, समृद्धी महामार्गाला मालवाहतूक कॉरिडॉरची जोड, 'महाराष्ट्र आरोग्य सार्वजनिक संस्थे'ची स्थापना किंवा कर्करोग, मधुमेह, हृदयरुग्णांच्या निदानासाठी ग्रामीण महाराष्ट्रात ४ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी ह्या या अर्थसंकल्पातील विचारांची खोली दर्शवणाऱ्या बाबी आहेत. राज्याच्या विकासाच्या अंगोपांगांचा विचार करून काळाची पावले आणि गती ओळखून तयार केलेला हा अर्थसंकल्प म्हणूनच कौतुकास्पद आहे. महात्मा फुले यांचे २०० वे जयंती वर्ष आणि संत गाडगेबाबांचे १५० वे जयंती वर्ष साधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणासह हे वर्ष 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करण्याची कल्पना मांडून महायुतीने आपल्या सर्वसमावेशक विकासरथावर सामाजिक न्यायाचे जे निशाण फडकावले आहे, ते सर्वार्थसूचक आहे!

# शेतकऱ्यांची कर्जमाफीवर बोळवण

**अर्थसंकल्पाच्या पूर्वसंध्येला मांडलेल्या आर्थिक पाहणी अहवालात शेतीची पीछेहाट अधोरेखित केली होती. त्यामुळे या वर्षीच्या अर्थसंकल्पात यावर ठोस कार्यक्रम मुख्यमंत्री जाहीर करतील, अशी अपेक्षा होती. मात्र कर्जमाफीच्या घोषणेवरच शेती क्षेत्राची बोळवण केली आहे.**



बदलत्या वातावरणामुळे शेती अस्थिर आणि असुरक्षित झाली आहे. यातून शेतीला आणि शेतकऱ्यांना सावरण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपायांची गरज आहे. अर्थसंकल्पात सरकारने शेतीच्या डिजिटल प्रकल्प आणि 'एआय'ला प्राधान्य दिल्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. सरकार ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी, को-ऑप. स्टॅक इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम उभारत आहे. या उपक्रमांमधून शेतीत एआयसाठी आवश्यक डाटा उपलब्ध होत आहे.

आतापर्यंत देशात पीक लागवड, उत्पादन, शेतकरी आणि शेतमजुरांच्या आकडेवारीत अनेक दोष आढळत आले आहेत. त्यामुळे धोरण ठरविताना आणि राबविताना अनेक अडचणी येत होत्या. पण आता या डिजिटल उपक्रमांच्या माध्यमातून यावर तोडगा निघेल, असा आशावाद तयार झाला आहे. तसेच महाविस्तार एआय, वसुधा व्हॉइस टेलिफोनी, पशू टेलिफोनी, महाराष्ट्र ॲग्रिकल्चर डेटा एक्स्चेंज, एआय सक्षम सँडबॉक्स इत्यादी उपक्रम राबविले जात आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

मात्र एआयच्या बाबतीत आतापर्यंत सरकारचे धोरण घोषणेपलीकडे जाताना दिसले नाही. मागील अर्थसंकल्पात ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी केवळ ३० कोटी रुपये खर्च केल्याची माहिती आहे. त्यातही एआय समिटवर झालेला खर्च जास्त आहे. प्रत्यक्ष जमिनीवर काम करण्यासाठी सरकारने पैसा दिलेला नाही. यंदाच्याही अर्थसंकल्पात एआयसाठी केवळ १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद कमी आहे.

राज्य सरकारने कृषी समृद्धी योजना जाहीर करताना पीकविमा योजनेतून जवळपास पाच हजार कोटी रुपये या योजनेकडे वळविले होते. त्या वेळी शेतीत दरवर्षी शेततळी, विहिरी, पाइपलाइन, ठिबक आदी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी हे पाच हजार कोटी रुपये वापरले जातील, असे सरकारने सांगितले होते. पण प्रत्यक्षात कृषी समृद्धी योजनेसाठी दोन हजार कोटींचीच तरतूद केली आहे. मागील वर्षभरात महाडीबीटीच्या माध्यमातून मिळणारे अनुदान शेतकऱ्यांना मिळालेले नाही. शेतकरी या अनुदानाची वाट पाहत आहेत.

त्यातच अर्थसंकल्पात तरतूद कमीच केलेली आहे. पावसाचे बदलते स्वरूप, कमी दिवसांत जास्त पाऊस, पावसातील खंड या काळात शाश्वत सिंचनाचे पर्याय आवश्यक असतात. पण सरकारचा खर्च दोन वर्षांपासून या योजनांवर कमी होत आहे. मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेसाठी २०२५-२६ मध्ये ५०० कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. २०२६-२७ साठी मात्र केवळ २० कोटी रुपये दिले आहेत. तसेच कृषी यांत्रिकीकरण योजनासाठी ४०० कोटी रुपये यंदा खर्च झाले आहेत. पुढील वर्षभरासाठी केवळ २० कोटींची तरतूद केली आहे. याचा थेट शेतीच्या विकासावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

येणाऱ्या मॉन्सूनवर 'एल निनो'चे सावट असल्याने पाऊसमान कमी राहण्याची शक्यता अनेक जागतिक हवामान संस्थांनी व्यक्त केली आहे. याचा उल्लेख करत मुख्यमंत्र्यांनी पिण्यासाठीचे पाणी राखून ठेवणार, जलयुक्त शिवार, जलसंधारण योजना व वैरण विकास उपाययोजना राबविणार असे सांगितले. पण अशा संकटाला सामोरे जाताना शेतकऱ्यांना अगदी खते-बियाणे, पेरणीचा सल्ला, गरज पडल्यास आर्थिक मदतीची गरज असते.

यापूर्वी २०२३ मध्ये असेच संकट आले होते. त्या वेळी पीक उत्पादनात मोठी घट झाली होती. आधीच २०२५ च्या खरिपात अतिवृष्टीने कडधान्य उत्पादनात २८ टक्के, तेलबिया उत्पादनात २८ टक्के झाली आहे. तसेच तांदूळ, ज्वारी, बाजरी, नाचणी उत्पादनांतही घट झाल्याचे आर्थिक पाहणी अहवालात म्हटले आहे. आता यंदाच्या खरिपावर एल निनोचे सावट असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पण सलग दुसऱ्या वर्षी खरिपावर येऊ घातलेल्या संकटावर सरकारची तयारी काय, यावर सरकारचे उत्तर जलयुक्त शिवार आणि जलसंधारण असे आहे. बरं, या दोन्ही योजनांची स्थिती काय, हे नव्याने सांगण्याची गरज नाही.

### कर्जमाफीत दुजाभाव का?

सरकारने अर्थसंकल्पात दोन लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली. परदेशी समितीच्या शिफारशीनुसार अटी लावल्या जाणार आणि नंतर पात्र शेतकरी ठरवले जाणार आहेत. पण कर्जमुक्तीचे आश्वासन असताना दोन लाखांची मर्यादा घातल्याने फळपिकांसाठी जास्त खर्च लागणारी पिके घेणारे शेतकरी अडचणीत येणार आहेत. यापूर्वीही २०१९ मध्ये जाहीर केलेल्या कर्जमाफीत अशा शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंतच लाभ देण्यात आला होता. नैसर्गिक संकटात सर्वच शेतकऱ्यांचे नुकसान होत असते.जास्त गुंतवणूक असलेल्या शेतकऱ्यांचे जास्त नुकसान होते. मग कर्जमाफी करताना अशा शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याची भावना मागील दोन कर्जमाफीच्या वेळीही व्यक्त होत होती. फळपिकांसह जास्त गुंतवणूक असलेल्या पिकांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा खर्च जास्त असतो, त्यांची गुंतवणूक जास्त असते. त्यामुळे बँकाही त्यांना जास्त कर्ज देतात. अशा पिकांमुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याचे केंद्र सरकारने अधोरेखित केले आहे. तसेच या पिकांच्या मूल्यसाखळीवर केंद्रीय अर्थमंत्र्यांनी जोर दिलेला आहे. परंतु संकटात आधार देताना मात्र दुजाभाव केला जात आहे.

### फसवे पॅकेज

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जून ते सप्टेंबर २०२५ या चार महिन्यांमध्ये अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी ७ ऑक्टोबर २०२५ रोजी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे आर्थिक पॅकेज जाहीर केले होते. ९ ऑक्टोबर रोजी शासन आदेश काढत त्याचा तपशीलही दिला होता. मात्र अर्थसंकल्पात या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १५ हजार ४९२ कोटींची मदत दिल्याचे सरकारने म्हटले आहे.म्हणजेच सरकारने अतिवृष्टिग्रस्तांची शासन आदेश काढून फसवणूक केली असे म्हणायला हरकत नाही. शेतकरी संकटात असताना त्यांचा रोष कमी करण्यासाठी सरकारने 'हेडिंग मॅनेजमेंट' करून वेळ मारून नेली.

राज्य, केंद्राच्या विविध योजनांमधून अवास्तव आकड्यांची गोळाबेरीज करून ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज बसवले आणि शेतकऱ्यांची दिशाभूल केली, हे सरकारनेच अर्थसंकल्पातून उघड केले आहे.

**अनिल जाधव**

## महाराष्ट्र अर्थसंकल्प २०२६-२७

# शिक्षण क्षेत्रातील घोषणांची चमक की वास्तवातील कमतरता?

महाराष्ट्र राज्याचा आर्थिक विकास, सामाजिक समता आणि लोकशाहीची गुणवत्ता यांचे खरे आधारस्तंभ म्हणजे शिक्षण व्यवस्था होय. कोणत्याही राज्याचा दीर्घकालीन विकास घडविण्यासाठी कुशल, संशोधनक्षम आणि मूल्याधिष्ठित मनुष्यबळ तयार करणे अत्यावश्यक असते. त्यामुळे शिक्षणावरील सार्वजनिक गुंतवणूक ही खर्च नसून विकासातील सर्वात महत्त्वाची गुंतवणूक मानली जाते. तथापि, २०२६-२७ च्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या तरतुदींचा बारकाईने अभ्यास केला असता घोषणांची चमक अधिक आणि वास्तवातील आर्थिक बांधिलकी तुलनेने कमी असल्याचे चित्र दिसून येते. या अर्थसंकल्पाचा एकूण आकार ७.६९ लाख कोटी रुपये इतका असून महसुली उत्पन्नाचा अंदाज ६.१६ लाख कोटी रुपये, तर महसुली खर्चाचा अंदाज ६.५६ लाख कोटी रुपये इतका आहे. राज्याच्या आर्थिक वाढीला गती देण्याच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प मांडण्यात आला असला, तरी शिक्षण क्षेत्रासाठी करण्यात आलेल्या तरतुदींचा सखोल अभ्यास केला असता घोषणांची चमक अधिक आणि वास्तवातील आर्थिक बांधिलकी तुलनेने मर्यादित असल्याचे चित्र स्पष्ट होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार देशातील शिक्षण क्षेत्रावर सकल देशांतर्गत उत्पादनाच्या जी.डी.पी. किमान ६ टक्के खर्च करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. हा निकष भारतातील शिक्षणाच्या गुणवत्तेत आमूलाग्र बदल घडविण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो. परंतु वास्तवात केंद्र आणि राज्य सरकारांचा एकत्रित शिक्षण खर्च आजही या निकषाच्या आसपासही पोहोचलेला नाही. सध्या भारतात शिक्षणावर सुमारे ३ ते ४ टक्के जी.डी.पी. इतकाच खर्च होतो. त्यात केंद्र सरकारचा हिस्सा साधारण १.५ टक्के, तर राज्य सरकारांचा एकत्रित हिस्सा २ ते २.५ टक्के इतका आहे. महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्यातही शिक्षण क्षेत्रावर खर्च साधारण ३ ते ३.५ टक्क्यांच्या आसपास असल्याचे विविध आर्थिक अभ्यासांतून दिसून येते. त्यामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ज्या ६ टक्के खर्चाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे, त्या दिशेने ठोस वाटचाल अद्याप दिसून येत नाही.



**२०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पात शिक्षण क्षेत्रासाठी काही नावीन्यपूर्ण उपक्रमांची घोषणा करण्यात आली असली तरी त्यामागील आर्थिक बांधिलकी मर्यादित असल्याचे स्पष्ट दिसते. घोषणांची आकर्षक मांडणी केली आहे. परंतु प्रत्यक्षात उपलब्ध होणारा निधी यामधील दरी भरून काढणे हीच आजची खरी गरज आहे. अन्यथा शिक्षण क्षेत्रात केलेल्या या तरतुदी 'तोंडाला पाणी पुसण्याइतपत' मर्यादित राहतील, अशी भीती व्यक्त करावी लागेल.**

२०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पात शिक्षण विभागासाठी काही योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. उदा. मिशन संपूर्ण संपूर्ण शिक्षण अभियान विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास योजना, मिशन सफल मूलभूत साक्षरता व गणितीय कौशल्यांचे मूल्यांकन करणे योजना आहे. डिजिटल वर्गखोल्यांचे टप्प्याटप्प्याने डिजिटायझेशन, विज्ञान प्रयोगशाळांचे अद्ययावतीकरण, विद्यार्थ्यांना टॅबचे वितरण, 'जादुई पिटारा' उपक्रम, सायबर साक्षरता प्रशिक्षण, खगोलशास्त्रीय प्रयोगशाळा, विज्ञान पार्क, पर्यावरण संवर्धन कार्यक्रम इत्यादी उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. या योजना पाहता शिक्षण क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याचा प्रयत्न दिसून येतो. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, संगीत, क्रीडा, कार्यानुभव यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्नही करण्यात आला आहे.

परंतु या योजनांची आर्थिक व्याप्ती पाहिली असता अनेक बाबी प्रतीकात्मक स्वरूपाच्या वाटतात. उदा. विज्ञान प्रयोगशाळांच्या अद्ययावतीकरणासाठी केवळ १० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील प्राथमिक ते माध्यमिक २२,००० हजार निमशासकीय अनुदानित शाळा,सरकारी शाळा ६५,००० पेक्षा अधिक, खासगी शाळा २२,३००, एकूण शाळा १,१०,००० पेक्षा अधिक आहे.तसेच सरकारी महाविद्यालये सुमारे २३०-२५० ,अनुदानित महाविद्यालये ६०० पेक्षा अधिक, खासगी महाविद्यालये २,००० पेक्षा अधिक,एकूण महाविद्यालये ३००० पेक्षा अधिक आहे. या शाळाआणि महाविद्यालय तुलनेत ही रक्कम अत्यंत नगण्य आहे. तसेच डिजिटल वर्गखोल्यांसाठी करण्यात आलेली तरतूदही मर्यादित आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण व निमशासकीय शाळांमध्ये अद्यापही मूलभूत डिजिटल सुविधा उपलब्ध नाहीत. इंटरनेट कनेक्टिव्हिटी, स्मार्ट बोर्ड, संगणक प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षणसामग्री यांचा मोठ्या प्रमाणावर अभाव आहे. अशा परिस्थितीत शाळांचे १०० टक्के डिजिटलायझेशन करण्यासाठी आवश्यक असलेली मोठ्या प्रमाणातील गुंतवणूक अर्थसंकल्पात दिसून येत नाही.

अर्थसंकल्पात 'एज्युसिटी' प्रकल्प, परदेशी विद्यापीठांशी सहकार्य, परदेशी रोजगारासाठी मार्गदर्शन, स्टार्टअप संस्कृतीला चालना यांसारख्या योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्राला भविष्यात ५० हजार स्टार्टअप उद्योगांचे केंद्र बनविण्याचे उद्दिष्टही मांडण्यात आले आहे. या योजना नक्कीच भविष्योन्मुख आहेत. जागतिक पातळीवरील शिक्षण आणि उद्योग क्षेत्राशी महाराष्ट्राचे नाते अधिक मजबूत करण्यासाठी त्या उपयुक्त ठरू शकतात.परंतु या सर्व योजना यशस्वी होण्यासाठी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची भक्कम पायाभरणी आवश्यक असते. जर शाळा स्तरावरच गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध नसेल, तर उच्च शिक्षणातील जागतिकीकरणाचा लाभ मर्यादित वर्गालाच मिळेल. म्हणूनच शिक्षण व्यवस्थेच्या तळागाळातील समस्या सोडविणे अत्यावश्यक आहे.

आज राज्यातील अनेक शासकीय आणि अनुदानित शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत. काही ठिकाणी एकाच शिक्षकावर अनेक वर्गांचा भार आहे. प्रयोगशाळा, ग्रंथालये, क्रीडांगणे, स्वच्छतागृहे यांसारख्या मूलभूत सुविधांचीही कमतरता आहे. डिजिटल शिक्षणाच्या युगात अनेक शाळांमध्ये संगणकच उपलब्ध नाहीत. या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक आवश्यक आहे.त्याचप्रमाणे उच्च शिक्षण क्षेत्रालाही अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. विद्यापीठांना संशोधनासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. महाविद्यालयांमधील प्राध्यापक पदे दीर्घकाळ रिक्त राहतात. संशोधन प्रयोगशाळा, नवोन्मेष केंद्रे आणि उद्योग-शिक्षण सहकार्य यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ अपुरे आहे. ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था उभारण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांना अधिक सक्षम करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे.

शिक्षणावर होणारी सार्वजनिक गुंतवणूक वाढविणे हा केवळ आर्थिक व्यवस्थापनाचा प्रश्न नसून तो सामाजिक न्यायाशी निगडित असलेला मूलभूत प्रश्न आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची समान संधी मिळणे ही लोकशाही राज्यव्यवस्थेची किमान अपेक्षा आहे. विशेषतः ग्रामीण, आदिवासी आणि सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण हे सामाजिक प्रगतीचे आणि उन्नतीचे सर्वात प्रभावी साधन ठरते. म्हणूनच शिक्षणावरील खर्च वाढविणे ही राज्य सरकारची अत्यंत महत्त्वाची आणि प्राथमिक जबाबदारी मानली पाहिजे. मात्र प्रत्यक्षात या बाबीकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचे दिसून येते, ही गोष्ट शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने निश्चितच दुर्दैवी आणि चिंताजनक आहे.

**प्रा.डॉ.प्रशांत विघे**
सिनेट सदस्य, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
मो.९३२६८७७४९

# ‘समाधान शिबीर अभियान’ हा लोकाभिमुख उपक्रम

## जिल्ह्यातील नागरिकांनी महसूल सुविधांचा लाभ घ्यावा, पालकमंत्री ना. संजय राठोड यांचे आवाहन, गावपातळीवर आजपासून शिबिरांना प्रारंभ

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - जिल्ह्यातील शेतकरी, महिला, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना महसूल सेवांचा लाभ गावपातळीवर मिळावा या उद्देशाने राज्य शासनाने ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ अभियान हा लोकाभिमुख प्रशासनाची संकल्पना प्रत्यक्षात उतरविणारा अत्यंत उपयुक्त आणि जनहिताचा उपक्रम आहे. जिल्ह्यातील शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी केले आहे.



आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनी शासन-प्रशासन हे जनतेच्या हितासाठी असले पाहिजे, हा आदर्श घालून दिला. न्याय, पारदर्शकता आणि लोककल्याण ही त्यांच्या प्रशासनाची वैशिष्ट्ये होती. त्याच विचारातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात आज ‘प्रशासन आपल्या दारी’ ही संकल्पना पुढे नेण्याचे काम शासन आणि जिल्हा प्रशासन करत आहे. आजही ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित कामांसाठी वारंवार कार्यालयात जावे लागते. अनेकदा माहितीअभावी किंवा प्रक्रियेच्या गुंतागुंतीमुळे त्यांची कामे प्रलंबित राहतात. अशा परिस्थितीत प्रशासनाने स्वतः नागरिकांच्या दारी जाऊन त्यांच्या समस्या सोडवणे, ही लोकाभिमुख शासन व्यवस्थेची खरी ओळख आहे. या पार्श्वभूमीवर आजपासून गावपातळीवर २२ मे २०२६ पर्यंत जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये आणि प्रत्येक महसूल मंडळ तसेच नगरपरिषद स्तरावर हे विशेष शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या शिबिरांमध्ये नागरिकांना १५ पेक्षा अधिक महसुली सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या शिबिरांमध्ये अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली फेरफार प्रकरणे निकाली काढणे, सातबारा उताऱ्यातील चुकांची दुरुस्ती करणे, डिजिटल स्वाक्षरी असलेले सातबारा आणि ८-अ उतारे देणे यासारख्या महत्त्वाच्या सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच उत्पन्न, रहिवासी, जात आणि नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रे मिळविण्याची सुविधाही नागरिकांना उपलब्ध होणार आहे. यासोबतच अकृषक (एनए) परवानगी संदर्भातील मार्गदर्शन, सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ, विद्यार्थ्यांसाठी विविध दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनासंबंधी प्रकरणांचा निपटारा, घरांसाठी पट्टे वाटप आणि ई-मोजणी अर्ज स्वीकारणे यासारखी अनेक कामे या शिबिरांमधून केली जाणार आहेत. तसेच ॲग्रीस्टॅक आणि पीएम किसान नोंदणी, भूसंपादन व अकृषक परवानगी संदर्भातील प्रकरणे, गाव दप्तर अद्यावत करण्याची कामेही या शिबिरांमध्ये करण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी अनेक सुविधा मिळणार असून त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम मोठ्या प्रमाणात वाचणार आहे. जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या शिबिरांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले आहे. या अभियानाच्या यशासाठी प्रशासनाने लोकाभिमुख दृष्टीकोनातून काम करावे. नागरिकांच्या समस्या संवेदनशीलतेने ऐकून त्यांचे त्वरित निराकरण करावे. तसेच हे अभियान अधिक प्रभावीपणे राबवून शासनाच्या विविध योजना आणि सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन देखील पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी केले आहे.

# रुग्णालयातील पाणीटंचाईवर संजय झोटिंग यांचा पुढाकार; १२ वर्षांची बंद विहीर पुन्हा सुरू

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा : येथील उपजिल्हा रुग्णालय पांढरकवडा परिसरातील मागील १२ वर्षांपासून बंद अवस्थेत असलेली विहीर पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी माजी शहरप्रमुख संजय झोटिंग (शिवसेना उ.बा.ठा.) यांनी पुढाकार घेतला आहे. वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर त्यांनी स्वखर्चाने विहीर स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली असून, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली सातूरवार व संदीप दीपक जाजुलवार यांचे सहकार्य लाभत आहे.



सदर विहीर सततच्या दुर्लक्षामुळे गाळ, कचरा व झाडाझुडपांनी पूर्णपणे भरून वापरण्यायोग्य राहिली नव्हती. सध्या रुग्णालयात केवळ एकच बोरवेल कार्यरत असल्याने वाढत्या रुग्णसंख्येमुळे पाण्याची टंचाई तीव्र होत आहे. उन्हाळा जवळ आल्याने परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, २०१४ साली बांधण्यात आलेले ट्रामा केअर सेंटर अद्याप आवश्यक यंत्रणा व डॉक्टरांच्या अभावामुळे सुरू होऊ शकलेले नाही. भविष्यात हे केंद्र सुरू झाल्यास तसेच सध्या सुरू असलेल्या डायलेसिस सेंटरसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे पर्यायी जलस्रोत उपलब्ध होणे अत्यावश्यक बनले आहे. गेल्या तीन दिवसांपासून विहिरीतील गाळ उपसणे, कचरा काढणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे काम सातत्याने सुरू आहे. स्वखर्चातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत असून, सामाजिक बांधिलकीचे हे उत्तम उदाहरण ठरत आहे. दरम्यान, या संदर्भात वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली सातूरवार यांनी यापूर्वी नगरपरिषदेकडे पत्राद्वारे मागणी केली होती; मात्र प्रशासनाकडून ठोस कार्यवाही झालेली नाही. मुख्याधिकाऱ्यांनी हा विषय त्यांच्या कार्यक्षेत्रात येत नसल्याचे सांगून जबाबदारी झटकली असल्याची माहिती समोर आली आहे. नवनिर्वाचित नगरपरिषद अध्यक्ष अतिश बोरेले यांनी या विषयावर लवकरच ठराव घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. ही विहीर पुन्हा सुरू झाल्यास रुग्णालयातील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी होऊन रुग्णसेवेला मोठा दिलासा मिळणार आहे. संजय झोटिंग यांच्या या उपक्रमातून सार्वजनिक समस्यांवर सकारात्मक मार्ग काढण्याची नवी दिशा मिळाल्याचे नागरिकांकडून सांगितले जात आहे.

## • वेचक

### सर्व समावेशक विकासाला गती देणारा अर्थसंकल्प : आ. किसनराव वानखेडे



महागाव - प्रगतीशील, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देणारा तसेच सुशासन व गतिमानतेच्या चार भक्कम स्तंभांवर उभा असलेला “व्हिजन महाराष्ट्र” राज्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. आज सादर करण्यात आलेला राज्याचा अर्थसंकल्प हा केवळ आकड्यांचा दस्तऐवज नसून महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी दूरदृष्टी, ठोस दिशा आणि सर्वसमावेशक विकासाची भूमिका स्पष्ट करणारा आहे. राज्याच्या शाश्वत, सर्वांगीण आणि सर्वसमावेशक विकासाचा स्पष्ट आराखडा या अर्थसंकल्पातून मांडण्यात आला आहे. राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी सादर केलेल्या या दूरदर्शी अर्थसंकल्पाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार. या अर्थसंकल्पामध्ये अनेक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या असून विशेषतः शेतकऱ्यांसाठी जाहीर करण्यात आलेली कर्जमाफी योजना आणि “मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण” योजना कायम ठेवण्याचा निर्णय यामुळे राज्यातील कोट्यवधी शेतकरी बांधव आणि महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत “पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमाफी योजना” जाहीर करण्यात आली आहे. तसेच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची घोषणा करण्यात आली आहे. हा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या चौफेर विकासाची सर्वसमावेशक मांडणी करणारा असून ग्रामीण भागाच्या विकासाबरोबरच नागरी भागातील सर्व घटकांच्या प्रगतीचा संकल्प यातून व्यक्त करण्यात आला आहे. याशिवाय ज्यांनी महाराष्ट्र घडविला आणि समाजात माणुसकीचे संस्कार रुजविले अशा थोर समाजसुधारकांच्या स्मरणार्थ येणारे वर्ष “सामाजिक समता व समरसता वर्ष” म्हणून साजरे करण्याची घोषणा ही या अर्थसंकल्पातील सामाजिक जाणीव अधोरेखित करणारी महत्त्वपूर्ण बाब आहे. एकूणच, राज्याच्या विकासाला नवी गती देणारा, शेतकरी, महिला, ग्रामीण व नागरी समाजघटकांना बळ देणारा आणि सामाजिक समतेचा विचार अधोरेखित करणारा हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला प्रगतीच्या नव्या शिखरावर नेणारा ठरेल, असा विश्वास आहे. आ. किसनरावजी वानखेडे, उमरखेड - महागाव विधानसभा मतदारसंघ ८२

# पाटीपुरा झोपडपट्टीच्या विकासासाठी दिल्लीपर्यंत धाव..!

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शहरातील पाटीपुरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर झोपडपट्टीच्या विकासाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, येथील नागरिकांना जमिनीचा मालकी हक्क देणे व मूलभूत सुविधांसाठी शासकीय निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करत सामाजिक कार्यकर्त्यांनी थेट दिल्ली गाठली. केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांना यासंदर्भात सविस्तर निवेदन देण्यात आले.

पाटीपुरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर झोपडपट्टीत मागील सुमारे ५० वर्षांपासून हजारो नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र इतक्या वर्षांनंतरही या वस्तीच्या विकासाकडे शासनाचे अपेक्षित लक्ष गेले नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. विशेषतः जमिनीचा मालकी हक्क, रस्ते, नाली, पिण्याचे पाणी, वीज व इतर मूलभूत सुविधांचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते ॲड. राहुल पाटील, अक्षय खोब्रागडे, सम्यक शेलारे आणि शैलेश तागडे यांनी नवनीत महाजन यांच्या माध्यमातून दिल्ली येथे जाऊन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची भेट घेतली. यावेळी सामाजिक न्याय विभाग तसेच इतर



शासकीय योजनांच्या माध्यमातून वस्तीचा विकास करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच नागरिकांना जमिनीचा मालकी हक्क देण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. निवेदनाची दखल घेत आठवले यांनी तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधत यवतमाळ जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्याशी चर्चा केली. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही संवाद साधून या प्रश्नावर तातडीने मार्ग काढण्याचे निर्देश दिले. पाटीपुरा वस्तीशी आपले जुने नाते असल्याचे सांगत या परिसरातील रस्ते व इतर विकासकामांसाठी यापूर्वीही निधी उपलब्ध करून दिल्याची आठवण आठवले यांनी करून दिली. तसेच वस्तीतील नागरिकांना काही प्रमाणात तातडीने सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-मेलद्वारे संबंधित विभागांना पत्रव्यवहारही करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# भोयर (ई-क्लास) गावातील पाणीटंचाई व मूलभूत सुविधांबाबत मागणी..! जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - यवतमाळ शहरालगत असलेल्या भोयर (ई-क्लास) गावात निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईसह विविध मूलभूत समस्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी शनिवारी (दि.७) जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन शेतकरी चळवळ, यवतमाळ यांच्या वतीने देण्यात आले असून यावेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



भोयर (ई-क्लास) हे गाव शहराच्या अगदी जवळ असूनही आजपर्यंत पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात आलेली नाही. गावातील सुमारे ७० कुटुंबांना दररोज पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून महिलांना व लहान मुलांना अनेक किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागत आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच ही समस्या अधिक गंभीर होत असल्याची माहिती गावकऱ्यांनी निवेदनात दिली. गावात अंगणवाडी, प्राथमिक शाळा, पक्का रस्ता व नाली व्यवस्थेसारख्या मूलभूत सुविधांचाही अभाव असल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. पावसाळ्यात चिखल व पाण्यामुळे गावाचा संपर्क तुटतो, तर जंगल परिसर असल्याने जंगली प्राणी व सापांचा त्रास वाढत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. यापूर्वीही गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांना निवेदन देऊन समस्या मांडल्या होत्या. तसेच यवतमाळ तालुक्याचे तहसीलदार योगेश देशमुख यांनी गावातील रस्ता पूर्ण करण्याबाबत आश्वासन दिले होते. मात्र अद्याप त्या कामाला गती मिळाली नसल्याने गावकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. प्रशासनाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचाही आरोप यावेळी करण्यात आला. दुष्काळग्रस्त भागातील पाणी समस्या सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून कृती आराखडा तयार करण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर भोयर (ई-क्लास) गावाचा त्यात प्राधान्याने समावेश करावा. तसेच कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना, विहीर किंवा बोअरवेल, टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते गौतम पाटील, हितेश इंगोले, कॉम्रेड सचिन मनवर, प्रवीण आडे, शेतकरी चळवळीचे प्रा. पंढरी पाठे यांच्यासह सविता नेवारे, मोनिका कुत्तरमारे, अर्चना पाटील, कांता चव्हाण, ललिता मिश्रा, विद्या गेडाम, सोनू पेटकुले, नंदा दामोदर, गौतम दामोदरे, रमेश पेटकुले, अंकुश तराडे, यशवंत शिंदे, राज गेडाम, अनिल टेकाम, आनंद पंधरे, शंकर सहारे यांच्यासह गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेर येथे दुसरे वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलन

## विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान परिसंवाद व कविसंमेलनाचे आयोजन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - सावित्रीबाई फुले स्मृतिदिन, जागतिक महिला दिन तसेच प्रा. सतेश्वर मोरे स्मृतिदिनाच्या निमित्ताने नेर येथे दुसरे वैदर्भीय आंबेडकरी महिला संमेलनाचे आयोजन रविवार, ८ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता निर्मल बन्सी लॉन येथे करण्यात आले आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रेखा मेश्राम राहणार असून उद्घाटक म्हणून दलित पँथरचे संस्थापक सदस्य ज. वि. पवार उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून वनिता शरद मोरे, कांता अहिरे, पुरुषोत्तम तलवारे, पपिता पाटील, सुषमा पाखरे, डॉ. कीर्तिराज लोणारे, रामदास वीर, प्रा. डॉ. राजू इंगोले आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संमेलनात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. यामध्ये चित्रकलेतील राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त प्राचार्य योगिता चिंचोळे, प्रा. डॉ. विक्रींत मेश्राम, डॉ. प्रा. सुजाता वानखडे, डॉ. पूजा गायकवाड, डॉ. किरण गायकवाड, डॉ. स्मिता चौधरी, पल्लवी मेश्राम, दिशा घरडे व चारु नन्नावरे यांचा समावेश आहे. या संमेलनात ‘भारतीय स्त्री आणि आजचे वास्तव व उपाय’ या विषयावर परिसंवाद सत्राचे आयोजन करण्यात आले असून त्याच्या अध्यक्षस्थानी सुनंदा बोधिले राहणार आहेत. या परिसंवादात अनंत भवरे (छत्रपती संभाजीनगर), प्रा. डॉ. चित्रा म्हात्रे (मुंबई), रमा घरडे (अमरावती), धम्मा कांबळे (यवतमाळ) आणि प्रा. डॉ. सुनंदा वालदे (यवतमाळ) हे वक्ते मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असून प्रा. संजय घरडे, दिगंबर झाडे, पुष्पा बोरकर, विलास थोरात, गिरीष खोब्रागडे आदी कवी आपल्या कविता सादर करणार आहेत.

## वणी येथे माध्यमिक मुख्याध्यापक व शिक्षक यांना व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता प्रशिक्षण

वणी - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी आयोजित केलेल्या व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता या विषयाचे प्रशिक्षण संपूर्ण महाराष्ट्रात घेतले जात आहे.


समग्र शिक्षा अंतर्गत 2025-2026 या आर्थिक वर्षकरिता व्यवसाय शिक्षण मंत्रालय भारत सरकार यांच्या सूचनेनुसार व्यावसायिक शिक्षण व उद्योजकता या विषयाचे प्रशिक्षण वणी थील मार्कंडेय पोद्दार लर्ण स्कुल येथे वणी, मरेगाव व पांढरकवडा या तालुक्यातील वर्ग 9 वि ते 12 वित शिकणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था,खाजगी, अनुदानित, अंशतः अनुदानित शाळातील मुख्याध्यापक व सहायक शिक्षक याना दोन दिवसीय प्रशिक्षण देण्यात येत आहे.

# प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधनपर्व कार्यालयाचे थाटात उद्घाटन!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती ही विचाराची जयंती झाली पाहिजे : प्रा. कल्याण साखरकर!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - आज दिनांक ७ मार्च रोजी स्व.वसंतराव नाईक चौक येथे प्रज्ञासुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव प्रबोधन समिती २०२६च्या कार्यालयाचे मोठ्या थाटात प्रा.कल्याण साखरकर यांच्या हस्ते फित कापून रितसर कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.



यानंतर महामानव छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार व दीप प्रज्वलन करून पंचशील वंदना घेण्यात आली. उपस्थित मान्यवर प्रा.कल्याण साखरकर, शिक्षण सभापती विठ्ठल खडसे, समाजभूषण पुरस्कार प्राप्त विश्वास भवरे,रिपाई आठवले ज्येष्ठ नेते बाळासाहेब वाठोरे, दादाराव अगमे सर,व प्रबोधनपर्व २०२६ चे अध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांना मार्गदर्शन केले..या उद्घाटन प्रसंगी माजी पाणीपुरवठा सभापती राजु दुधे, भगवान हनवते, संतोष सुरवाडे, पंडितराव महाजन, प्रकाश धुळे, नारायण गायकवाड, संतोष आंभोरे, राजेंद्र नाईक,नरेंद्र पाटील,डशरद भगत,अशोक भालेराव,नितेश खंदारे, गुरु उचाडे,भास्कर बनसोड, नटवर उंटवाल, दर्शन जोगदंडे,मनोज तुंडे,मनोज नाईक,अंबादास कांबळे, महेश निखाते, बाबुराव वाघमारे, बाळासाहेब खंदारे, विक्रांत डाके, तुषार भगत, प्रणव भागवत, राजु अंभोरे, हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी जेष्ठ रिपब्लिकन नेते व विचारवंत दिवगंत रणजीत मेश्राम नागपूर तसेच प्रा. दत्तानंद इंगोले ज्येष्ठ विचारवंत यांना प्रबोधन पर्वाच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली. या उद्घाटनाचे सूत्रसंचालन प्रा.जनार्दन गजभिये यांनी केले तर आभार प्रा.अंबादास वानखेडे यांनी मानले.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-३/कावि/१८५/2026
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- 25/02/2026

## जाहीरनामा

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सय्यद ईमरान सय्यद ईसा रा.उमरखेड, ता.उमरखेड जि.यवतमाळ यांनी अर्ज सादर केला की, त्यांचा स्वताचा जन्म दिनांक-07/05/1988 रोजी मौजा उमरखेड येथे झाला आहे. अर्जासोबत जन्म अनुउपलब्धता उपलब्द नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना जन्म नोंद आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक 10.03.2026 पर्यंत लेखी स्वरुपात या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्वा.
तालुका दंडाधिकारी
उमरखेड

# इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्याला यश-पुसद मतदार संघातील रस्ते व पुलांसाठी अर्थसंकल्पातून 42 कोटींची मंजुरी!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - महाराष्ट्र राज्याचा 2026-27 या वर्षाचा अर्थसंकल्प राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दि. 6 मार्च 2026 रोजी विधानसभेत सादर केला. हा अर्थसंकल्प राज्यातील सर्व घटकांना न्याय देणारा, विकासाला गती देणारा तसेच शेतकरी, महिला, युवक आणि उद्योग क्षेत्राला बळकटी देणारा आशावादी अर्थसंकल्प म्हणून पाहिला जात आहे.

या अर्थसंकल्पात पुसद मतदार संघांसाठी महत्त्वपूर्ण निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पुसद तालुक्यातील राज्य मार्ग, जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग तसेच त्या मार्गांवरील पुलांच्या बांधकामासाठी 42 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे पुसद मतदार संघातील रस्ते व दळणवळण



व्यवस्था अधिक मजबूत होणार असून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पुसद मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी जणू विकासाचा चंगच बांधला आहे. पुसदसाठी जास्तीत जास्त निधी आणण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न स्पष्टपणे दिसून येत आहे. नुकत्याच मागील आठवड्यात MIDC पुसद मधील उद्योगांना चालना देण्यासाठी व स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 72 कोटी रुपयांचा निधी MIDC च्या पायाभूत सुविधांसाठी मंजूर करून आणण्यात आला आहे. त्यानंतर आता अर्थसंकल्पातून पुसद मतदार संघातील रस्त्यांच्या विकासासाठी 42 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्यामुळे येत्या काळात पुसद मतदार संघातील रस्ते अधिक दर्जेदार व सुरक्षित होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. या निधीमुळे मतदार संघातील विकासाला नवी गती मिळणार असून उद्योग, व्यापार आणि दळणवळण व्यवस्थेला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पुसदच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी आणण्याचा माझा प्रयत्न कायम राहील असा विश्वास राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी व्यक्त केला.

> पुसद मतदार संघातील उद्योग, रोजगार व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी नाईक परिवार सातत्याने काम करत राहील
>
> **- राज्यमंत्री इंद्रनील नाईक.**

# चालबर्डीच्या साईकृष्णा रंगनेनिवार यांची भाजयुमो जिल्हा उपाध्यक्षपदी वर्णी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो) यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हा उपाध्यक्षपदी चालबर्डी ता. केळापूर येथील रहिवासी साईकृष्णा विलास रंगनेनिवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजयुमोचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष सुरज अनिलकुमार गुप्ता यांनी गुरुवार दि. ५ मार्च २०२६ रोजी अधिकृत नियुक्तीपत्र देत ही घोषणा केली.



यानियुक्तीमुळे भाजप व भाजयुमोच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्हाध्यक्ष सुरज गुप्ता यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, साईकृष्णा रंगनेनिवार यांनी आतापर्यंत राजकीय, सामाजिक तसेच विविध क्षेत्रांमध्ये सक्रियपणे काम करत संघटनेत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पक्षाप्रती असलेली त्यांची निष्ठा, समर्पण आणि संघटनात्मक कार्यातील सहभाग लक्षात घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. नियुक्तीपत्रात नमूद केल्याप्रमाणे, जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कार्य करताना साईकृष्णा रंगनेनिवार यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावेत, युवकांना पक्षाशी जोडण्याचे कार्य वाढवावे तसेच विविध सामाजिक व राजकीय उपक्रमांद्वारे संघटनाची ताकद वाढवावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. यावेळी सुरज गुप्ता यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात सांगितले की, साईकृष्णा रंगनेनिवार यांच्या नेतृत्वगुणांमुळे आणि कार्यतत्परतेमुळे भाजयुमोच्या संघटनात्मक कार्याला नवे बळ मिळेल. युवकांमध्ये पक्षाची विचारधारा पोहोचवून संघटना अधिक व्यापक करण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, या नियुक्तीबद्दल साईकृष्णा रंगनेनिवार यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले असून पक्षाने दिलेल्या विश्वासास पात्र ठरत संघटना मजबूत करण्यासाठी व युवकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. भाजयुमोच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यानंतर विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच कार्यकर्त्यांकडून साईकृष्णा रंगनेनिवार यांचे अभिनंदन करण्यात येत असून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# मेळघाटातील शेवटच्या टोकापर्यंत पोहोचत आहेत शासनाच्या योजना

## ‘शासन आपल्या दारी’ संकल्पना साकार धुळघाटरोड येथे महसूल समाधान शिबिर

**अमरावती/का.प्र.**

मेळघाटातील दुर्गम व आदिवासी बहुल भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट त्यांच्या गावात मिळावा या उद्देशाने ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर’ अभियान राबविण्यात येत आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून तसेच जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली धारणीचे कर्तव्यदक्ष तहसीलदार प्रदीप शेवाळे यांच्या नियोजनातून या शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.याच अनुषंगाने ७ मार्च रोजी धारणी तहसील कार्यालयांतर्गत धुळघाट रोड परिसरात आयोजित शिबिराचा नागरिकांनी लाभ घेतला.



शिबिरामध्ये महसूल विभाग, पंचायत विभाग, आरोग्य विभाग, कृषी विभाग, पुरवठा विभाग, महिला व बालविकास विभाग, विद्युत वितरण कंपनी तसेच इतर शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांनी सहभाग घेत नागरिकांच्या विविध समस्या ऐकून त्यावर मार्गदर्शन व निराकरण करण्याचा प्रयत्न केला.कार्यक्रमात उपस्थित अधिकारी, कर्मचारी व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र, रेशन कार्ड तसेच इतर आवश्यक शासकीय दाखले वितरित करण्यात आले. त्यामुळे दुर्गम भागातील नागरिकांना शासकीय कार्यालयाच्या फेऱ्या न मारता शासनाच्या सेवांचा लाभ थेट शिबिरातून मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

धुळघाटरोड येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य श्रीपाल पाल होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी उपसरपंच सुपीत मालवीय व रोहीत पाल उपस्थित होते. प्रशासनाकडून सहाय्यक जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला, तहसीलदार प्रदीप शेवाळे, नायब तहसीलदार राजेश माळी, गटविकास अधिकारी शिडाम, तालुका कृषी अधिकारी जाधव, मंडळ अधिकारी, सर्व तलाठी, ग्रामसेवक तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शिबिराच्या माध्यमातून अनेक नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचो आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले असून अशा शिबिरांमुळे दुर्गम मेळघाटातील नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सोन्याच्या व्यवसायात खंडेलवाल ज्वेलर्सची सहावी पिढी

## १०० वर्षांची ग्राहक सेवा परंपरा, नितीन खंडेलवाल यांनी दिली माहिती

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील सोने, चांदी आणि हिऱ्यांच्या व्यापारात विश्वास, शुद्धता आणि प्रामाणिकपणाची परंपरा कायम ठेवणाऱ्या अकोला येथील खंडेलवाल ज्वेलर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या सहाव्या पिढीने आता सोन्याच्या व्यवसायात आघाडी घेतली आहे. ही पिढी आधुनिक दृष्टिकोन आणि जागतिक दर्जाच्या सुविधांसह व्यवसायाचे नेतृत्व करत आहे. गेल्या १०० वर्षांची परंपरा कायम ठेवत, खंडेलवाल ज्वेलर्स प्रायव्हेट लिमिटेड, विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये पोहोचत आहे.

राष्ट्रीय स्तरावरील जेम्स अँड गोल्ड असोसिएशनचे माजी अध्यक्ष आणि खंडेलवाल ज्वेलर्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक नितीन खंडेलवाल यांनी माहिती दिली की, खंडेलवाल



ज्वेलर्सची एक शाखा जालन्यात उघडली जाईल आणि विदर्भाबाहेर मराठवाड्यात एक सुसज्ज शोरूम असेल. पत्रकार परिषदेत नितीन भाईसह रवी खंडेलवाल आणि व्यवसायात त्यांच्या सहाव्या पिढीचे नेतृत्व करणारे उच्चशिक्षित प्रतीक, ऋषिका, हर्षल आणि शौर्य खंडेलवाल उपस्थित होते.

नितीन खंडेलवाल पुढे म्हणाले की, अकोल्यात दोन आधुनिक शोरूम उघडल्यानंतर, खंडेलवाल ज्वेलर्सने वाशिम, बुलढाणा आणि वरुड येथे विस्तार केला आहे. विदर्भाबाहेर, खंडेलवाल ज्वेलर्सचे शोरूम लवकरच जालना, मराठवाडा येथे उघडणार आहे. खंडेलवाल ज्वेलर्स आधुनिक सुविधा, जागतिक दर्जाची उपकरणे आणि ग्राहकांच्या आवडीनुसार तयार केलेल्या कस्टमाइज्ड दागिन्यांची संपूर्ण श्रेणी देते. नितीन खंडेलवाल म्हणाले की, विश्वास, शुद्धता आणि नैतिकतेवर आधारित, खंडेलवाल ज्वेलर्स गेल्या १०० वर्षांपासून ग्राहकांची पहिली पसंती आहे.

सोन्याच्या किमतींबाबत विशेष हमी योजना भविष्यात सोन्याची किंमत किती वाढेल किंवा किती कमी होईल याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.काही जण तर असेही म्हणत आहेत की, सोन्याची किंमत तीन लाख रुपयांपर्यंत जाऊ शकते. पण ग्राहकांना घाबरण्याची गरज नाही. खंडेलवाल ज्वेलर्सने त्यांच्या ग्राहकांसाठी एक खास सोन्याची किंमत हमी योजना सुरू केली आहे. जर ३१ मार्च २०२६ पर्यंत सोने बुक केले असेल तर ते ३१ डिसेंबरपर्यंत सोन्याच्या किमती वाढल्या किंवा कमी झाल्या तरी ग्राहकांना पोहोचवले जाईल. या प्रकारची सुरक्षा पूर्णपणे सुरक्षित आहे. ग्राहकांच्या हितासाठी ही पारदर्शक योजना खंडेलवाल ज्वेलर्समध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. नितीन खंडेलवाल यांनी ग्राहकांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

### सोन्यात गुंतवणूक करणे हा सर्वोत्तम पर्याय आहे - नितीन खंडेलवाल

सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या स्थिती पाहता, सोन्यात गुंतवणूक करणे हा सर्वोत्तम पर्याय आहे, असे सोने तज्ञ नितीन खंडेलवाल म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, जगातील प्रत्येक युद्धाची बातमी ही सोन्याच्या व्यापारासाठी चांगली बातमी ठरते. त्यांनी स्पष्ट केले की, सोने ही एक अशी वस्तू आहे जी जागतिक व्यापारात प्रत्येक देशात व्यापार केली जाते. जगात इतरत्र कुठेही रुपया स्वीकारला जात नाही. भारताबाहेरील प्रत्येक देशात तो अपयशी ठरतो. तथापि, सोने ही एकमेव वस्तू आहे जी जगभरात स्वीकारली जाते. युद्धामुळे निर्माण झालेल्या जागतिक परिस्थिती पाहता, जागतिक अस्थिरतेच्या या काळात सोन्याची चमक वाढेल. चांदीच्या किमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करताना नितीन खंडेलवाल म्हणाले की, सध्याच्या परिस्थितीत सोन्यात गुंतवणूक करणे हा प्रत्येकासाठी सर्वोत्तम पर्याय बनला आहे. शिवाय, नितीन खंडेलवाल पुढे म्हणाले की, स्पर्धेच्या या युगात, प्रत्येक शहरात सोने आणि दागिन्यांचे व्यवहार करणारे शोरूम उघडत आहेत, ज्यामुळे ग्राहकांना सुविधा मिळेल.

## अमरावतीत खरेदीचा नवा धमाका

# ‘महिला सन्मान सुपर ऑफर’ श्रद्धा रिअल होलसेल मॉलमध्ये सुरू

## ५००० च्या खरेदीवर अतिरिक्त ११०० ची सूट; ग्राहकांमध्ये उत्साह

**अमरावती/का.प्र.**

शहरात पुन्हा एकदा खरेदीचा उत्साह निर्माण झाला आहे. श्रद्धा रिअल होलसेल मॉल यांनी ग्राहकांसाठी ‘महिला सन्मान सुपर ऑफर’ ही विशेष योजना सुरू केली आहे. या योजनेमुळे ग्राहकांना खरेदीवर अतिरिक्त सवलतीचा लाभ मिळणार आहे.

मॉल व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत ग्राहकांना ५००० च्या खरेदीवर अतिरिक्त ११०० ची सूट दिली





जाणार आहे. ही आकर्षक ऑफर ग्राहकांना उत्तम दर्जाच्या वस्तूंसह अधिक बचतीची संधी देखील उपलब्ध करून देते.

श्रद्धा रिअल होलसेल मॉलमध्ये महिला, पुरुष आणि मुलांसाठी विविध प्रकारचे आकर्षक कपडे तसेच फॅशन ॲक्सेसरीजची विस्तृत श्रेणी उपलब्ध आहे. संपूर्ण कुटुंबासाठी एकाच ठिकाणी खरेदी करण्याची सोय असल्यामुळे ग्राहकांना मोठी सुविधा मिळत आहे.

ग्राहकांना अधिक चांगला खरेदी अनुभव देणे आणि त्यांना जास्तीत जास्त लाभ मिळावा या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आल्याचे मॉल व्यवस्थापनाने सांगितले. या आकर्षक ऑफरमुळे अमरावतीसह आसपासच्या परिसरातील मोठ्या संख्येने ग्राहक मॉलकडे आकर्षित होत आहेत.

अमरावती व परिसरातील नागरिकांनी या विशेष संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापनाने केले असून ही ऑफर मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध राहणार आहे.

# देशात दहशतवाद व नक्षलवादास ब्रेक

## जिंदा शहीद मनिंदरजितसिंग बिट्टा यांनी दिली मिट द प्रेसमध्ये माहिती

**अमरावती/का.प्र.**

देशाला दहशतवादाने त्रासून सोडले होते. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचा कारभार सांभाळल्यानंतर आता देशात दहशतवाद व नक्षलवादास ब्रेक बसला आहे. दहशतवादावर कुठाराघात होत असून नक्षलवाद ठेवून काढला जात असल्याचे जिंदा शहीद मनिंदरजीतसिंह बिट्टा यांची मिट द प्रेसमध्ये म्हटले.

स्थानीक जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे जिंदा शहीद मनिंदरजीतसिंह बिट्टा यांची ‘मिट द प्रेस’ आयोजित करण्यात आली होती. यावेळी बिट्टा यांनी सद्यस्थितीत देशातील दहशतवादी हल्ले, दहशतवाद्यांवरील कारवाई, नक्षलवादी घटनांवर भाष्य केले. ते म्हणाले की, आपणावर अनेकदा दहशतवाद्यांनी हल्ले केले आहेत. सुदैवाने आपण त्यातून वाचलो. देश मोठ्या गंभीर परिस्थितीमधून बाहेर पडला आहे. हा देश संत महात्म्यांचा आहे. देशातील धार्मिकता व संतांच्या संदेशामुळे शांतता नांदत आहे. पूर्वी पंजाब अशांत होता. देशात जयपुर, मुंबई, दिल्ली व कश्मीरसह अनेक ठिकाणी दहशतवाद्यांनी अशांतता निर्माण केली होती. परंतु आता देशात





शांतता नांदत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशाने दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे.

शेजारच्या पाकीस्तानातील दहशतवाद्यांना घरात घुसून मारल्या जात आहे. पुलवामा येथील हल्ल्यानंतर देशाने दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. सध्या दहशतवादी कारवायांचे स्वरूप बदलले असले तरी सरकारने देखील आपल्या यंत्रणेमार्फत त्यांच्या कारवायांना निष्क्रीय केले आहे. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश व छत्तीसगढसह अन्य राज्यातील नक्षलवाद्यांचा बिमोड होत आहे. नक्षलवाद्यांना मोठ्या प्रमाणात कारवाई केली जात आहे. त्यामुळे सरकार नक्षलवाद व दहशतवाद संपुष्टात आणण्यात यशस्वी ठरल्याचे बिट्टा यांनी सांगितले.

दरम्यान, आपण आतापर्यत दहशतवादास थेट बघीतले आहे. त्यामुळे अशा हल्ल्यातील कुटूंबाचे दुःख आपण जाणत असतो. यामुळे अशातील काही कुटूंबांना आपण मदत देखील केली. दरम्यान, काँग्रेसच्या काळात दहशतवादाचा बिमोड करण्यास तेव्हाच्या सरकारला अपयश आल्याचेही ते म्हणाले. पुलवामा सारखे प्रकार पुन्हा होवू नये यामुळे सरकारने यापुढे सैन्यांच्या वाहतुकीसाठी विमानांचा वापर करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. आपण सर्वप्रथम भारतीय आहोत, हीच आपली ओळख असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रपरिदेला वरिष्ठ पत्रकार-संपादक, जिल्हा मराठी पत्रकार संघटनेचे अध्यक्ष व स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल उपस्थित होते.

## रासेयोचे सात दिवसीय शिबीर



**अमरावती-**इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च, बडनेरा येथील रासेयो विभागाच्या वतीने सार्सी येथे आयोजित शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी सात दिवस श्रमदान, आरोग्य तपासणी व प्रबोधनात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रामविकासाचा वसा जपला.उद्घाटन सरपंच शालिनी धंदर, उपसरपंच रोशन गवई, पोलीस पाटील अमोलजी दहातोंडे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) सचिन दिघडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.शिबिरात विविध कार्यक्रम घेण्यात आले.रूपेश रेंगे यांनी ‘चला जगूया आपल्या माणुसकीला’ या विषयावर मार्गदर्शन केले. अतिथी म्हणून रमेश काळे, डॉ. कुंदन पाटील, डॉ.प्रसाद देशमुख यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. शिबिराचे यशस्वी आयोजन शुभम ग. बोन्डे व प्रा. सिद्धी महल्ले यांनी केले.

# धामणगावात महिला दिनानिमित्त विविध स्पर्धा

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

धामणगाव नगरपरिषद (महिला व बालकल्याण विभाग)



यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त परिसंवाद, वादविवाद स्पर्धा, फॅशन शो तसेच आनंद मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. स्त्री शक्तीचा जागर करण्यासाठी आणि महिलांच्या सामाजिक, आर्थिक व वैचारिक सशक्तीकरणासाठी हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमामध्ये ८ मार्च रोजी सकाळी ११.०० वाजता वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली असून स्पर्धकांना आपले मत मांडण्यासाठी ३ मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. स्पर्धा दोन वयोगटांमध्ये होणार आहे.१८ ते ३५ वयोगटासाठी आणि ३५ वर्ष पुढील वयोगटासाठी प्रसारमाध्यमांचा आजच्या महिलांच्या जीवनमान व विचारसरणीवर नेमका काय परिणाम होत आहे,महिला आज खऱ्या अर्थाने आर्थिक व सामाजिक दृष्ट्या स्वतंत्र झाली आहे का?लग्नासाठी आई-वडिलांची संमती कायद्याने बंधनकारक असली पाहिजे का?यासाठी प्रथम पाच हजार,द्वितीय तीन हजार तृतीय दोन हजार असे बक्षीस देण्यात येणार आहे.

कार्यक्रमात पारंपारिक वेशभूषेतील फॅशन शो देखील आयोजित करण्यात आला आहे. या फॅशन शोमध्ये फक्त पारंपारिक वेशभूषेमध्ये सादरीकरण करणे आवश्यक आहे. पारंपारिक वेशभूषेव्यतिरिक्त इतर कोणत्याही वेशभूषेत सहभाग स्वीकारला जाणार नाही, यासाठी पुरस्कार देण्यात येईल या कार्यक्रमात महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन नगरपरिषदेने केले आहे.

## संक्षिप्त

### मंगळवारी महावितरणचा ‘ऊर्जामित्र दिन’

**अमरावती-**वीज ग्राहकांच्या वीज सेवेशी संबंधित तक्रारी सोडविण्यासाठी येत्या मंगळवारला महावितरणच्या जिल्ह्यातील २३ उपविभागात ‘ऊर्जामित्र दिनाचे’आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ ते १२ वाजे दरम्यान आयोजित या तक्रार निवारण मेळाव्यात जिल्ह्यातील जास्तित जास्त वीज ग्राहकांनी लाभ घेवून आपल्या तक्रारीचे निराकरण करून घेण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.वीज ग्राहकांना ग्राहकाभिमूख सेवा देण्यासाठी महावितरणने ऑनलाईन सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. तथापि यासोबत जिल्ह्यातील वीज ग्राहकांच्या तक्रारी असतील तर त्या तक्रारींचेही निराकरण वेळेत व्हावे यासाठी महावितरणने पुढाकार घेत ऊर्जामित्र दिनाचे आयोजन केले आहे. ऊर्जा मित्र दिनाचे आयोजन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारला करण्यात येते. मागील सात महिन्यात झालेल्या ऊर्जामित्र दिनात जिल्ह्यात ५१४ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यात ११० तक्रारी ह्या वीज पुरवठ्याशी संबंधित होत्या, ३२२ तक्रारी बिलिंगशी संबंधित आणि ८२ तक्रारीचे वेगळे कारण होते. यापैकी ५१३ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून केवळ १ तक्रार पायाभूत सुविधेच्या कारणासाठी प्रलंबित आहे.

### गाडगेबाबांच्या दशसुत्रीची देशाला गरज-सुरज मंडे



**खल्लार-** संत गाडगेबाबा यांची दशसूत्री देशाला तारक ठरणार आहे. त्याचे पालन शासन स्तरावरून व समाजामध्ये होणे गरजेचे असल्याचे मत अखिल महाराष्ट्र शिक्षक संघांचे प्रसिद्धी प्रमुख सुरज मंडे यांनी जि. प. प्रा. म. शाळा धानोरा (शिक्रा ) येथे संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्य आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावरुन व्यक्त केले.संचालन मुख्याध्यापक दिपक धांडे तर आभार प्रदर्शन शकिलाबाई अंगणवाडी सेविका यांनी पार पाडले. या प्रसंगी प्रज्वल माधुरी सचिन पाटील आणि सुबोध योगीराज टेंबरे या शालेय विद्यार्थ्यांनी गाडगे महारांचा यांचे जीवनकार्यावर प्रकाश टाकला.गाडगे महाराजांचे प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करून सर्व विद्यार्थ्यांकिडून गाडगे महाराज यांचे दशसूत्रीचे पठण करून घेण्यात आले. कार्यक्रमाकरिता तामगगाडगे अश्विनी, अथर्व पडोळे, समर्थ पडोळे, सार्थक चौधरी, विराज, मारब्दे, धनश्री गरड, पलक बद्रे, सान्वी कांबळे, दुर्गा खंबरे, वेदांत गरड, दिव्यानी टेम्भरें, तनवी मालगावे, रीता मालगावे, गौरव शेंडे, पियूष शेंडे, नमन मालगावे, कृष्णा शेंडे, आरव मालगावे, संविधान कांबळे, सार्थक मेश्राम, देविका शिखरे तसेच शाळेचे सर्व आजी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

### अनंत नांदूरकर ‘खलिश’ आकाशवाणीवर



**अमरावती-**‘भारत भूच्या कणाकणातिल श्वास श्वास श्रीराम, वचन, ध्येय, मर्यादा, निष्ठा, मूल्याचे प्रतिनाम, बोला बोला जय जय राम, आळवा जय जय जय श्रीराम’ या ओळी आहेत लोकप्रिय कवी, ग़ज़लकार आणि रंगकर्मी अनंत नांदूरकर ‘खलिश’ यांच्या!आकाशवाणी नागपूर केंद्रावरून मार्च महिन्याचे मासिकगीत म्हणून हे श्रीरामगीत दर शनिवारी सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी प्रसारित केले जाणार आहे.नागपूर आकाशवाणी केंद्राच्या ‘स्वरमंजिरी’ कार्यक्रमांतर्गत गीत लिहिण्याचा मान अनंत नांदूरकर यांना सलग पाचव्यांदा मिळालेला आहे. या गीतास नागपूरचे प्रख्यात संगीतकार श्रीकांत पिसे यांनी स्वरसाज चढविला आहे. आकाशवाणी नागपूर केंद्राच्या विजयसिंह राजपूत यांची ही निर्मिती असून निर्मिती सहाय्य अवनिंद्र शेवलीकर यांचे आहे. या महिन्यातील चार ही शनिवारी म्हणजे ७, १४, २१ आणि २८ मार्च सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी रसिकांना ‘स्वरमंजिरी’ कार्यक्रमातून हे गीत ऐकता येणार आहे. या यशाबद्दल अनंत नांदूरकर यांचे प्रा. अनिल जाधव, नितीन भट, डॉ. उज्ज्वल बारंगे, कॅलिग्राफर सुनील देशमुख, सिनेअभिनेते प्रफुल जोशी आणि मित्रमंडळी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### डॉ सतीश अग्रवाल यांची केंद्रीय पदावर नियुक्ती



**अमरावती-**आयएपी अमरावती शाखेच्या अध्यक्ष डॉ प्रतिभा काळे यांनी डॉ सतीश अग्रवाल यांची केंद्रीय आयएपीच्या राष्ट्रीय पदावर नियुक्ती झाल्यावर त्यांचे सत्कार केले. डॉ सतीश अग्रवाल यांची मेडिकोलीगल मॉड्यूलचे केंद्रीय सहसमन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली. डॉ अग्रवाल यांनी मेडिकोलीगल समूहच्या सचिव पदावर सतत ४ वर्ष आणि उपाध्यक्ष पदावर २ वर्ष काम केले. डॉ अग्रवाल यांनी या नियुक्तीला आयएपी अमरावती शाखेचे यश म्हणून उल्लेखित केले. या नियुक्तीबद्दल त्यांनी केंद्रीय आयएपीच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉ नीलम मोहन, सचिव डॉ रुचिरा गुप्ता, आगामी अध्यक्ष डॉ सिंगरवेलू, कोषाध्यक्ष डॉ आलोक भंडारी व निवर्तमान अध्यक्ष डॉ वसंत खळतकर यांचे आभार मानले. याप्रसंगी आयएपी अमरावती शाखेच्या माजी अध्यक्षांसह मोठ्या संख्येत सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखेचे माजी अध्यक्ष डॉ संदीप दानखडे यांनी केले. या नियुक्तीसाठी मेडिकोलीगल अध्यायाचे डॉ सतीश शर्मा, डॉ हेमंत गंगोलिया, डॉ आसुतोष महापात्र व आयएपी अमरावती शाखेचे सचिव डॉ आदित्य टांक, कोषाध्यक्ष डॉ सूरज बनसोड यांच्यासह सर्वांनी डॉ अग्रवालांचे अभिनंदन केले.

महिला घरकामगार

# सामाजिक संवेदनशीलतेची गरज



**भारतीय मजदूर संघाने २०१९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार देशात ४५ लाख महिला घरकामगार होत्या, परंतु सध्या ही संख्या २ कोटींहून अधिक असल्याचा अंदाज आहे. घरांमध्ये इतकी महत्त्वाची जबाबदारी सांभाळणारा हा वर्ग आजही आर्थिक आणि सामाजिक सुरक्षेच्या आव्हानांशी झुंज देत आहे. आजच्या महिला दिनी घेतलेला आढावा...**

देशाच्या आर्थिक प्रगतीसोबतच घरकाम करणाऱ्या महिला कामगारांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे.उच्चभ्रू ते मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये या महिला घरगुती दैनंदिन कामांचा कणा मानल्या जातात.बदलत्या जीवनशैलीनुसार त्यांच्या कामाचे स्वरूपही बदलले आहे. स्वयंपाक करणे,भांडी आणि कपडे धुण्यापासून ते मुलांची देखभाल करण्यापर्यंतची सर्व जबाबदारी या महिलांवर असते.विशेषतः ज्या घरांमध्ये पती-पत्नी दोघेही नोकरीनिमित्त बाहेर असतात,तिथे मुलांच्या संगोपनाची संपूर्ण धुरा सांभाळतात.शहरीकरणाच्या वाढत्या वेगामुळे त्यांची मागणीही वाढली आहे.भारतीय मजदूर संघाने २०१९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार देशात ४५ लाख महिला घरकामगार होत्या, परंतु सध्या ही संख्या २ कोटींहून अधिक असल्याचा अंदाज आहे.

घरांमध्ये इतकी महत्त्वाची जबाबदारी सांभाळणारा हा वर्ग आजही आर्थिक आणि सामाजिक सुरक्षेच्या आव्हानांशी झुंज देत आहे. एक महिला सरासरी चार ते सहा घरांमध्ये काम करते, तरीही तिला महिनाकाठी जेमतेम ८ ते १० हजार रुपये मिळतात. त्यांच्यासाठी कोणताही किमान वेतन दर निश्चित केलेला नाही.जोपर्यंत महिला घरकामगार काम करण्यास सक्षम असतात,तोपर्यंतच त्यांना वेतन मिळते; मात्र वयोमानानुसार काम करणे कठीण झाल्यावर त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची आर्थिक सुरक्षितता नसते.अनेकदा आवश्यक कामासाठी रजा घेतल्यास त्यांचे वेतन कापले जाते. या महिलांचा मोठा वर्ग गावातून स्थलांतरित होऊन शहरात येतो, त्यामुळे शिधापत्रिका किंवा इतर ओळखीच्या पुराव्यांअभावी त्यांना प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेसारख्या अनेक जनहितकारी योजनांच्या लाभापासून वंचित राहावे लागते.

घरकाम करणा-या महिलांसोबत होणा-या गैरवर्तणुकीच्या घटनाही वारंवार समोर येत असतात. काही अपवाद वगळता, सामान्यतः गरज पडल्यास त्यांना घराचे शौचालय वापरण्याची परवानगी दिली जात नाही.यामुळे बराच वेळ लघवी रोखून धरल्याने त्यांना मूत्रपिंड आणि पोटाचे गंभीर आजार जडतात. या महिलांसाठी वैद्यकीय सुविधांचा विस्तार होणे अत्यंत आवश्यक आहे.त्यांना ई-श्रम पोर्टल, प्रधानमंत्री आवास योजना आणि अटल पेन्शन योजनेचा लाभ मिळायला हवा. सर्व नोंदणीकृत कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेशी जोडण्यासाठी विशेष मोहीम राबवली पाहिजे.काही मोजकी राज्ये वगळता इतर ठिकाणी घरकामगारांसाठी कोणतेही मंडळ किंवा बोर्ड स्थापन झालेले नाही.

अशा मंडळांची व्याप्ती जिल्हा स्तरावरून तालुका स्तरापर्यंत वाढवली पाहिजे. ही मंडळे केवळ तक्रार निवारण केंद्रे न राहता, त्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देणारी यंत्रणा म्हणून कार्यरत असायला हवीत.

अपघाताच्या वेळी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळवणे आजही कठीण आहे. दुर्दैवाने अनेक घरांमध्ये या साहाय्यिकांना शिळे किंवा खराब झालेले अन्न दिले जाते, ज्याचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.अन्नाची नासाडी रोखणे चांगली गोष्ट असली,तरी खराब अन्न खाण्यास प्रवृत्त केल्यामुळे त्यांना अन्नबाधेशारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. तसेच त्यांना अनेकदा अस्पृश्यता,अपमानास्पद शब्द आणि शारीरिक व मानसिक छळही सहन करावा लागतो. या महिलांच्या हिताच्या संरक्षणासाठी एका प्रभावी केंद्रीय धोरणाची गरज दीर्घकाळापासून व्यक्त केली जात आहे.

मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये घरकामगार महिलांसाठी विश्रांतीची जागा आणि शौचालयासारख्या मूलभूत सुविधा असणे बंधनकारक केले पाहिजे. हे केंद्र सरकारच्या पर्यावरण, सामाजिक जबाबदारी आणि सुशासन (ईएसजी) उपक्रमाचा भाग बनायला हवे. घरकामगार महिलांच्या आव्हानांचे निराकरण केवळ नियम आणि कायद्याने होणार नाही, तर त्यासाठी समाजाने संवेदनशील होणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे काही कुटुंबे त्यांना आपल्या कुटुंबाचाच सदस्य मानतात, तशीच वृत्ती संपूर्ण समाजाने जोपासली पाहिजे. आपल्या जीवनाला सुसह्य करणाऱ्या या वर्गाचे आर्थिक आणि सामाजिक धोरणात्मक उपाय आणि सामाजिक संवेदनेच्या जोरावरच शक्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने २९ जानेवारी २०२५ रोजी या संदर्भात कामगार आणि रोजगार मंत्रालयाला तज्ञांची एक संयुक्त समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते.मात्र, या समितीने जुलै २०२५ मध्ये सादर केलेल्या अहवालात नवीन कायद्याची आवश्यकता नाकारली. घरकामगार आधीच चार कामगार संहितांच्या कक्षेत येतात, असा तर्क समितीने दिला असला तरी,वास्तव मात्र वेगळे आहे. विद्यमान कामगार संहिता कार्यस्थळाला 'संस्थान' म्हणून परिभाषित करतात, ज्यामुळे घरकामगार प्रत्यक्षात यातील अनेक तरतुदींपासून बाहेर राहतात.

केवळ सामाजिक सुरक्षा संहितेमध्येच त्यांचा उल्लेख आढळतो.

राज्यांमध्येही या महिलांसाठी स्वतंत्र कल्याणकारी योजनांचा अभाव आहे. या वर्गावर आतापर्यंत खूप कमी अभ्यास झाला आहे. रहिवासी कल्याण संघटनांनी (आरडब्ल्यूए) या दिशेने विचार करणे गरजेचे आहे.

✍ जयालक्ष्मी तिवारी

जागतिक महिला दिन विशेष



# प्रा.डॉ. माधुरी चेंडके
## क्रीडा, संस्कार आणि सशक्त स्त्रीत्वाची प्रेरणादायी गाथा

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या सामर्थ्याची आणि नेतृत्वाचे गुणगौरव चर्चा होत असताना श्री हनुमान प्रसारक मंडळाच्या सचिव, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. डॉ. माधुरी चेंडके यांची वाटचाल ही खऱ्या अर्थाने स्त्री सशक्तीकरण ची प्रेरणादायी कहाणी ठरते. एक जुनी म्हण आहे, 'मोठ्या झाडांच्या सावलीत दुसरे झाड वाढत नाही', परंतु काही व्यक्तिमत्व या म्हणीला अपवाद ठरतात. नव्याने निर्माण होणाऱ्या नेतृत्वाच्या नव्या विचारांची, नव्या नेतृत्वाची आणि नव्या कर्तृत्वाची फुले उमलत असतात.

आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःची एक स्वतंत्र ओळख निर्माण करणारे अमरावतीचा गौरव श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ही संस्था केवळ क्रीडा संस्था नसून भारतीय पारंपरिक क्रीडा संस्कृतीचे जागतिक व्यासपीठ आहे. १९१४ मध्ये संस्थेची स्थापना श्रद्धेय अंबादासपंत वैद्य यांच्यासह अनेक राष्ट्रभक्तांनी केली. शारीरिक शिक्षणाच्या माध्यमातून तरुणांमध्ये राष्ट्रभावना, शिस्त आणि सामर्थ्य निर्माण करणे हे या संस्थेचे प्रमुख ध्येय होते. या महान परंपरेतच वाढलेल्या माधुरीताईंवर बालपणापासूनच संस्कारांचे मजबूत बीज रोवले गेले. आजोबा अंबादासपंत वैद्य यांचे प्रेम, मार्गदर्शन आणि वडील पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांची शिस्तबद्ध कार्यपद्धती यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल प्रभाव पडला.

डॉ. माधुरीताईंनी शिक्षणाच्या क्षेत्रात बी.एस्सी. बी.पी.एड. एम.पी.एड. आणि पुढे भारतीय पारंपरिक क्रीडांवर संशोधन करून आचार्य पदवी प्राप्त केली. शिक्षणासोबतच त्यांनी क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय प्रावीण्य मिळवले. जिम्नॅस्टिक, स्विमिंग, बास्केटबॉल, रोप मल्लखांब आणि इतर भारतीय पारंपरिक खेळांमध्ये त्यांनी कौशल्य प्राप्त केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक संघांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवले. रशिया, फिनलँड, अर्जेंटिना, अमेरिका, ब्राझीलसह जगातील अनेक देशांमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व करत भारतीय पारंपरिक खेळांचा प्रचार-प्रसार केला. त्यांच्या या कार्यामुळे भारतीय क्रीडा संस्कृतीला जागतिक व्यासपीठ मिळाले.

आज त्या अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळत आहेत. त्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव, तसेच डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनच्या उपप्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय त्या महाराष्ट्र राज्य हौशी जिम्नॅस्टिक संघाच्या उपाध्यक्ष, अमरावती जिल्हा जिम्नॅस्टिक संघटनेच्या सचिव व विविध क्रीडा संघटनांमध्ये मार्गदर्शक पदांवर कार्यरत आहेत. संस्थेच्या कामात त्यांची कार्यतत्परता आणि व्यवस्थापन कौशल्य विशेष ठरते. सकाळपासून रात्रीपर्यंत संस्थेच्या कार्यात व्यस्त राहून त्यांनी मंडळाच्या प्रगतीला नवी दिशा दिली आहे.

काळाच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला क्रीडा विद्यापीठाचा दर्जा मिळवून देण्यासाठी अनेक वर्षे प्रयत्न सुरू होते. या प्रयत्नांमध्ये डॉ. श्रीकांत चेंडके, प्रा. डॉ. माधुरी चेंडके आणि मंडळातील पदाधिकाऱ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. अखेर संस्थेला क्रीडा विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला. या विद्यापीठाच्या माध्यमातून भारतीय पारंपरिक खेळांचे संशोधन, आधुनिक क्रीडांचे प्रशिक्षण आणि जागतिक स्तरावरील संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत.

जागतिक महिला दिन हा केवळ उत्सव नसून महिलांच्या सामर्थ्याची जाणीव करून देणारा दिवस आहे. त्यांची वाटचाल हेच दाखवते की संस्कार, शिक्षण, मेहनत आणि समाजासाठी काम करण्याची निष्ठा असेल तर महिला कोणत्याही क्षेत्रात नेतृत्व करू शकते. त्यांचे कार्य आज अनेक तरुणींना प्रेरणा देत आहे. क्रीडा, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम घडवून त्यांनी स्त्री नेतृत्वाचे प्रभावी उदाहरण समाजासमोर ठेवले आहे.पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांच्या कार्यपरंपरेला आता प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके यांची सक्षम साथ लाभली आहे. त्यांच्या नेतृत्व, जिद्द, दूरदृष्टी आणि अथक परिश्रमामुळे संस्थेची वाटचाल अधिक भक्कम आणि प्रभावी झाली आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याला मानाचा मुजरा करत, डॉ. माधुरी चेंडके यांच्या प्रेरणेतून अनेक महिलांना नवे ध्येय आणि नवी दिशा मिळो हीच अपेक्षा.

✍ अजय दे. दुपारे

जनसंपर्क अधिकारी,
श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ. अमरावती

# डॉ. प्रणिता कडू समर्पित कार्याचे गौरवशाली यश



अमरावती जिल्ह्यातील मेळघाट नैसर्गिक सौंदर्याने समृद्ध आणि आदिवासी संस्कृतीने संपन्न, मात्र या मेळघाटची ओळख केवळ कुपोषणा पर्यंत मर्यादित राहिली. कुपोषण दूर करण्यासाठी शासन-प्रशासनस्तरावर अनेक उपाययोजना सुरु असतांना मूळ उपाय योजनेकडे दुर्लक्ष अशी मेळघाटचे स्थिती. याच परिस्थितीला छेद देत डॉ. प्रणिता कडू यांनी मेळघाटातील आदिवासी परंपरा आधारित वनशेती व संस्कृतीला राष्ट्रीय व्यासपीठावर एक नवी ओळख दिली. क्षण होता, दिल्ली येथे तीन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील इंटरॅक्टिव्ह मीट चे. वनसंपत्ती, पारंपरिक ज्ञान आणि सक्षमीकरण या विषयावर आयोजित या कार्यक्रमामध्ये कृषी विज्ञान केंद्र घातखेड च्या गृह विज्ञान प्रमुख डॉ. प्रणिता कडू यांनी मेळघाटातील आदिवासींना सोबत घेत राष्ट्रीय व्यासपीठावर मेळघाटातील आदिवासी संस्कृती, वनसंपत्ती, नैसर्गिक समृद्धीची ओळख व दुर्मिळ प्रजातीची ऱ्हास होत चालेल्या काही जंगल संपत्तीचा ठेव्याचे जतन, संरक्षण यासाठी संपूर्ण देशातील सहभागी तज्ञ मंडळीसमोर नव्या स्वरूपात सादर केली.

डॉ. प्रणिता कडू यांनी मेळघाटातील वनसंपत्ती, पारंपरिक ज्ञान व समुदाय सक्षमीकरणाच्या उपक्रमांचे प्रभावी सादरीकरण केले. त्यांनी वेगवेगळ्या सत्रांमध्ये वनसंपत्तीचा पर्यावरणावर, समाजावर आणि आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम, आदिवासी समाजातील पारंपरिक ज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. समुदायाच्या अनुभवांवर आधारित वनौषधी, वनशेती उत्पादनाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले.या चर्चेत मेळघाटातील स्थानिक उपक्रम व आरोग्य विषयक अनुभव मांडण्यात आले. प्रामुख्याने वनामध्ये उगवणाऱ्या वनस्पती, धान्य यावर आधारित पाककृती व मूल्यवर्धनावर सादरीकरण करीत फॉरेस्ट प्रोडूसेस-रेसिपीस, टेस्ट आणि हेल्थ या विषयावर वनउपजांवर आधारित पाककृती, चव व आरोग्य यातील संतुलन, पोषणमूल्य वाढविण्याच्या पद्धती तसेच मूल्यवर्धनातून उद्योजकतेच्या संधी यावर सादरीकरण करण्यात आले. स्थानिक महिलांसाठी व युवकांसाठी वनउपज प्रक्रिया उद्योगातून रोजगार निर्मिती दिशा स्पष्ट करण्यात आली.

पारंपरिक ज्ञानाला वैज्ञानिक अधिष्ठान देऊन रोजगारनिर्मिती, आरोग्यदृष्ट्या उपयोग आणि शाश्वत व्यवस्थापनासाठी सहकार्याची दारे उघडली गेली. डॉ. प्रणिता कडू यांच्या सक्रिय सहभागामुळे मेळघाटातील वनउपजांच्या माध्यमातून समुदाय सक्षमीकरण व नवनवीन उपक्रमांद्वारे रोजगार निर्मितीला चालना मिळण्यास महत्त्वपूर्ण आधार मिळाल्याचे स्पष्ट झाले.अमरावती पासून दीडशे किलोमीटर दूर असणाऱ्या मेळघाट मध्ये सातत्याने तेथील आदिवासी कुटुंबासाठी नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देऊन त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी सातत्याने धडपड करीत असणाऱ्या कृषी विज्ञान केंद्र, घातखेडच्या डॉ. प्रणिता कडू या निश्चितच सर्वांना जागतिक महिला दिनी प्रेरणा देणाऱ्या आहेत.

# महिलाशक्ती..



आज ८ मार्च, म्हणजेच स्त्रीशक्तीचा दिवस.भारतीय संस्कृतीमध्ये महीलांना अपार क्षमता, सहनशीलता, दया, करुणेचे प्रतीक मानले जाते.तसा आपला इतिहासही आहे. आज भारतीय स्त्री फक्त चार भींतीच्या आत नाही तर ती विज्ञान तंत्रज्ञानात महत्वपूर्ण योगदान देत आहे. तसेच भारतीय संरक्षण दलात महिला महत्त्वाची जबाबदारी बजावत आहे विज्ञान तंत्रज्ञानात तर मंगळयान २०१३ या मिशनमध्ये महिलांनी ऐतिहासीक विजय प्राप्त करून महीला शक्तीची जागृती दाखवली. आपण एआयच्या युगात वावरत आहोत. तरी पण आजही कितीतरी महिलांचे शारीरिक यौन, मानसिक किंवा आर्थिक शोषणाला बळी पडत आहे. भ्रृणहत्या बद्दल सरकारला कायदे अधीक कठोर करण्याची गरज पडत आहे. आजही मुलगी जन्मली की अरे मुलगीच आली मुलगा पाहीजे होता असे म्हणणारेही आहे. मुलगी म्हणजे दुस-याचे धन असे विचार बदलायची गरज आहे. जी आई स्व:ता मुलीला जन्माला घालते ती स्व:ता एक मुलगीच असते तरी पण असा विचार का? महीलांची असुरक्षितता ही घरातूनच सुरू होते. आज प्रत्येक मुलीच्या आईला मुलीला शाळेत पाठवणे, एकटे खेळायला पाठवणे म्हणजे भीती आहे. समाज प्रगत झाला आहे पण त्या समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही. आज प्रत्येक पालकाला आपले पाल्य सुरक्षित ठेवणे म्हणजे मोठी कसरत झाली आहे. महिलांच्या सुरक्षेकरीता भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकार 'मिशन शक्ती अंर्तगत बेन स्टॉप सेंटर' १८१ महिला हेल्पलाईन, निर्भया फंड आणि ११२ आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली या सारख्या विविध उपाययोजना राबवत आहे. महिला सुरक्षता ही फक्त शासनाची जबाबदारी नसून प्रत्येकाची आहे.

✍ लता लाडोळे(पेटले)

मो.नं.८७८८६४८१२

# भारतीय संस्कृती आणि स्त्री



जगामध्ये भारतीय संस्कृतीला सर्वश्रेष्ठ मानले जाते. पाश्चात्य देशांमध्ये सुद्धा आपल्या संस्कृतीची जोपासना होत असल्याचे दिसून येत आहे.आपल्या या संस्कृतीमध्ये स्त्रीला मानाचे स्थान दिल्या गेले आहे. स्त्रीचा उच्चकोटी सन्मान केल्या गेला आहे. प्रत्येक स्त्रीला लक्ष्मीचे रूप मानल्या जाते. मग ती घरातील आई असो,मुलगी वा सून कुणीही असो.

अनेकांनी स्त्रीला अंगणातील तुळशीची सुद्धा उपमा दिलेली आहे.आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये अंगणातील तुळशीला मोलाचे स्थान दिले आहे.तिला पवित्र मानले जाते. वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार केला तर अगदीच योग्य आहे. आणि इथे अध्यात्मिक पार्श्वभूमीवर विचार केला तरी पावित्र्य मात्र उच्चकोटीच दिसून येतच.दारात तुळस असणं शुभाशुभ मानले जाते.यामागचे कारणही तेवढच सकारात्मक आणि साजेस आहे.कारण तुळस अनेकाविध आजारांवर औषध म्हणून काम करते. आयुर्वेदात तुळशीचे फार महत्व सांगितल्या गेले आहे. सोबतच तुळस चोवीस तास वातावरण शुद्ध करणारा ऑक्सीजन वायू बाहेर टाकत असते. म्हणजेच जे मानवाला आणि या संपूर्ण निसर्गाला आवश्यक आहे ते ते या छोट्याशा तुळशीकडून मिळत असते. अर्थातच केवढा मोठा सोशिकपणा तिच्यात सामावलेला आहे!

तुळशीला कित्येक दिवस पाणी जरी मिळाले नाही तरी ती जमिनीत तश्शीच तग धरूनच उभी असते. सहजासहजी सुकत नाही किंवा कोमेजतही नाही.स्त्री सुद्धा तशीच अनेक संकटांवर मात करतांना पोटात अन्नाचा कण जरी नसेल तरी मात्र खचून न जाता कायम समोर उभ्या ठाकलेल्या संकटांचा खंबीरपणे सामना करीत राहते.

अनेक वेळा तिच्या स्त्रीत्वाला आव्हान देणारे प्रसंगही पुढयात उभे राहतात. परंतु अशा वेळी सुद्धा सर्व बळ एकवटून आपले संपूर्ण सामर्थ्य पणाला लावून ती झुंज देते आणि त्या बिकट प्रसंगावर मात सुद्धा करते.

कुठून येत असेल बरे तिच्यात एवढे बळ? परिस्थितीने पिचल्यामुळे की निसर्गदत्त मिळालेल्या सोशिकतेच्या आणि कणखरपणाच्या देणगीमुळे!! खरच या प्रश्नाचे उत्तर साक्षात ब्रम्हदेवही देवू शकणार नाहीत.कारण सर्व गोष्टी कळून जातात पण स्त्रीमन आणि स्त्रित्व कळणं कठीणच असतं.स्वतःचे अस्तित्व पणाला लावून इतरांच्या भल्यासाठी कायम झटणे म्हणजे त्याग, सेवाभावी वृत्ती.नेमकी हीच वृत्ती स्त्री च्या नसांनसांतून आणि कर्तव्यातून कायम प्रवाहीत होत असते.परंतु एकविसाव्या शतकात आधुनिकतेच्या नावाखाली अनेक गोष्टी चुकीच्या घडतांना दिसून येतात.त्याची खंत आणि सल मनाला मात्र सतत भेडासवत असते.

✍ अर्चना वासेकर-शेरजे, यवतमाळ

खरं तर आधुनिक स्त्रीने कसे असावे,तर तिने निर्भिड, स्वतंत्र, विचारी, सोशिक, स्वावलंबी, शिक्षित, कर्तव्यशील आणि कायम तिच्यातील स्त्रीत्वाला जपणारे व्यक्तीमत्व. स्व ची जाणीव तिने नक्कीच जोपासावी, वृद्धींगत करावी पण स्वतःतला 'अहं' मात्र बाजूला ठेवूनच. कारण 'अहं' माणसाला कोलमडून टाकतो. अनेक कर्तृत्ववान स्त्रीयांचे चरित्र बघितल्यास हेच निदर्शनांस येते की,त्यांनीसुद्धा स्व जपतांना स्वतःमध्ये अहं शिवू दिला नाही.

प्रत्येक प्रसंगी सर्वसमावेशक भूमिका पार पाडली गेली.अपार सोशिकता आणि पराकोटीचा त्याग अंगी बाळगूनच त्यांनी आपले कर्तृत्व जगाला दाखवून दिले. म्हणनच तर म्हणावेसे वाटते की,स्त्रीने पळसासारखे असावे.ज्याप्रमाणे निसर्गात शिशीर ऋतूची पानगळ सरत आली की,लगेच वसंताची चाहूल लागते,निसर्गात नवचैतन्य वाहू लागते,तरू वेलींवर नवीन पानांचा जन्म झालेला दिसतो.पण त्याचवेळी पळसाची फांदी नं फांदी निष्पर्ण होऊन अगदीच मुंडन केल्यागत भासते.निसर्गाच्या बदलानुसार दाहकता वाढायला सुरुवात होते.आणि निष्पर्ण झालेल्या पळसफांदीवर त्याही अवस्थेत लालसर- केशरी मोहक फुलांचा फुलोरा फुलायला लागतो. फांदीफांदी नववधूगत फुलांनी नटलेली जाणवते.

प्रतिकूल परिस्थितीत सूर्याच्या वाढत्या दाहतेसोबतच अढळपणे उभे राहून स्वच्छंदी फुलावे ते फक्त आणि फक्त पळसानेच.म्हणूनच स्त्रीने आधुनिकता जपतांना आणि एकविसाव्या शतकातील स्त्री म्हणून वावरतांना तिने तिच्यातील संवेदनशीलता मात्र हरवू देवू नये. इतरांच्या अस्तित्वाच्या आडोश्याचा उपयोग करून स्वतःला प्रकट करण्यापेक्षा स्वकर्तृत्वाने स्वतःची ओळख निर्माण करावी.

प्रत्येक पाऊल आत्मविश्वास आणि धैर्याने पुढे टाकावे.कारण ती केवळ लक्ष्मीचे रूप, त्यागमूर्ती, सोशिक, किंवा जन्मदात्रीच नाही तर समाज उभारणीच्या पहिल्या पायरीची पहिली वीट आहे. समाजाच्या भक्कम पायाभरणीतील एक महत्वाचा आणि जबाबदार घटक आहे..

# गळा आवळून महिलेची हत्या ; आरोपीला तात्काळ अटक

## खदान पोलिसांची कारवाई ; मोबाईल व १४ हजारांसाठी वादातून खूनाचा संशय

▪ प्रतिनिधी | अकोला ▪

*शहरातील खडकी परिसरात घडलेल्या महिलेच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाचा छडा लावत खदान पोलिसांनी अवघ्या काही तासांत आरोपीला ताब्यात घेतले. गळा आवळून हत्या केल्याचे पोस्टमार्टम अहवालातून स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपीला अटक केली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.*



खडकी येथील रहिवासी दीपाली राहुल टाले (वय ४०) यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची माहिती ५ मार्च रोजी सिटी कोतवाली दवाखाना पोलीस चौकीकडून खदान पोलीस स्टेशनला मिळाली. त्यानंतर पोलिसांनी मर्ग क्र. १५/२०२६ कलम १९४ बीएनएसएस २०२३ अन्वये नोंद करून मृतदेहाचे शवविच्छेदन केले. दरम्यान, पोस्टमार्टमच्या प्राथमिक अहवालात दीपाली टाले यांचा मृत्यू गळा आवळल्यामुळे झाल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांचा संशय अधिकच बळावला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी तात्काळ सखोल तपासाचे आदेश दिले.

तपासादरम्यान मृत महिलेच्या संपर्कातील व्यक्ती, घटनेच्या दिवशी तिच्याकडे आलेली मंडळी व परिसरातील माहिती पोलिसांनी गोळा केली. याचदरम्यान ६ मार्च रोजी अमित प्रेमशंकर मिश्रा (वय ३१, रा. संतोष नगर क्र. २, खडकी) यांनी खदान पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी शाह अजिम शाह (रा. चोहट्टा बाजार) हा संशयित दीपाली टाले यांच्या घरी आला होता. दोघांमध्ये वाद झाल्याची माहिती तसेच आरोपी महिलेचा मोबाईल व १४ हजार रुपये घेऊन गेल्याचे तिच्या भाचीने सांगितल्याचे फिर्यादीने नमूद केले.

वैद्यकीय अहवाल व मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी शाह अजिम शाह याचा शोध घेण्यासाठी दोन तपास पथके तयार केली. या पथकांनी अकोला शहरातील अकोट फैल, अंजनगाव, अकोट व चोहट्टा बाजार परिसरात तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदारांच्या मदतीने शोधमोहीम राबविली. अखेर आरोपीचा ठावठिकाणा लागल्यानंतर पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेत खदान पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली.

चौकशीनंतर आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलिस कोठडी मंजूर केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मनोज केदारे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांच्या नेतृत्वात सपोनि योगेंद्र मोरे, एएसआय संजय वानखडे, एएसआय दिनकर धुरंधर, निलेश खंडारे, गिरीष वीर, अमित दुबे, संदीप काटकर, भुषण मोरे, काळुराम पवार, अभिमन्यु सदांशिव, वैभव कस्तुरे व गोपाल जाधव आदींनी केली.

# मुलं पळविण्याच्या अफवेचा फुगा फुटला

### मनोरुग्ण महिला नातेवाईकांच्या स्वाधीन

▪ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ▪



मुर्तिजापूर शहरातील लहरिया प्लॉट परिसरात चॉकलेटचे आमिष दाखवून लहान मुलांना पळविण्याचा प्रयत्न करणारी महिला फिरत असल्याची अफवा पसरल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र पोलिसांच्या तत्पर कारवाईत ही महिला मनोरुग्ण असल्याचे स्पष्ट झाले असून तिला अखेर तिच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले.

दि. ४ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास शहर पोलीस स्टेशनला भ्रमणध्वनीवरून माहिती मिळाली की, एक महिला लहरिया प्लॉट भागात चॉकलेटचे आमिष दाखवून लहान मुलांना पळविण्याचा प्रयत्न करत आहे. माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणेदार अजित जाधव यांनी तात्काळ पो.उप.नि. गणेश सूर्यवंशी, पो.उप.नि. नितीन राठोड, पोहेकॉ सचिन दांदळे, म.पो.कॉ. निशा लांडारे यांना घटनास्थळी रवाना केले.

तोपर्यंत परिसरातील नागरिकांनी संबंधित महिलेला थांबवून ठेवले होते. पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. चौकशीदरम्यान ती आपले नाव, गाव किंवा कोणतीही माहिती सांगू शकत नव्हती. तिच्या वर्तनावरून ती मनोरुग्ण असल्याचा संशय आल्याने तिला मुर्तिजापूर येथील श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी दाखल करण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी तिला अकोला येथे हलविले. अकोला येथे उपचार सुरू असताना पोलिसांनी सिसीटीएनएस प्रणालीद्वारे तिची माहिती तपासली असता चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा पोलीस स्टेशन येथे मानव मिसिंग क्रमांक १८/२०२६ अंतर्गत नाहेदा बेगम (रा. राजुरा, जि. चंद्रपूर) अशी नोंद २८ फेब्रुवारी २०२६ रोजी झाल्याचे उघड झाले.

यानंतर राजुरा पोलिसांशी संपर्क साधून संबंधित महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेण्यात आला. तपासात अब्दुल मुज्जमील अब्दुल रशीद (रा. आझाद चौक, राजुरा, जि. चंद्रपूर) हे तिचे नातेवाईक असल्याचे समोर आले. त्यानंतर संबंधित महिलेला त्यांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे आणि पोलीस निरीक्षक अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि. गणेश सूर्यवंशी, पो.उप.नि. नितीन राठोड, पोहेकॉ सचिन दांदळे, म.पो.कॉ. रंजना उंबरकर, म.पो.कॉ. निशा लांडारे, म.पो.कॉ. निकिता इथाटे व म.पो.कॉ. माहेश्वरी वरचो यांनी केली.

दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अशी कोणतीही संशयास्पद घटना आढळल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधून शहानिशा करावी, असे आवाहन ठाणेदार अजित जाधव यांनी केले आहे.

# परिवहन महामंडळाच्या स्मार्ट पेमेंट योजनेवर तीव्र नाराजी

## योजना तात्काळ स्थगित करण्याची परिवहन मंत्र्यांकडे निलेश देव यांची मागणी

▪ प्रतिनिधी | अकोला ▪

राज्यातील प्रवाशांसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट पेमेंट (ग्श्ण) योजनेविरोधात प्रवासी आणि नागरिकांमध्ये नाराजी वाढू लागली आहे. या पार्श्वभूमीवर ही योजना तात्काळ स्थगित करून त्यावर पुनर्विचार करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निलेश देव यांनी राज्याचे परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

देव यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, राज्यभर लागू करण्यात आलेल्या या योजनेमुळे सर्वसामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, दिव्यांग तसेच ग्रामीण भागातील प्रवासी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. सवलतीसाठी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवाशांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याची टीका त्यांनी केली.



ग्रामीण आणि दुर्गम भागात स्मार्ट कार्ड वितरण केंद्रांची कमतरता असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी तांत्रिक सुविधा नसणे, मार्गदर्शनाचा अभाव तसेच नेटवर्कच्या समस्यांमुळे प्रवाशांना वारंवार आगारात फेऱ्या माराव्या लागत आहेत. काही ठिकाणी मशीन बिघाड किंवा तांत्रिक अडचणींमुळे तिकीट वितरणात विलंब होत असून प्रवाशांना गैरसोयीचा आणि काहीवेळा अपमानास्पद प्रसंगांनाही सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ज्येष्ठ नागरिक आणि डिजिटल साधनांचा मर्यादित वापर करणाऱ्या प्रवाशांसाठी ऑनलाइन नोंदणी व पडताळणी प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट ठरत असल्याची बाबही त्यांनी अधोरेखित केली. पूर्वी सवलतीसाठी केवळ ओळखपत्र पुरेसे असताना आता स्वतंत्र स्मार्ट कार्ड सक्तीचे केल्यामुळे अनावश्यक प्रशासकीय गुंतागुंत वाढल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, ही योजना तात्पुरती स्थगित करणे, सवलतीसाठी स्मार्ट कार्डची सक्ती रद्द करून पूर्वीप्रमाणे ओळखपत्रावर सवलत देणे किंवा संपूर्ण तांत्रिक व्यवस्था सक्षम होईपर्यंत योजना टप्प्याटप्प्याने राबविणे असे पर्याय सरकारने विचारात घ्यावेत, अशी मागणीही देव यांनी केली.

लाखो प्रवाशांच्या दैनंदिन प्रवासाशी संबंधित असलेल्या या विषयावर परिवहन मंत्र्यांनी तातडीने हस्तक्षेप करून जनहिताचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निलेश देव यांनी व्यक्त केली आहे.

### वंचितांच्या उद्धानासाठी रामकृष्ण डोंगरे यांचे कार्य समर्पित

▪ प्रतिनिधी | अकोला ▪

संत गाडगेबाबा आरोग्य सेवा अभियानाचे प्रमुख व्यसनमुक्ती प्रचारक प्रबोधनकार रामकृष्ण डोंगरे हे गेल्या २५ ते ३० वर्षापासून ग्रामीण व शहरी भागात विविध रोग निदान शिबिराच्या लाभ देत आहेत.

सोबतच संत महापुरुषांनी केलेल्या कार्याचा प्रचार व प्रसार ते प्रबोधनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, पाणी आडवा पाणी जिरवा, शैक्षणिक जनजागृती, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, निराधारांना जीवनाव वस्तू वाटप यासोबतच ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाचे मुख्य प्रवाहामध्ये येण्यासाठी सातत्याने प्रबोधनकार रामकृष्ण डोंगरे यांचे कार्य निरंतर चालू आहे.

# बालिका बेपत्ता; माहिती देण्याचे आवाहन

▪ प्रतिनिधी | अकोला ▪

जिल्ह्यातील खैरखेड येथील १६ वर्षीय बालिका बेपत्ता झाल्याची तक्रार हिवरखेड पोलीस ठाण्याला प्राप्त झाला. याबाबत कुणालाही माहिती मिळाल्यास माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



कु. राघीनी संदिप इंगळे (वय १६ वर्षे ७ महिने, रा. खैरखेड, जि. अकोला) ही बालिका १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. पाच वाजताच्या सुमारास बेपत्ता झाली. फिर्यादीच्या तक्रारीनुसार अज्ञात इसमाने फूस लावून तिला पळवून नेल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यावरून पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंदवून तपास हाती घेतला आहे.

युवतीचे वर्णन : रंग सावळा, चेहरा गोल, उंची सुमारे ५ फूट, बांधा मजबूत, केस काळे व लांब.

# श्री संताजी विद्यालयात 'पंचपरिवर्तन' संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय स्नेहमिलन उत्साहात

▪ प्रतिनिधी | अकोला ▪



श्री संताजी विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय स्नेहमीलन उत्साह, शिस्त आणि संस्कारांचा सुंदर संगम साधत अत्यंत दिमाखात संपन्न झाले. या सोहळ्याला शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची लाभलेली उपस्थिती हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता व सरस्वती मातेच्या पूजनाने करण्यात आली. पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल गोगे, डॉ. तारा हातवळणे, अशोक राणे, सचिन जोशी, स्वानंद कोंडोलीकर, समीर थोडगे, गिरीश कानडे, डॉ. पार्थ सारथी शुक्ल तसेच संस्थेचे अध्यक्ष मंगेश वानखडे यांची उपस्थिती होती.

यावर्षीच्या स्नेहमीलनाची संपूर्ण संकल्पना 'पंचपरिवर्तन' या विषयावर आधारित होती. सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय मूल्यांचे संवर्धन या पाच अंगांचा प्रभावी संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या सादरीकरणांतून दिला. बाळगटातील चिमुकल्यांपासून ते माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनी नृत्य, नाटिका, देशभक्तीपर गीत, समूहगायन आणि सामाजिक आशय असलेले सादरीकरण याद्वारे प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या आत्म विश्वासपूर्ण आणि शिस्तबद्ध सादरीकरणाने उपस्थित मान्यवरांनी विशेष समाधान व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून येतो, असे सांगत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता आणि संस्कारप्रधान कार्यपद्धतीचे कौतुक केले. या स्नेहमीलन सोहळ्यामुळे विद्यालय परिसरात आनंद, उत्साह आणि संस्कारमय वातावरण निर्माण झाले होते. पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या एकत्रित सहभागामुळे हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिक्षक, शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११७/२०२६ — प्रोसेस नं. १५०६/२०२६
चौ.ता. १६/०३/२०२६ — दिनांक : ०३/०२/२०२६

**अर्जदार :** भाउराव ज्ञानदेवराव सरोदे रा. पाण्याच्या टाकीजवळ, मु. शिलोडा, पोस्ट सुकोडा, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल
**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्री. ज्ञानदेव किसन सरोदे २. श्रीमती विमलबाई ज्ञानदेव सरोदे
**पत्ता :-** रा. मु. शिलोडा, पोस्ट सुकोडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. ज्ञानदेव किसन सरोदे यांचे दि. १०/०८/१९९३ रोजी व मयत श्रीमती विमलबाई ज्ञानदेव सरोदे यांचे दि. ०४/१०/२०१५ रोजी मु. शिलोडा, पोस्ट सुकोडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, जि. अकोला.**

जा.क्र. / तह/प्रस्तु-१/कावि- २२०/२०२६ — दिनांक ०६.०३.२०२६

**मौजे कौलखेड ता. जि. अकोला येथील शेत सर्व्हे क्र. १४ क्षेत्र - १.३८ हे. आर. चे ७/१२ मध्ये नावाची दुरुस्ती करणेबाबत.**

**जाहीरनामा**

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार विठ्ठल रमेशचंद्र ढोरे रा. कौलखेड ता.जि. अकोला यांनी मौजे कौलखेड ता. जि. अकोला येथील गट क्र. १४ क्षेत्र - १.३८ हे. आर. या शेतजमिनीच्या भोगवटदार सदरी असलेले त्रंबक विठोबा भावे या नावाऐवजी त्रंबक विठोबा ढोरे अशाप्रकारे नावात बदल करणेबाबत या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. अर्जदार यांनी या कार्यालयात प्रकरण सादर केल्यानुसार उपरोक्त प्रकरणात ज्यांना आक्षेप / हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी ०७ दिवसांचे आंत या कार्यालयात लेखी स्वरुपात आपले आक्षेप / हरकती सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेले आक्षेप / हरकत विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का
**(कुणाल झाल्टे)**
**तहसिलदार अकोला**

**जाहीर सुचना**

सर्वत्र लोकांना, वित्तीय संस्था, बॅक यांना ह्या जाहीर सुचनेद्वारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे शरद प्रकाश वाघमारे, रा. अकोट ता. अकोट जि. अकोला हे खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचे मालक आहेत.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे खानापुर त्र्यंबकपुर ता. अकोट जि. अकोला येथील शेत सर्व्हे नं. १६१/१/४ / बी क्षेत्रेफळ ९३ चौ.मि. त्या चमुः विमस पुर्वेस - रघुवंशी यांची मालमत्ता पश्चिमेस - रोड उत्तरेस - प्लॉट नं. ४ए दक्षिणेस प्लॉट नं. ५ए

वरील मालमत्ता आमचे पक्षकाराने दस्त क्र. ४१६९/२०२५ दि. ०१/०८/२०२५ चे खरेदीखता नूसार विकत घेतलेली आहे. पुर्वीचे मालक यांचे मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. त्याचे वर्णन.

१. खरेदीखत दस्त क्र. २६०६/२०१५ दि. १९/११/२०१५ अनिता सुरेंद्रसिंग तोमर. २. खरेदीखत दस्त क्र. १४१२/२०१५ दि. ११/०६/२०१५ मनिष पुरूषोत्तम अग्रवाल ३. खरेदीखत दस्त क्र. १८९०/२०१० दि. ०१/०६/२०१० अनिता सुरेंद्रसिंग तोमर,

४. खरेदीखत दस्त क्र. ३४१/२००८ दि. ०१/०२/२००८ शंकर महादेव खवले वर नमुद केलेले चारही मुळ खरेदीखत हरवीले/गाहाळ झाले आहे. त्या करीता पो. स्टे. अकोट येथे दि. ०६/०३/२०२६ रोजी लेखी तक्रार दिली आहे व अद्यापही मिळुन आले नाही.

त्या अर्थी वरील मालमत्तेवर कोणाचा कोणत्याही प्रकारचा गहाण, बोजा, हक्क, अधिकार, ताबा, आक्षेप, उजर अथवा कुठल्याही बँकेचे कर्ज अथवा गहाण व वर नमुद मुळ खरेदी खत असल्यास त्यांनी ही सूचना प्रकाशीत झाल्या पासून ७ (सात) दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी कागद पत्रासह आक्षेप नोदवावा. वरील मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास बॅक ऑफ बडोदा शाखा अकोट हे वरील मलमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करण्याचे विचाराधीन आहे. त्या नंतर कोणाचीही हरकत अथवा उजर ग्राहय धरला जाणार नाही याची नोदं घ्यावी. करीता आज दि. ०७/०३/२०२६ रोजी प्रकाशीत केली.

अकोला
दि. ०७/०३/२०२६

**अधिवक्ता सचिन ए. बाळापुरे**
जनता बॅक च्या जवळ डाबकी रोड अकोला
मो. नं ८१४९४९८४४८ / ९४२२८६१८६०

# वसतिगृह प्रवेश, आधार व स्वयंम योजनेसाठी मुदतवाढ

## - राज्यातील २१,६०० विद्यार्थ्यांना लाभ मिळणार
## - डॉ. सुधीर ढोणे यांच्या पाठपुराव्यास यश

▪ प्रतिनिधी | अकोला ▪

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन शासकिय वसतिगृह, आधार व स्वयंम या योजना १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत आहे. यावर्षी या योजनेची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२५ ही दिली होती. परंतु अनेक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रीया ३१ डिसेंबर पर्यंत चालल्याने अनेक विद्यार्थी या योजनेपासुन वंचित राहिले होते. विद्यार्थ्यांची ही अडचण लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते डॉ. सुधीर ढोणे यांनी या योजनेस मुदतवाढ मिळावी यासाठी बहुजन कल्याण विभागाचे मंत्री, अप्पर मुख्य सचिव व उपसचिव यांना प्रत्यक्ष भेटुन निवेदन दिले व मुदतवाढीची मागणी केली. विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेता बहुजन कल्याण विभागाने या योजनेस याआधी दि. ६ ते १५ फेब्रुवारी पर्यंत व आता दि. २५ फेब्रुवारी ते १० मार्च पर्यंत मुदतवाढ दिली आहे. डॉ. सुधीर ढोणे यांच्या पाठपुराव्यास यश आल्याने राज्यातील हजारो विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.



सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये १२ वी नंतर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया ऑनलाईनरित्या राबविण्यात आलेली आहे. मात्र वसतिगृहात निवड यादीनुसार प्रवेश देऊनही अद्याप जागा रिक्त राहिल्याने वसतिगृह प्रवेश, आधार, स्वयंम योजनेसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती (भटक्या जमाती मधील धनगर समाजाचे विद्यार्थी वगळून) विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना प्रति जिल्हा ६०० या प्रमाणे एकूण २१६०० विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येत आहे. व भटक्या जमाती मधील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना लागु आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १० महिन्यासाठी भोजन, निवास व निर्वाह भत्ता म्हणुन रू. ६० हजार, इतर महसुली विभागीय शहरातील व उर्वरीत क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या रू. ५१ हजार, इतर जिल्हयाच्या ठिकाणी तसेच महानगरपालिकेच्या हद्दीपासुन ५ कि.मी. परिसरात असलेली महाविद्यालये/शैक्षणिक संस्था या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रू. ४३ हजार, तालुक्यात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रू ३८ हजार मिळणार आहेत.

महानगर पालिका हद्दीमधील महाविद्यालयामंध्ये १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणाऱ्या सन २०२५-२६ मध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शासन निर्णयान्वये प्रथमतः वसतिगृह प्रवेशाकरिता अर्ज करणे अनिवार्य आहे. ऑनलाईन प्रणालीमध्ये आधार/स्वयंम योजना निवडून अर्ज भरण्याचा प्रयत्न केल्यास आधी तालुका दिसणार नाही. त्यामुळे वसतिगृहाचा अर्ज भरावा. त्यानंतर मंजुर झालेल्या अर्जाचा आरक्षण निहाय गुणवत्तेनुसार शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश दिल्या जाईल. तसेच निवड प्रक्रिया झाल्यानंतर व वसतिगृहातील १०० टक्के जागा भरल्यानंतर उर्वरीत अर्जांचा आधार/स्वयंम योजनेकरीता आरक्षण निहाय गुणवत्तेनुसार विचार करण्यात येईल.

तालुक्याचे ठिकाण असलेल्या शहराच्या ठिकाणी नगरपालिका, नगरपरिषद हद्दीमध्ये कार्यरत महाविद्यालयांमध्ये १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेणाऱ्या तसेच २०२५-२६ या शैक्षणिक सत्रामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी जे भाडयाने राहत आहेत अशा इच्छुक विद्यार्थ्यांनी वसतिगृह न निवडता थेट आधार/स्वयंम योजनेकरिता अर्ज भरावा.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ९७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# शेतकऱ्यांना पाण्यावर बंदी, कंत्राटदाराला वनतलाव मोकळा?

## अजनांदेवीत संतप्त शेतकऱ्यांचा संताप; प्रशासनाविरोधात आंदोलनाचा इशारा

**आष्टी शहीद /जनमाध्यम**



कारंजा (घा.) तालुक्यातील अजनांदेवी येथील वनतलावातील पाण्याच्या वापरावरून प्रशासनाविरोधात शेतकऱ्यांचा संताप उसळला आहे. शेतीसाठी पाणी वापरणाऱ्या शेतकऱ्यांवर निर्बंध घालत असताना सिमेंट रस्ता बांधकाम करणाऱ्या कंपनीला मात्र टँकरने मोठ्या प्रमाणात पाणी उपसा करण्याची मोकळीक दिली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या दुहेरी धोरणाविरोधात अजनांदेवीतील शेतकरी आक्रमक झाले असून लघु सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

अजनांदेवी हे लहानसे गाव असून येथील बहुसंख्य नागरिक शेतीवर अवलंबून आहेत. गावालगतच्या जंगल परिसरात असलेला वनतलाव वर्षभर पाण्याने भरलेला असतो. या तलावातील पाणी शेतकऱ्यांच्या शेतीसाठी तसेच जंगलातील वन्यप्राण्यांच्या पाण्याच्या गरजा भागवण्यासाठी महत्त्वाचे ठरते. मात्र अलीकडे या तलावातील पाणी सिमेंट रस्ता बांधकाम करणाऱ्या एका ठेकेदार कंपनीला देण्यात आल्याने गावात संतापाची लाट उसळली आहे.

शेतकऱ्यांच्या माहितीनुसार, संबंधित कंपनीला दिवसाला केवळ चार टँकर पाणी घेण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात रात्रंदिवस सुमारे वीस टँकरद्वारे पाणी उपसा केला जात असल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी लघु सिंचन विभागाच्या आर्वी उपविभागातील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नसल्याने पाण्याच्या उपशावर नियंत्रण नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.दरम्यान, शेतकरी नाल्यातून वाहणाऱ्या पाण्याचा वापर करून आपल्या पिकांना पाणी देत असतानाही त्यावर बंदी घालण्याचा इशारा अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्याने संताप अधिकच वाढला आहे. ठेकेदारांना पाणी उपसायची मोकळीक आणि शेतकऱ्यांना बंदी, हा कोणता न्याय असा प्रश्न शेतकरी करत आहेत.जिल्हा परिषद लघु सिंचन विभागातील काही अधिकारी वनतलाव परिसरात पोहोचले होते. यावेळी शेतकऱ्यांना पाणी वापर थांबवण्याचा इशारा देण्यात आल्याचे सांगितले जात आहे. यामुळे गावातील शेतकरी अधिकच संतप्त झाले असून प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

या संदर्भात आर्वी येथील जिल्हा परिषद लघु सिंचन उपविभागीय अधिकारी साबळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांचा पाणी वापर सध्या बंद करण्यात येत आहे. तसेच येत्या १५ मार्चपासून टँकरद्वारे होणारा पाणी उपसाही थांबवण्यात येईल.मात्र शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यावर घाला घालून ठेकेदारांना मोकळीक देणाऱ्या प्रशासनाचा हा अन्याय सहन केला जाणार नाही, असा इशारा अजनांदेवी येथील शेतकऱ्यांनी दिला असून लवकरच आंदोलन उभारण्याची तयारी सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# श्रेष्ठ कर्म हेच जीवनाचा आधार-श्री.पाराजे



**सेलु/जनमाध्यम**

रोज आमच्या तहसील कार्यालयात अनेक लोक येतात. माझे हे ध्येय असते की ती ताण-तणावात आलेली व्यक्ती सुखी व समाधानी होऊन जावी. ते आशीर्वाद आपल्याला कामी येतात. धका-धकीच्या जीवनात देवाचे ध्यान करणे अति आवश्यक आहे, असे डॉ. शकुंतला पाराजे (तहसिलदार, सेलू) यांनी महिला दिनाला व्यक्त केले. नारी ही पहाडासारखी विशाल आहे प्रत्येक घरामध्ये दुर्गा, अंबा, सरस्वती,महाकाली या देवींच्या रूपात तिची पूजा केली जाते. घराला स्वर्ग बनवणे ही तिची जबाबदारी आहे. असे प्रेरणादायी वक्तव्य वर्धा सेवा केंद्र संचालिका माधुरी दीदी यांनी दिले. नारी ही विश्व परिवर्तनाची आधारस्तंभ आहे, असे म्हणत सेलू सेवा केंद्र संचालिका दर्शना दीदींनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

दामिनी पथकाच्या तारा ताकसांडे (महिला सहायक पोलिस निरीक्षक) ,दिपाली देशमुख यांनी महिला सुरक्षा बाबत मार्गदर्शन केले, तसेच माहेरी शांती निवास सेलू येथील मायाताई शेळके यांनी शुभेच्छा दिल्या.ब्रह्माकुमारी शिवशक्ती भवन भगत ले-आउट, सेलू द्वारे विश्व परिवर्तन मे महिलाओ की भूमिका या विषयावर जागतिक महिला दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात प्रज्वलनाने झाली.तन्वी सोनटक्के ने सुंदर नृत्य प्रस्तुत केले,रेणु दिदीं महिला दिनावर गीत सादर केले व सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले, वैष्णवी दिदींनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## संक्षिप्त

### घरावरून पडल्याने ज्येष्ठाचा मृत्यू

**वर्धा-** नाचणगाव परिसरात घरावरून पडल्याने एका ज्येष्ठ इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. शिवबालक शंकर कांबळे (वय ६९, रा. एकतानगर, वर्धा) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कांबळे हे घराच्या छतावर काही काम करत असताना त्यांचा अचानक पाय घसरला. त्यामुळे तोल जाऊन ते खाली कोसळले. या अपघातात त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी मिळालेल्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### बसस्थानकाजवळून दुचाकी चोरी

**तळेगाव-** चिस्तूर येथील बसस्थानकाजवळ उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. आंजी (मोठी) येथील आशिष पदवाड हे दुचाकीने आपल्या गावी परतत होते. दरम्यान, चिस्तूर येथे त्यांच्या दुचाकीचे पेट्रोल संपल्याने त्यांनी एमएच २७ ई २७६८ क्रमांकाची दुचाकी बसस्थानकाजवळ उभी करून पेट्रोल आणण्यासाठी तेथून निघाले. सुमारे अर्ध्या तासानंतर परत आल्यानंतर दुचाकी जागेवर दिसून आली नाही. परिसरात शोध घेऊनही दुचाकीचा काहीच मागमूस लागला नाही. अखेर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून तळेगाव (श्याम पंत) पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### दारू पिऊन वाहन चालविणाऱ्या पाच जणांवर कारवाई

**हिंगणघाट -** शहरातील उपजिल्हा वाहतूक शाखेने दारू सेवन




करून दुचाकी चालविणाऱ्या पाच वाहनचालकांविरुद्ध कारवाई करत गुन्हे दाखल केले. नियमित वाहतूक तपासणीदरम्यान ही कारवाई करण्यात आली.वाहतूक पोलिसांनी मोटरसायकल क्रमांक एमएच ३२ एई ८८६२ चा चालक प्रशांत रामा बोरकुटे (रा. हमदापूर), एमएच ३२ झेड ३९२५ चा चालक गणेश गोविंदराव पाल (रा. संत गोमाजी वार्ड), एमएच ३२ एच २२४ चा चालक रवींद्र भीमराव वनकर (वय ३९, रा. भीमनगर वार्ड), एमएच ३२ एडी ७६५८ चा चालक राहुल अशोकराव घवघवे (वय ३२, रा. सातेफळ) तसेच एमएच ३२ एपी ९६६९ चा चालक प्रफुल जनार्दन गहूकर (वय ३५, रा. पिंपरी, पोस्ट गिरड, ता. समुद्रपूर) यांच्यावर कारवाई केली.तपासणीदरम्यान पाचही चालक दारूच्या नशेत दुचाकी चालविताना आढळले. त्यांच्याविरुद्ध मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक शरद आवारे, पोलीस उपनिरीक्षक सौ. मुसळे, पोलीस हवालदार भोयर व पोलीस शिपाई शिवाजी पाटील यांनी केली.

### कालव्यात बुडून इसमाचा मृत्यू

**देवळी-** आंघोळीसाठी गेलेल्या एका इसमाचा कालव्याच्या पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना नांदोरा (डफरे) शिवारात घडली. सतीश गोवर्धन बोटफोले (वय ४२, रा. नांदोरा डफरे) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सतीश बोटफोले हे आंघोळीसाठी कालव्याजवळ गेले होते. दरम्यान, पाण्यात उतरताच त्यांचा तोल जाऊन ते खोल पाण्यात गेले. पोहता न आल्याने ते पाण्यात बुडाले. काही वेळानंतर ही घटना लक्षात येताच स्थानिकांनी शोध घेतला. मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी देवळी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

### गळफास घेऊन इसमाची आत्महत्या

**वर्धा-** गणेशपूर येथे एका इसमाने गळफास घेऊन आत्महत्या



केल्याची घटना उघडकीस आली आहे. मनोज गोविंदराव मलोंडे (वय ४१, रा. गणेशपूर) असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज मलोंडे यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली. ही घटना समोर आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून त्याबाबत तपास सुरू आहे. याप्रकरणी सावंगी (मेघे) पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# पवनारच्या बाबुरावजी बांगडे विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा अविस्मरणीय स्नेहमेळावा

**वर्धा/पवनार/जनमाध्यम**

तीन दशकांहून अधिक काळ लोटल्यानंतर पुन्हा एकदा शालेय जीवनाच्या आठवणींना उजाळा देत बाबुरावजी बांगडे विद्यालय, पवनार येथील १९९०-९१ या शैक्षणिक वर्षातील माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक-शिक्षिकांचा अविस्मरणीय स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात पार पडला. पवनार येथील तृप्ती हॉटेलमध्ये आयोजित या कार्यक्रमाला शंभराहून अधिक माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांनी उपस्थित राहून जुन्या आठवणींचा खजिना उघडला.



३५ वर्षांनंतर आठवणींचा महापूर

३५ वर्षांनंतर सर्व मित्र-मैत्रिणींना शोधून काढणे, त्यांचे मोबाईल क्रमांक गोळा करून ग्रुप तयार करणे आणि सगळ्यांना एका छताखाली आणणे हे आयोजकांसाठी मोठे आव्हान होते. मात्र सर्वांच्या सहकार्यामुळे हा स्नेहमेळावा अत्यंत आनंददायी वातावरणात पार पडला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक मोहोड सर होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले तसेच दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. देवमन मालखेडे यांनी राष्ट्रगीतासाठी आदेश दिल्यानंतर सर्वांनी एकत्रित राष्ट्रगीत गाऊन कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली. उपस्थित मान्यवरांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी प्रभाकर धवणे यांनी आपल्या मनोगतात शाळेच्या सुवर्ण आठवणी जाग्या केल्या. तसेच वर्षा कोल्हे, मंदा मंगरूळकर, भारती भट, संजय वाघमारे, प्रवीण थूल, विजय मुंगले, पुष्पा महाकाळकर, गजानन मुडे, सुनीता उरकुडे, कल्पना सरोदे आदींनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत भावना व्यक्त केल्या. उपस्थित शिक्षक-शिक्षिकांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत जुन्या आठवणींना उजाळा दिला.सन १९६२ मध्ये बाबुरावजी बांगडे यांनी या विद्यालयाची स्थापना केली. पवनार, महाकाळ, कान्हापूर, गोंदापूर, मोर्चापूर तसेच इतर गावांतील विद्यार्थी येथे शिक्षण घेत होते. या शाळेतून घडलेले अनेक विद्यार्थी आज सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, डॉक्टर, अभियंते, वकील, पोलीस, शिक्षक तसेच सैन्य व विविध सरकारी पदांवर कार्यरत असल्याचे यावेळी अभिमानाने सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दीपक नगराळे यांनी प्रभावी शैलीत केले, तर आभार प्रदर्शन रामदास घुगरे यांनी केले. स्नेहसंमेलनाच्या यशस्वितेसाठी योगेश लेंडे, अनिल वाघमारे, देविदास गुरणुले, सुरेश जिंदे, विनोद पेठकर, अनिल शंभरकर, विष्णू सोनटक्के, नरेश चौधरी, प्रमोद थूल, विनोद भानसे तसेच अनेक माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.३५ वर्षांनंतर झालेल्या या स्नेहसंमेलनाने शालेय जीवनातील मैत्री, आठवणी आणि जिव्हाळा पुन्हा एकदा ताजातवाना केला. अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले आणि पुन्हा भेटूया या भावनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# सराफा व्यवसायिकांच्या सुरक्षेसाठी 'सराफा दक्षता समिती'ची बैठक

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील सराफा व्यवसायिकांच्या सुरक्षेच्या समस्या सोडविणे तसेच चोरीच्या किंवा संशयित मालमत्तेच्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हास्तरीय सराफा दक्षता समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले. पोलीस अधीक्षक कार्यालयात शनिवारी (दि. ७) पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.



बैठकीत चोरीची अथवा संशयित मालमत्ता जप्त करताना तपासी अधिकाऱ्यांनी पाळावयाच्या मार्गदर्शक तत्त्वांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तपासी अधिकाऱ्यांनी थेट सराफांच्या दुकानात जाऊन कारवाई करण्याऐवजी प्रथम संबंधित प्रकरणाची चौकशी करावी आणि त्यानंतर सराफा दक्षता समितीमार्फत पुढील कारवाई करावी, असे निर्देश देण्यात आले.जिल्ह्यातील सराफा बाजारात सोन्या-चांदीचा व्यापार करणारे, गहाण ठेवणारे सुवर्णकार तसेच संबंधित व्यवसायिकांनी आपली मूलभूत माहिती संबंधित पोलीस स्टेशनला देण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच दागिने किंवा संशयित माल विक्रीसाठी येणाऱ्या ग्राहकांकडून ओळखपत्राची छायांकित प्रत घेऊन त्याची नोंद रजिस्टरमध्ये ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.सोन्या-चांदीचे दागिने विक्रीसाठी आलेल्या व्यक्तीवर संशय आल्यास तात्काळ संबंधित पोलीस स्टेशन किंवा स्थानिक गुन्हे शाखेला कळवावे, असेही बैठकीत सांगण्यात आले. सराफा व्यवसायिकांच्या सुरक्षेसंदर्भातील शासनाच्या परिपत्रकाची माहिती देत पोलिसांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सराफा व्यवसायिकांनी मांडलेल्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. अनेक प्रश्नांचे तत्काळ निराकरण करण्यात आले. सराफा दक्षता समिती स्थापन केल्याबद्दल सराफा व्यवसायिकांच्या वतीने पोलीस अधीक्षकांचा सत्कार करण्यात आला.बैठकीस अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्यासह अमोल ढोमणे, देविदास करंडे, रोहन कठाणे, सौरभ ढोमणे, परसन कोठारी, गुंजन टिबळेवाल, प्रशांत चिंचमलातपूरे, नरेश करंडे व विक्रम देवगीरकर उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदार व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठकीत सहभागी झाले.

# प्रज्वल नासरेची यूपीएससीत यशस्वी झेप

## खा.अमर काळे यांनी केले अभिनंदन

**वर्धा/जनमाध्यम**

कारंजा (घाडगे) तालुक्यातील ठाणेगाव येथील प्रज्वल धनराज नासरे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) परीक्षेत ६७७ वी रँक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल खासदार अमर काळे यांनी प्रज्वल यांच्या घरी भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील प्रज्वलने जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण परिश्रमाच्या बळावर हे यश मिळविले आहे. साध्या परिस्थितीत शिक्षण घेत असताना त्यांनी २०२३ मध्ये बी.ए. पदवी पूर्ण केली. त्यानंतर २०२५ मध्ये राज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करून स्पर्धा परीक्षांच्या तयारीला सुरुवात केली.विशेष म्हणजे कोणत्याही प्रकारचे कोचिंग न घेता स्वअभ्यासाच्या बळावर त्यांनी यूपीएससीसारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे.खा. अमर काळे यांनी प्रज्वल यांच्याशी संवाद साधत त्यांच्या अभ्यास पद्धतीची माहिती घेतली व त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. छोट्या गावातून येऊन राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षेत मिळविलेले यश हे जिल्ह्यासाठी अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.प्रज्वल नासरे यांच्या या यशाबद्दल जिल्ह्यातील विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.या प्रसंगी साहेबराव पाडे, वासुदेवराव सोनटक्के, अरविंदराव नासरे, प्रतापराव घाडगे, प्रभाकरराव बगवे, प्रभाकरराव धुर्वे, किशोरराव रेवतकर, सुनिलराव जाधव, गोविंदराव खडाते, पंकज रेवतकर, जितेंद्र नासरे, राज घाडगे, मिलिंद दारवेकर, मनोज रेवतकर, सुभाष नासरे, कृष्णाजी भागे आदी उपस्थित होते.




# हास्य-व्यंग्याचा रंगोत्सव; सोलंकींच्या कवितांनी रंगला कवी दरबार

**वर्धा/जनमाध्यम**

रंगोत्सवाच्या निमित्ताने माहेश्वरी मंडळ, वर्धा यांच्या वतीने आयोजित हास्य कवि संमेलनात कविता, व्यंग्य आणि हास्याची रंगतदार मेजवानी रंगली. विविध शहरांतून आलेल्या कवींनी आपल्या ओघवत्या सादरीकरणातून श्रोत्यांना अक्षरशः ठहाक्यांच्या वर्षावात न्हाऊ घातले. होळीच्या आनंदी वातावरणात रंगलेले हे कवि संमेलन साहित्यप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरले.

या कवि संमेलनाचे प्रमुख आकर्षण ठरले भोपाल येथील सुप्रसिद्ध मंचसंचालक व हास्यकवी धर्मेंद्र सोलंकी. त्यांच्या चपखल विनोदांनी आणि जीवनानुभवातून उमटलेल्या कवितांनी कार्यक्रमाला वेगळीच उंची दिली. कुटुंबासाठी आयुष्यभर



माहेश्वरी मंडळाचा रंगोत्सव

संघर्ष करणाऱ्या वडिलांवर त्यांनी सादर केलेल्या भावपूर्ण ओळींनी उपस्थितांची मने जिंकली. दुःख, तकलीफ, फिकर, आव्हाने मागे लागली तरी पिताजी ठाम उभे राहिले या आशयाच्या ओळींना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

सोलंकी यांनी देशभरातील हजारो मंचांवर तसेच विविध दूरचित्रवाहिन्यांवर आपल्या काव्यकलेची छाप उमटवली आहे.

कवि संमेलनाची सुरुवात रायगड जिल्ह्यातील मोहोपाडा येथील श्रृंगार रसाच्या कवयित्री नीलम सोमानी यांनी सरस्वती वंदनेने केली.

तेरे ही कारण है मिला जीने का यह आधार मां, शब्दों से ही दर्द को सीने का यह उपहार मां या ओळींनी वातावरण भावपूर्ण झाले. त्यानंतर अकोला येथील कवी कृष्णकुमार शर्मा यांनी गीत-गझलांच्या माध्यमातून रसिकांची मने जिंकली तर भोपालचे आकाशवाणी उद्घोषक आणि हास्य-व्यंग्य कवी अनुप कुमार धामने यांनी विनोदी शैलीतील सादरीकरणातून श्रोत्यांना खळखळून हसवले.कार्यक्रमात सहभागी सर्व कवींचा माहेश्वरी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजक राजकुमार जाजू यांनी जीवनात रंगांचे आणि आनंदाचे महत्त्व अधोरेखित करत रंगोत्सवाच्या सांस्कृतिक परंपरेवर भाष्य केल.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष विजय राठी, नवयुवक मंडळ अध्यक्ष राहुल राठी, महिला मंडळ अध्यक्षा ललिता राठी, नवयुवती मंडळ अध्यक्षा उमा चांडक यांच्यासह समाजातील अनेक सदस्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन राजकुमार जाजू यांनी केले तर आभार सचिव धर्मेंद्र मुंधडा यांनी मानले. तसेच चित्र-पहेली स्पर्धेतील विजेती कृष्णा मनीष चांडक हिला कविंच्या हस्ते गौरविण्यात आले.


जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १००**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त




### श्री.तनसुखदास राठी विद्यालयात मराठी भाषा गौरवदिन

**कुऱ्हा-**जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती व तनसुखदास राठी विद्यालय वऱ्हा यांच्या संयुक्त विद्यमाने जेष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्य मराठी भाषा गौरव दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक संजय पाचंगे,प्रमुख अतिथी म्हणुन मंगेश भालेराव हे व्यासपिठावर उपस्थित होते.आपल्या प्रास्ताविकातून सुरेंद्र गणोरकर यांनी मराठी भाषा दिन हा महाराष्ट्रातील जनतेसाठी अभिमानाचा आत्मीयतेचा साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्व कवी,लेखक कादंबरीकार,नाटककार यांच्या गुणगौरवाचा दिवस असतो.स्पर्धेला परीक्षक म्हणून रत्नप्रभा डोंगरे, सचिन पांडे, स्वाती मथुरकर लाभले होते. यामध्ये माध्यमिक गटातून अंतरा बुगुल ( प्रथम क्रमांक) आनंदी चंद्रशेखर खुळे ( द्वितीय क्रमांक ) अनुष्का सुनीलराव वानखडे ( तृतीय क्रमांक ) तसेच प्राथमिक गटातून जीविका वसंत मलवार ( प्रथम क्रमांक) भावना अतुल मातकर ( द्वितीय क्रमांक) नयना प्रशांत येरणे ( तृतीय क्रमांक ) उत्कृष्ट भाषणा करिता अंतरा बुगुल हिचा प्रथम क्रमांक आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी तालन, प्राची माळोदे यांनी केले. आभार अजय गहलोत यांनी मानले. कार्यक्रमाचे मुख्य आयोजन सुरेंद्र गणोरकर व स्वाती मथुरकर यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि वर्ग ९ वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

### देविका देशमुख सी.ए परीक्षा उत्तीर्ण



**शिराळा-**येथील कुलदिप देशमुख यांची मुलगी कु. देविका कुलदिप देशमुख हिने शिराळा गावातुन प्रथमच सी.ए.( chartered accountant ) परिक्षा उत्तीर्ण करून मोठे यश संपादन केले आहे. तिचे व परिवाराचे शिराळा परिसरात कौतुक व अभिनंदन होत आहे.देविका कुलदिप देशमुख हिने सी.ए.परिक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल मनोजभाऊ देशमुख, दुश्यंत अनंतराव देशमुख, दर्शन खाडे, संकेत देशमुख, विश्वजीत देशमुख, रोशन खाडे, राहुल कदम, पत्रकार डीआर वानखडे व शिराळा गावक-यांनी कौतुक व अभिनंदन होत आहे.



### लाईनमन दिवस साजरा

**लेहेगाव-**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी अमरावती शहर व्दारा लाईनमन दिवस विविध उपक्रमाने कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय परिसर, डफरीन रुग्णालय, अमरावती येथे साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे उद्घाटक अशोक साळुंखे मुख्य अभियंता अमरावती परिमंडळ तर प्रमुख पाहुणे म्हणून दिपक देवहाते अधीक्षक अभियंता अमरावती मंडळ, दिपाली मांडेलवार पायाभूत आराखडा, अधीक्षक अभियंता, अमरावती मंडळ, राजेश घाटोळे कार्यकारी अभियंता अमरावती शहर यांची उपस्थीती होती. याप्रसंगी डॉ.शशांक चिटमुलवार, डॉ. सतेज शिरभाते यांनी आरोग्य शिबिरादरम्यान हृदयविकार झटका, शॉक लागल्यास प्राथमिक उपचाराबद्दल मार्गदर्शन केले. हास्यकवी गौतम गुळधे व व-हाडी कवी मंगेश वानखडे यांनी बहारदार काव्य सादर करुन कार्यक्रमात रंगत भरली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधीरकुमार वानखेडे व विलास शिंदे अतिरिक्त कार्यकारी अभियंता अमरावती शहर,सूत्रसंचालन नीलेश आवारे यंत्रचालक तर आभार प्रदर्शन रामकृष्ण चिखलकर यंत्रचालक यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता अविनाश डहाके उच्च स्तर लिपीक मास व कर्मचारी अमरावती शहर यांनी परिश्रम घेतले.



### छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शोभायात्रा

**खल्लार-**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने दरवर्षी तिथी प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दर्यापूर शहरातून भव्य शोभायात्रा चे आयोजन करण्यात आले होते.छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सांप्रदायिक दिंडी, डिजे वर छत्रपती शिवाजी महाराज यांचे गित लाऊन त्यांच्या बद्दल गौरव करण्यात आला.प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून भव्य मिरवणूकीची सुरुवात करण्यात आली.यावेळी आमदार गजानन लवटे, युवासेना जिल्हा प्रमुख अंकुश पाटील कावडकर, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बबनराव विल्हेकर, सचिव प्रदीप वडतकर, तालुका प्रमुख प्रमोद धानोरकर, निलेश पारडे, गुणवंत गावंडे, किशोर टाले, मोहन बायस्कर, सागर गिरहे, रुपेश मोरे, सतिश साखरे, भास्कर थोटे, निलेश होले, अमोल गावंडे, नितेश गावंडे, गोपाल अग्रवाल, दिपक बगाडे, अमोल अरबट, संजय कोरडे, हरिदास ठाकरे,शरद गावंडे, शादाब सुपी, अमन पटेल, संदीप धर्माळे, प्रशांत धर्माळे, सतिश जामनिक, सुनिल पाचडे, मोहन खरबडकार, शुभम विल्हेकर, आशिष लायडे, पंकज राणे, राज गुजराती, करण चक्रे, राजू मानकर, विलास गिरहे, रमेश बुंदिले, भगवान उटाळे, प्रविण पारडे, गौरव आवारे, कुलदीप चौधरी, वेदांत साखरे,संदीप शेळके, अंकुश साबळे, शरद आठवले, मंगेश पारडे, दत्ता लाजुरकर, संतोष हागे, प्रविण बायस्कर, मंगेश धुराटे, खंडू राऊत, सौरभ वायझाळे तसेच हजारोंच्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# पूजाच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा

## ई-रिक्षा चालक हा व्यवसाय करते आहे कुटूंबाचा उदरनिर्वार

**चांदूरबाजार/वार्ताहर**

तालुक्यातील शिवाजीनगर (सिरजगाव बंड) येथील रहिवासी असलेली पूजा वानखेडे ही वय अवघे २२ वर्षे, शिक्षण बी.एससी. कॉम्प्युटर; पण नोकरीच्या मागे न लागता स्वतःच्या कष्टावर उभे राहण्याचा निर्धार करून एका तरुणीने 'ई-रिक्षा चालक' हा व्यवसाय निवडला आहे. चांदूरबाजार तालुक्यातील पूजा संतोषराव वानखेडे हिने घेतलेला हा धाडसी निर्णय आज सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या या कर्तृत्वाला समाजातून मानाचा मुजरा केला जात आहे.



मागील सहा महिन्यांपासून ई-रिक्षा चालवत आहे. सुशिक्षित असूनही नोकरीची वाट न पाहता स्वतःचा व्यवसाय उभारण्याचा तिचा निर्धार अनेकांना प्रेरणा देणारा आहे. या व्यवसायातून ती दररोज सुमारे ४०० ते ५०० रुपये उत्पन्न मिळवत असून आत्मनिर्भर जीवन जगत आहे.पूजाचे वडील स्वर्गीय संतोषराव वानखेडे यांचे निधन ती केवळ सहा महिन्यांची असताना झाले. वडिलांच्या छत्रछायेशिवाय वाढलेल्या पूजाला आई श्रीमती जया वानखेडे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत वाढवले. त्यांनी वर्कर म्हणून काम करत मुलीचे संगोपन केले आणि तिला शिक्षणही दिले. आज पूजाला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची हिंमत तिच्या आईकडूनच मिळाली आहे.सामान्यतः प्रवासी रिक्षा चालविण्याच्या क्षेत्रात पुरुषांचेच वर्चस्व दिसून येते. काही महानगरांमध्ये महिलाही हा व्यवसाय करतात, पण ग्रामीण भागात ही बाब अजूनही दुर्मिळ आहे. अशा परिस्थितीत चांदूरबाजार तालुक्यातील पहिली सुशिक्षित महिला ई-रिक्षा चालक म्हणून पूजाने वेगळी ओळख निर्माण केली आहे.परिस्थितीशी दोन हात करत स्वावलंबनाचा मार्ग निवडणाऱ्या पूजाने नव्या पिढीसमोर एक प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे. तिच्या या धाडसी आणि कष्टाळू वृत्तीला समाजातून कौतुकाची दाद मिळत आहे.

याबाबत **पूजा वानखेडे सांगते,** 'माझे शिक्षण बी.एससी. कॉम्प्युटर झाले आहे. पण नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय करायचा, असे मी ठरवले होते. इतर व्यवसायासाठी भांडवल नव्हते. त्याचवेळी पंचायत समितीमार्फत महिलांसाठी पिंक ई-रिक्षा योजनेची माहिती मिळाली. मी अर्ज केला आणि माझी निवड झाली. आज या व्यवसायातून मला समाधान मिळत आहे.'

महिला रिक्षा चालक असल्यामुळे प्रवाशांनाही सुरक्षिततेची भावना मिळते. **विद्यार्थीनी तृप्ती वाघमारे** सांगतात, 'महिला रिक्षा चालक आम्हाला मैत्रिणीसारखी वाटते. त्यांच्या रिक्षात बसल्यानंतर सुरक्षित वाटते आणि भीती वाटत नाही.'

## तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जातीच्या युवक-युवतींसाठी 'तांत्रिक अनिवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमा'चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत नुकतीच एकदिवसीय कार्यशाळा व मुलाखतींची प्रक्रिया गाडगे नगर येथील 'टांग प्लाझा' स्थित MCED कार्यालयात उत्साहात पार पडली.



या प्रशिक्षण कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे युवकांना आधुनिक काळातील मागणी असलेल्या तांत्रिक विषयांचे निशुल्क प्रशिक्षण दिले जाणार आहे.डिजिटल मार्केटिंगड्रोन ऑपरेशन अँड मेंटेनन्स, इंडस्ट्रीयल ऑटोमेशन विथ आय ओ टी, क्लाउड कॉम्प्युटिंग सर्व्हिसेस अँड सिस्टम डमिनिस्ट्रेशन इ या कार्यशाळेला BARTI च्या प्रकल्प अधिकारी अनिता गवइ, पंकज सोनवणे DICCKI,राजेश सोने वनेत्रदीप चौधरी जिल्हा प्रकल्प समन्वयक महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र अमरावती आणि सर्व कार्यक्रम आयोजक प्रामुख्याने उपस्थित होतउपस्थित मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना तांत्रिक कौशल्यांचे महत्त्व आणि त्यातून निर्माण होणाऱ्या स्वयंरोजगाराच्या संधींविषयी माहिती दिली.यावेळी मोठ्या संख्येने प्रशिक्षणार्थी युवक-युवती उपस्थित होते. या प्रशिक्षणामुळे जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार असून, त्यांच्या आर्थिक उन्नतीला चालना मिळेल असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## या.द.व. देशमुख महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरव दिन

**तिवसा-** स्थानिक या.द.व. देशमुख कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये मराठी विभागाच्या वतीने मराठीतील ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त,प्रसिद्ध नामवंत साहित्यिक स्व.विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीदिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख व माजी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. चरणदास सोळंके यांनी मराठी भाषेचे म्हणजे मातृभाषेचे महत्त्व उपस्थित विद्यार्थ्यांना पटवून दिले. वि.वा.शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट'या नाटकातील आई-वडील मुलांसाठी सर्वतोपरी कष्ट करून उच्च शिखरावर नेण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करतात.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख व आजचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. कुसुमेंद्र सोनटक्के यांनी भूषविले होते.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे आय.क्यू. ये.सी. समन्वयक प्रा.डॉ. शाम गेडाम,वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश खेकाडे, कार्यालय अधीक्षक महेश अवघड साहेब, संगीत विभाग प्रमुख प्रा.विनोद खडसे,तसेच वाणिज्य विभागातील प्रा.साकेत देशमुख, इंग्रजी विभागाचे प्रा.शंतनू पानबुडे त्याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्येच संगीत विभाग प्रमुख प्रा.विनोद खडसे, कार्यालय अधीक्षक महेश अवघड कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ. कुसुमेंद्र सोनटक्के यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेचा गौरव करणारे कर्णमधुर गीत सादर केलेत. आणि मराठी मातृभाषेबद्दलचा अभिमान निर्माण केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख प्रा. चरणदास सोळंके यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल मा.रवींद्र पाटील यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता ग्रंथपाल रवींद्र पाटील प्रा. शंतनु पाणबुडे, प्रा.साकेत देशमुख ,सचिन काळे, शिक्षकेतर कर्मचारी व इतर विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत

## जर्मन व जपानी भाषा प्रशिक्षण देण्याबाबत सामंजस्य करार

**अमरावती/का.प्र.**

अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील कौशल्ये प्राप्त व्हावीत तसेच परदेशातील रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने मुंबई विद्यापीठ आणि महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,मुंबई यांच्यात उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थित सामंजस्य करार डॉ.होमी भाभा राज्य विद्यापीठ,मुंबई येथे करण्यात आला आहे.



उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणूगोपोल रेड्डी, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, प्रताप लुबाळ, सहसचिव संतोष खोरगडे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. अजय भामरे, तसेच सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू व संबंधित अधिकारी उपस्थित होते.मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, या सामंजस्य करारानुसार अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या मंडळाशी संलग्न तसेच स्वायत्त संस्थांमधील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागामार्फत जर्मन व जपानी भाषांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना आवश्यक क्रेडिट्स प्रदान करण्यात येतील. तसेच आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहाय्य दिले जाणार आहे.

हे प्रशिक्षण ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांतून देण्यात येणार असून भाषेची परीक्षा व क्रेडिट्स प्रदान करण्याची प्रक्रिया मुंबई विद्यापीठामार्फत पार पाडली जाईल.

या उपक्रमासाठी तंत्र शिक्षण मंडळ पदविका संस्थांशी समन्वय साधून इच्छुक विद्यार्थ्यांची नोंदणी करणार आहे. या प्रशिक्षणामुळे पदविका विद्यार्थ्यांसाठी परदेशातील रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास तसेच त्यांच्या कौशल्यवृद्धीस चालना मिळण्यास मदत होणार आहे,असे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

## प्रवाशांना सवलतीच्या लाभासाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य

**लेहेगाव/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एस. टी. प्रवासात विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक, महिला, दिव्यांग, पुरस्कारार्थी तथा अधिस्विकृती धारक पत्रकारांना सवलती दिल्या जातात. या करीता आधार कार्ड तथा संबंधिक प्राधिकरणाकडून प्राप्त ओळख पत्र आवश्यक होते. मात्र आता ह्या सवलती घेण्या करीता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड एनसीएमसी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे.

या कार्ड करीता नोंदणीस एसटी च्या मोर्शी आगारात सुरु झाली आहे. नॅशनल कॉमन मोबालिटी कार्ड एनसीएमसी स्मॉर्ट कार्ड नोंदणी मोफत नसुन नविन कार्ड नोंदणी शुल्क म्हणून १६८ अधिक १८ टक्के जि एस टी आकारणी शुल्क ३१ रुपये असे एकुण १९९ रुपये द्यावे लागणार आहे. त्यामुळे वृद्ध, निराधार, दिव्यांगाच्या खिशाला कात्री लागणार आहे. नोंदणी ऑनलाईन पद्धतीने असल्याने नेटवर्क जाण्याचा तसेच एंजटला आपल्या खात्यात रक्कम जमा करावी लागणार आहे ही रक्कम संपल्यास याचा मनस्ताप लाभार्थ्यांना सहन करावा लागणार आहे. मोर्शी आगार मध्ये नॅशनल कॉमन मोबालिटी कार्ड एनसीएमसी स्मॉर्ट कार्ड नोंदणी करीता सोय करण्यात आली आहे.या नोंदणी बाबत आखरी तारीख आली नसून नोंदणी सुरूच राहणार आहे प्रवाशांनी आपल्या सवलती सुरू राहण्या करीता करीता स्मॉर्ट कार्ड शुल्क भरून नोंदणी करावी. आगार व्यवस्थापक मोर्शी यांनी नागरिकांना आव्हान केले आहे.

## आरडीआयके.महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीद्वारे संचालित आर.डी. आय.के. अँड एन.के. डी. महाविद्यालय, बडनेरा येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अंतर्गत पदवी वितरण समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या समारंभात विविध शाखांतील विद्यार्थ्यांना त्यांच्या परिश्रमाचे फळ म्हणून पदव्या प्रदान करण्यात आल्या. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.डी.देशमुख होते. प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विघे आणि विद्यापीठ विद्वत परिषद सदस्य डॉ. संजीव जगताप उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन व विद्यापीठ गीताने झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील एकूण २८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. तसेच पदव्युत्तर स्तरावरील दोन विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून पदवी स्वीकारली. विज्ञान शाखेतील २७ विद्यार्थ्यांना पदवी देण्यात आली, तर कला शाखेतील २५ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. एकूण मिळून ८२ विद्यार्थ्यांनी या समारंभात पदवी स्वीकारत आपल्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला. पदव्युत्तर स्तरावरील दोन विद्यार्थ्यांनी संशोधनाभिमुख अभ्यासक्रम पूर्ण करत उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली. त्यांच्या संशोधन प्रकल्पांना परीक्षकांकडून विशेष प्रशंसा मिळाली. विज्ञान शाखेतील २७ विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, संगणक विज्ञान आदी विषयांत प्राविण्य मिळवले. कला शाखेतील २५ विद्यार्थ्यांनी इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मराठी, इंग्रजी आदी विषयांत उत्तीर्ण होत सामाजिक भान आणि वैचारिक परिपक्वता दाखवली. डॉ.आर.डी.देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, 'पदवी ही केवळ प्रमाणपत्र नसून जबाबदारीची जाणीव आहे. प्रमुख अतिथी डॉ. प्रशांत विघे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. स्पर्धेच्या युगात केवळ पदवी पुरेशी नसून सतत नवीन ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. डॉ.संजीव जगताप यांनी आपल्या भाषणात कौशल्याधारित शिक्षणाची गरज अधोरेखित केली.

'आजच्या काळात तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन कौशल्य यांचा संगम महत्त्वाचा आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.वैशाली भाकरे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन डॉ.शितल राठोड यांनी केले त्यांनी सर्व मान्यवर, शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. समारंभाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी उज्ज्वल भवितव्याच्या शुभेच्छा देत नव्या प्रवासाला सुरुवात केली.पदवी वितरण समारंभाच्या यशस्वीतेसाठी या समारंभाचे समन्वयक वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे प्रमुख डॉ. नकुल देशमुख आणि त्यांच्या समितीने अथक परिश्रम घेतले या कार्यक्रमाला उपस्थित डॉ. प्रवीण मूरादे, डॉ. एम.बी.गाथे, प्रा.सुदेश चौधरी, डॉ. अतुल पाटील, डॉ.पंकज दिंडोकार, डॉ. वैशाली भाकरे, डॉ.पूजा देशमुख, डॉ. भावना खोब्रागडे, डॉ. शितल राठोड, डॉ. एस. डी. ठाकूर, डॉ. बी.एन. दयावते, डॉ. लता हिवसे, डॉ. सीमा मेश्राम, प्रा. संचिता पिंपळे, सागर आगरकर आदी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले व कार्यक्रम अतिशय उत्स्फूर्तपणे आणि उत्साह पूर्ण वातावरणात पार पडला.

# चिखलदरा महोत्सवात व्यापकता निर्माण करा -पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## सायन्स कोर मैदान येथे विभागीय मिनी सरस वैदर्भीय महोत्सव जिल्हा प्रदर्शन व विक्री - २०२६



**अमरावती/प्रतिनिधीः-** विभागीय मिनी सरस वैदर्भीय महोत्सवाप्रमाणे चिखलदरा महोत्सवात व्यापकता निर्माण करण्यासाठी महिला बचतगट प्रदर्शन, विक्री केंद्र स्थापन करावे. महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या वैदर्भी महोत्सवाचे यश हाच खरा महिला दिन आहे. या स्तुत्य उपक्रम नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केले. जिल्हा प्रशासन आणि 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने सायन्स स्कोर मैदान येथे ८ मार्चपर्यंत 'महिला दिन महोत्सव' आणि 'विभागीय मिनी सरस व वैदर्भी महोत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे पालकमंत्री बावनकुळे यांनी उद्घाटन केले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, रवी राणा, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, गजानन लवटे, महापौर श्रीचंद तेजवानी, विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, माविम संचालक रंजन वानखडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे म्हणाले की, महिला☞(पान २ वर)

# बच्चू कडूंची 'कर्जमाफी आठवण व मेळघाट संघर्ष यात्रा' निर्णायक वळणावर

## ९ तारखेला सलोना ते चिखलदरा महापदयात्रा

### तहसीलवर तांडव आंदोलनाचा इशारा



**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटातील आदिवासी बांधवांच्या विविध प्रश्नांवर सुरू असलेली बच्चू कडू यांची 'कर्जमाफी आठवण व मेळघाट संघर्ष यात्रा' आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. येत्या ९ मार्च रोजी सलोना ते चिखलदरा दरम्यान महापदयात्रा काढण्यात येणार असून त्यानंतर चिखलदरा तहसील कार्यालयावर मोठे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मेळघाटातील आदिवासी नागरिकांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्या, शेतकऱ्यांची कर्जमाफी, वनहक्क, पाणीटंचाई, आरोग्य सुविधा, रस्ते व रोजगाराच्या मुद्द्यांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी ही यात्रा काढण्यात येत आहे. यात्रेच्या माध्यमातून कडू हे गावोगावी जाऊन स्थानिकांच्या समस्या ऐकत असून त्या शासनापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहेत.

या यात्रेदरम्यान अनेक ठिकाणी ग्रामस्थांनी पाणीटंचाई, वनजमिनीवरील हक्क, रेशन, आरोग्य सुविधा आणि रोजगार हमी योजनांबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर ९ मार्चपूर्वी ठोस निर्णय न झाल्यास चिखलदरा तहसीलवर मोठे तांडव आंदोलन छेडण्याचा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

या आंदोलनात मेळघाटातील विविध गावांतील आदिवासी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे प्रशासनासाठीही ही परिस्थिती संवेदनशील मानली जात आहे.

**प्रशासन अलर्ट मोडवर-**

या आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता प्रशासनानेही हालचाली सुरू केल्या आहेत. आज काटकुंभ येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली असून मेळघाटातील प्रश्नांवर चर्चा होणार आहे. या बैठकीत विविध विभागांचे अधिकारी, महसूल, वन व पोलीस प्रशासनाचे प्रतिनिधी उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

आंदोलनापूर्वी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि काही मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत असल्याची माहिती मिळत आहे.

**■मेळघाटातील प्रश्न पुन्हा ऐरणीवर**

दरम्यान, या यात्रेमुळे मेळघाट परिसरातील आदिवासी भागातील विकासाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आरोग्य, शिक्षण, पाणी, रस्ते आणि वनहक्क यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर अद्यापही समाधानकारक तोडगा न निघाल्याची खंत स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.

यामुळे ९ मार्च रोजी होणारी सलोना ते चिखलदरा महापदयात्रा आणि त्यानंतरचे आंदोलन प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ७ हजारांची लाच घेताना तलाठी एसीबीच्या जाळ्यात

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** अँटी करप्शन ब्युरो अमरावती ने आज दि. ७ मार्च रोजी सापळा रचून ७ हजार रुपयांची लाच स्वीकारताना तलाठी याला रंगेहात पकडले. या कारवाईमुळे महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमेश्वर उर्फ राजेश्वर मलमकर (वय ४९) हे तलाठी म्हणून कळमगाव सज्जा, ता. चांदुर रेल्वे येथे कार्यरत आहेत.



तक्रारदार यांच्या शेतातील संत्रा, सोयाबीन, तूर व हरभरा पिकांचे अतिवृष्टीमुळे नुकसान झाले होते. या नुकसानीचा पंचनामा करून पीक विम्याच्या अनुषंगाने ९७ हजार ५०० रुपये तक्रारदारांच्या वडिलांच्या बँक खात्यात जमा झाले होते. मात्र केलेल्या पंचनाम्याच्या कामाचा 'बक्षीस' म्हणून १० हजार रुपयांची लाच तलाठी मलमकर यांनी मागितल्याची तक्रार, तक्रारदारांनी दि. ६ मार्च २०२६ रोजी एसीबीकडे केली होती.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर आज दि. ७ मार्च रोजी विरुळ स्टॉप, चांदुर रेल्वे येथे सापळा रचण्यात आला. यावेळी तलाठी मलमकर यांनी ७ हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचे☞(पान २ वर)

# घरासमोरून दुचाकी लंपास; दोन सराईत जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरासमोर उभी असलेली दुचाकी चोरून नेणाऱ्या दोन सराईत वाहनचोरांना फ्रेजरपुरा पोलिसांनी अटक करून चोरीच्या दोन दुचाकी जप्त केल्या. या कारवाईत सुमारे ७० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

किरण नगर येथील रहिवासी आकाश प्रकाशराव घोडमारे (वय ३४) हे कलर पेंटिंगचे मजुरीचे काम करतात. त्यांनी २८ फेब्रुवारी रोजी आपली दुचाकी घरासमोर उभी करून कामासाठी नवसारी येथे प्रस्थान केले होते. सायंकाळी सुमारे सहा वाजता परतल्यावर दुचाकी जागेवर नसल्याचे लक्षात आले. परिसरात शोध घेतला असता वाहन मिळून न आल्याने त्यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळ परिसरासह शहरातील विविध भागांतील सीसीटीव्ही फुटेजची☞(पान २ वर)

# ५२ वर्षीय महिलेची गळफास घेऊन आत्महत्या

## शिवाजी नगरातील धक्कादायक घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील समता कॉलनी परिसरात एका ५२ वर्षीय महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (६ मार्च) सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात मर्ग नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संगीता अनिल शेंडे (वय ५२, मूळ रा. वलगाव, सध्या रा. समता कॉलनी, अमरावती) असे मृत महिलेचे नाव आहे. फिर्यादी शिवराज राजीव शेंडे (रा. रुलर कॉटन, शिवाजी नगर परिसर) यांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली. मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास संगिता शेंडे यांनी राहत्या घरी गळफास घेतला, त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. ही घटना लक्षात येताच कुटुंबीयांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेची नोंद गाडगेनगर पोलिस ठाण्यात ☞(पान २ वर)

# खंडेलवाल ज्वेलर्सचे अमरावतीत भव्य प्रदर्शन सुरू

## हॉटेल ग्रँड मेहफिलमध्ये गर्दी



अमरावती/प्रतिनिधीः-

अकोला येथील प्रसिद्ध खंडेलवाल ज्वेलर्सचे तीन दिवसांचे भव्य दागिने प्रदर्शन आणि विक्री कॅम्प परिसरातील हॉटेल ग्रँड मेहफिल येथे मोठ्या उत्साहात सुरू झाले. उद्घाटनाच्या दिवशी दागिने प्रेमींची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

या प्रदर्शनाचे उद्घाटन अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, दैनिक अमरावती मंडलचे संपादक अनिल अग्रवाल, खंडेलवाल ज्वेलर्सचे संचालक नितीनभाई खंडेलवाल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातुरकर, स्वीकृत नगरसेवक दिनेश बूब, संपादक विलास मराठे तसेच खंडेलवाल कुटुंबीय आणि इतर मान्यवर उपस्थित होते. अकोल्यातील खंडेलवाल ज्वेलर्स ही १०० वर्षांची परंपरा आणि सहा पिढ्यांचा विश्वास जपणारी संस्था असल्याचे नितीनभाई खंडेलवाल यांनी सांगितले. अमरावतीतील नागरिकांसाठी खास दागिन्यांचे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले असून उद्घाटनाच्या दिवशी अनेकांनी दागिने पसंत करून खरेदी केली. खरेदी करणाऱ्या ग्राहकांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. या प्रदर्शनात गुलाबी व पांढऱ्या सोन्याचे दागिने,☞(पान २ वर)

# विहिरीत वृध्द व्यक्तीचा आढळला मृतदेह



**अमरावती/प्रतिनिधीः-** फुल आमला येथील एका वृद्ध व्यक्तीचा मृतदेह शेतातील विहिरीत आढळून आला आहे. मृत व्यक्तीचे नाव लक्ष्मण सोमाजी नाईक (वय ८०, रा. फुल आमला, लोणीटाकळी) असून, त्यांचा मृतदेह सुभाषराव भुयार यांच्या शेतातील विहिरीत ५ मार्च रोजी आढळला. ही माहिती मिळताच स्थानिक पोलिस तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि मृतदेह बाहेर काढून त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले. रात्री सुमारे ११.१५ वाजता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सध्या मृत्यूमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्राथमिक तपासात कोणतेही जखम किंवा बाह्य हाताळणीचे पुरावे आढळलेले नाहीत, परंतु पोलिस घटना हळूहळू तपासत आहेत. लक्ष्मण नाईक यांनी आत्महत्या ☞(पान २ वर)

# कु-हा हद्दीत गोवंश वाहतूकीचा पर्दाफाश, ६ गोवंश जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैधरित्या गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यासाठी वाहतूक करणाऱ्या टोळीवर अमरावती ग्रामीण पोलीस शाखेने धडक कारवाई केली आहे.

५ मार्च २०२६ रोजी पो.उप.नि. विशाल रोकडे यांचे नेतृत्व असलेल्या पोलीस पथकाने कु-हा हद्दीत पेट्रोलिंग करत असताना गोपनिय माहितीदाराकडून माहिती मिळाली की, कु-हा कडून अमरावतीकडे टाटा ए.सी. वाहनामध्ये गोवंशीय जनावरे पाय व तोंड बांधून क्रुरतेने वागवून कत्तलासाठी वाहतूक केली जात आहेत. पोलीसांनी भिवापूर ते मार्डी रोडवरील विरगव्हाण फाटा येथे नाकाबंदी करून वाहन थांबविले. वाहन चालक प्रविण अर्जुन डोळस (वय ३८, रा. दिवाणखेड) असल्याचे समोर आले. तपासात वाहनामध्ये ६ गोवंशीय जनावरे आणि वाहतुकीसाठी वापरलेले टाटा ए.सी. वाहन जप्त करण्यात आले. जप्त मालाची किंमत एकूण १,९६,००० रुपये आहे. सदर आरोपी, वाहन आणि गोवंशीय जनावरे पो.स्टे. कु-हा यांच्या ताब्यात देण्यात आले असून, पुढील कायदेशीर ☞(पान २ वर)

# मतिमंद सुनेवर सासरा-दिराचा लैंगिक अत्याचार

## -सासरा अटकेत, दिर फरार



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** मतिमंद सुनेवर मागील दोन महिन्यांपासून सासरा आणि दिराने सातत्याने लैंगिक अत्याचार केल्याची नात्याला काळीमा फासणारी घटना चांदूर रेल्वे पोलीस स्टेशन हद्दीत ६ मार्च रोजी उघडकीस आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित महिलेचे लग्न तीन वर्षांपूर्वी पारंपरिक पद्धतीने झाले होते. तिचा पतीही मतिमंद असल्याने घरातील परिस्थितीचा संपूर्ण गैरफायदा आरोपी सासरा आणि दिर यांनी घेतला. त्यांनी पीडितेवर जबरदस्तीने कपडे काढून शरीरसंबंध ठेवत अत्याचार केला. पीडितेने अखेर आपल्या आईसमोर आपली व्यथा मांडली, ज्यामुळे पोलिसांची कारवाई सुरू झाली. या अमानुष प्रकरणी सासरा रंगेहात अटकेत आहे, तर आरोपी दिर अजूनही फरार आहे. पोलीस पथके त्याचा शोध घेत आहेत.नागरिक तातडीने कठोर कारवाईची मागणी करत आहेत. पोलिसांनी पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ६४(२)(क) व ६४(२)(म) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. घरातील नात्यांनीच केलेल्या या विश्वासघातामुळे परिसरात संताप आणि रोष व्यक्त होत आहे. आरोपीला लवकरात लवकर अटक करून शिक्षा द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कच्चे तेलाचा टँकर देण्याच्या नावावर ८ लाखांची फसवणूक

## चौघांविरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** कच्च्या तेलाचा टँकर उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवत एका व्यापाऱ्याची तब्बल ८ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार अमरावती शहरात ५ मार्च रोजी उघडकीस आला आहे. या प्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनेश तिलकराज सिंह (वय ५६, रा. रुक्मिणी नगर, अमरावती) यांचा एमआयडीसी परिसरात कपडे धुण्याचा साबण तयार करण्याचा कारखाना आहे. साबण निर्मितीसाठी लागणारे कच्चे तेल खरेदी करण्याच्या निमित्ताने त्यांची आरोपींशी ओळख झाली होती. दरम्यान, आरोपींनी फिर्यादींना फोन करून हिंगणघाट येथील सुदर्शन कॉटन इंडस्ट्रीजमध्ये कच्च्या तेलाचा टँकर उपलब्ध असल्याचे सांगितले. तसेच संपूर्ण☞(पान २ वर)

# छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरात ६९५ ग्रामस्थांना लाभ



**अचलपूर/प्रतिनिधीः-** तहसिल कार्यालय अचलपूर विद्यमानाने दर्शन सभागृह परसापूर (परसापूर मंडळ) येथे ७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर कार्यक्रम पहिला टप्पा संपन्न झाला.यावेळी ग्रामस्थांची मोठी गर्दी होती. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन शहारे,अक्षय शिरसागर तालुका कृषी अधिकारी ,रामदास पाटील, दुय्यम निबंधक अचलपूर ,भाजपा चे समीर हावरे, भिलोना सरपंच संतोष मालवे,टवलार सरपंच संगीताताई कंजाम , परसापूर सरपंच यौगिताताई चांदुरकर , वाल्मीकपूर सरपंच एकनाथ पागृत,उपातखेडा सरपंच अमित सोनारे आदी उपस्थितीत होते.जनतेच्या समस्या थेट लोकप्रतिनिधी आणि प्रशासनापर्यंत पोहोचविण्याची प्रभावी व्यवस्था म्हणून राज्य शासनाचा या वर्षी १७ फेब्रुवारी रोजीच्या निर्णयानुसार छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर कार्यक्रमाची प्रभावी अंमजबजावणी केली जात आहे.त्या☞(पान २ वर)

# पत्नीच्या विरहाने तरुणाची आत्महत्या

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत आष्टी (ता. भातकुली) येथे एका विवाहीत तरुणाच्या आत्महत्येची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ३२ वर्षीय चंदू बबनराव लोखंडे यांनी घरातील सदस्य बाहेर गेलेले पाहून राहत्या घरी गळफास घेऊन आपले जीवन संपवले. ही घटना गुरुवारी, ५ मार्च रोजी दुपारी सुमारे २ वाजता घडली. पत्नीच्या विरहात त्यांनी हे पाऊल उचलल्याची माहिती गावक-यांच्या चर्चेतून बाहेर आली आहे.

माहितीनुसार, चंदू लोखंडे विवाहित होते, मात्र काही काळापूर्वी त्याची पत्नी त्याला सोडून निघून गेली होती. पत्नीच्या विरहामुळे तो मानसिक तणावात असल्याचे गावात बोलले जात होते. गुरुवारी दुपारी त्याची आई काही कामासाठी घराबाहेर गेली होती. घरात कुणीही नसल्यामुळे चंदूने शौचालयात जाऊन गळफास घेतला.

काही वेळाने आई घरी परतल्यावर तिने मुलगा गळफास घेतलेल्या अवस्थेत पाहिला. हा प्रकार पाहून ☞(पान २ वर)

# सराफा व्यापाऱ्याने लंपास केले ग्राहकाचे ३२६ ग्रॅम सोन्याचे दागिने

## -खोलापुरी गेट ठाण्यात गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** सराफा व्यापाऱ्याने ग्राहकांचे ३२६ ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना खोलापुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत समोर आली आहे. या प्रकरणात संतोष शितलप्रसाद मिश्रा (दस्तूर नगर ) यांच्या तक्रारी वरून पोलिसांनी सराफा व्यापारी मुकेश ठोसर सह एका महिले विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. माहितीनुसार संतोष मिश्रा गेल्या काही वर्षापासून सराफा व्यापारी मुकेश ठोसर यांच्या दुकानातून सोने आणि चांदीचे दागिने खरेदी करत होते. नेहमी दागिने खरेदी केल्यामुळे त्यांच्यात चांगली ओळख झाली. घरगुती संबंध त्यांच्यामध्ये निर्माण झाले होते. दोघांचा एकमेकांवर विश्वास होता. काही दिवसांपूर्वी संतोष मिश्रा यांना आपले सोने-चांदीचे दागिने बँक लॉकर मध्ये ठेवायचे होते. हे त्यांनी मुकेश ठोसर यांना सांगितले. यानंतर मुकेश ठोसर यांनी मित्राला सांगितले की त्यांना पत्नीसोबत मिळून एक लेआउट टाकायचा आहे. यासाठी त्यांना पैशाची गरज आहे. यामुळे संतोष मिश्रा यांनी आपल्या जवळील दागिने मुकेश ठोसर यांना दिले आणि म्हटले की दागिनेच्या ऐवजी ठोसर दर महिन्याला त्यांना २० हजार रुपये व्याज स्वरूपात देणार होते. निश्चित झाल्यानुसार मिश्रा यांनी आपले ३२६ ग्रॅम सोन्याचे दागिने मुकेश ठोसर यांना दिले.☞(पान २ वर)

# सारांश

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

रविवार, ८ मार्च २०२६ E-paper - www.janmadhyam.com





# बेलगाम युद्ध

***आखातातल्या जवळपास आठ देशांवर इराणने क्षेपणास्त्राद्वारे मारा केला. इस्रायलवरही नव्याने हल्ला करताना थेट नेतान्याहू यांच्या कार्यालयालाही इराणने लक्ष केल्याचे वृत्त आहे. अमेरिकेची काही लढाऊ विमानेही इराणने पाडली, तसेच युरोपीय देशांच्याही काही लष्करी ठिकाणांवर इराणने हल्ले केल्याने या युद्धाची व्याप्ती आज अचानक वाढल्याचे लक्षात येते. ही परिस्थिती लक्षात घेऊन आखातात ब्रिटनचे जे काही लष्करी तळ आहेत त्या तळांचा वापर करण्याची अनुमती अमेरिकेने ब्रिटनकडे मागितली आणि ब्रिटननेही अमेरिकेला तातडीने ती अनुमती दिली आहे.***



इराणवर अमेरिका आणि इस्त्रायल या दोन देशांनी संयुक्तपणे हल्ला करून जे युद्ध छेडले आहे ते युद्ध खामेनी यांच्या हत्येनंतर आटोक्यात येईल असे वाटले होते, पण त्याची व्याप्ती आता आणखीनच वाढली असून हा संघर्ष बेलगाम पातळीवर गेला आहे. इराणवर अमेरिका आणि इस्त्रायल या दोन देशांनी संयुक्तपणे हल्ला करून जे युद्ध छेडले आहे ते युद्ध खामेनी यांच्या हत्येनंतर आटोक्यात येईल असे वाटले होते, पण त्याची व्याप्ती आता आणखीनच वाढली असून हा संघर्ष बेलगाम पातळीवर गेला आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्यात इराणचे राष्ट्रप्रमुख खामेनी यांच्याबरोबरच त्या देशाची जवळपास सगळी महत्त्वाची लीडरशिप गारद झाली. अनेक महत्त्वाचे लष्करी अधिकारीही मारले गेले. हा तडाखा अतिप्रचंड स्वरूपाचा होता, त्यातून इराण सावरण्याची शक्यता नाही, असे वाटत असतानाच इराणने आपली उरलीसुरली शक्ती वापरात आणून अंदाधुंद प्रतिसाद द्यायला सुरुवात केली आहे.

आखातातल्या जवळपास आठ देशांवर इराणने क्षेपणास्त्राद्वारे मारा केला. इस्त्रायलवरही नव्याने हल्ला करताना थेट नेतान्याहू यांच्या कार्यालयालाही इराणने लक्ष केल्याचे वृत्त आहे.

अमेरिकेची काही लढाऊ विमानेही इराणने पाडली, तसेच युरोपीय देशांच्याही काही लष्करी ठिकाणांवर इराणने हल्ले केल्याने या युद्धाची व्याप्ती आज अचानक वाढल्याचे लक्षात येते. ही परिस्थिती लक्षात घेऊन आखातात ब्रिटनचे जे काही लष्करी तळ आहेत त्या तळांचा वापर करण्याची अनुमती अमेरिकेने ब्रिटनकडे मागितली आणि ब्रिटननेही अमेरिकेला तातडीने ती अनुमती दिली आहे.

ब्रिटन बरोबरच फ्रान्स, जर्मनी आणि अन्य काही युरोपीय देशांनी अमेरिकेचे समर्थन करून त्यांना साथ देण्याची भूमिका घेतली आहे, त्यामुळे हा मामला आता आणखीन गंभीर बनला असून आता एकाकी पडलेल्या इराणच्या बाजूनेही रशिया आणि चीन सारखे देश उतरतील काय अशी नवी शंका निर्माण झाली आहे. हे सगळे होत असतानाच हेजबुल्ला संघटनेनेही इराणच्या समर्थनार्थ इस्त्रायलवर हल्ले सुरू केले, त्यांना काबुत आणण्यासाठी इस्त्रायलने लेबनॉनवर हल्ले केले, तेथे मोठी जीवितहानी झाली. या सगळ्या घडामोडी उर्वरित जगाची झोप उडवणाऱ्या आहेत. इराणकडून जसे प्रत्युत्तराचे हल्ले सुरू झाले तसा अमेरिका आणि इस्त्रायलचा इराणवर नव्याने मारा सुरू झाला आहे. इराणवर अंदाधुंद बॉम्बफेक सुरू असून त्या देशात मृत नागरिकांचे अक्षरशः ढीग रचले गेल्याचे एका वृत्तांत म्हटले आहे.

इराणमधील मृतांच्या नेमक्या संख्येचा अंदाज अजून लागू शकलेला नसला तरीही एका आंतरराष्ट्रीय संस्थेने इराणमध्ये सुरुवातीच्या दोन दिवसातच किमान ५५५ नागरिक ठार झाल्याची प्राथमिक माहिती दिली. पहिल्याच हल्ल्यात खामेनी आणि इराणच्या महत्त्वाच्या नेत्यांचा खात्मा केल्यानंतर हे युद्ध आटोक्यात येईल किंबहुना इराण भयभीत होऊन, दिशाहीन होईल असे जे वाटले होते तसे अजिबात झालेले दिसत नाही.

इराणकडे अमेरिका आणि इस्त्रायलच्या तुलनेमध्ये अत्यंत मर्यादित लष्करी शक्ती आहे. त्यातच अमेरिका आणि इस्त्रायलने इराणच्या हवाईदलाचे कंबरडे साफ मोडले आहे, इराणच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपण ठिकाणांवरही व्यापक स्वरूपात हल्ले करून ही ठिकाणे उद्ध्वस्त करण्यात आली आहेत. परंतु तरीही ज्या क्षमतेने इराणकडून प्रत्युत्तर दिले जात आहे ते अचंबित करणारे आहे.

एका वृत्तानुसार इराणच्या आण्विक तळावरही हल्ला झाला आहे त्यातून ॲटोमिक रेडिएशन सुरू झाले किंवा कसे या वृत्ताची शहानिशा केली जात आहे. हे सगळे विनाशकारी रिपोर्टिंग ऐकल्यानंतर या युद्धाचा शेवट नेमका काय होईल याचा अंदाज लावणे अवघड झाले आहे.

अशा संघर्षाच्या परिस्थितीत संयुक्त राष्ट्र संघाची यंत्रणा कुठे तोंड लपवून बसलेली असते हे कळत नाही. जगातला कुठलाही संघर्ष थांबवण्याची क्षमता संयुक्त राष्ट्राकडे नाही हेच यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. युद्धखोर इस्त्रायल आणि अमेरिका आणि त्यांना पाठिंबा देणारे युरोपियन देश जगात हवे तिथे दादागिरी करू शकतात. कुठल्याही राष्ट्रप्रमुखाला ते ठार मारू शकतात किंवा त्याला उचलून आणू शकतात हे जे चित्र पाहायला मिळते आहे ते निराशाजनक आहे. या देशांच्या दादागिरीला आवर घालण्याची क्षमता ज्या देशांमध्ये आहे ते देशही आजच्या या संघर्षाचे मूकनिदर्शक बनून राहिले आहेत हे पाहणे आणखीनच क्लेशदायक ठरले आहे.

अर्थात, इराणच्या बाजूने रशिया आणि चीन यांनी सक्रियपणे या संघर्षात उतरणे म्हणजे तिसऱ्या महायुद्धाला आमंत्रण देणे ठरणार आहे, त्यामुळे या दोन प्रमुख शक्तिशाली देशांनी इराणच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानावर उतरावे अशी जगाची अपेक्षा नसली तरी इस्त्रायल आणि अमेरिकेच्या दादागिरीला आळा घालण्याची शिष्टाई तरी त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर करायला हवी होती.

पण अद्याप चीन किंवा रशिया यापैकी एकाही देशाने इराणवर जो महाभयंकर प्रपात ओढवला आहे त्याविषयी आपली स्पष्ट प्रतिक्रियाही अद्याप दिलेली नाही. या पार्श्वभूमीवर सर्व युद्धखोर देशांच्या प्रमुखांना सद्बुद्धी सुचो आणि हा संहार त्वरित बंद होवो अशी प्रार्थना करण्यापलीकडे बाकी जगाच्या हातात काही राहिलेले दिसत नाही.

# शिक्षण हक्क कायदा नवीन अडथळे

शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाच्या नियमावलीनुसार विद्यार्थांच्या घराजवळचे १ किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येईल, ही नवी तरतूद शिक्षण हक्क कायद्याच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासणारी आहे. शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाच्या नियमावलीनुसार विद्यार्थांच्या घराजवळचे १ किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येईल, ही नवी तरतूद शिक्षण हक्क कायद्याच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासणारी आहे. ही तरतूद म्हणजे शिक्षण हक्क कायदा रद्द करण्याचे धोरण आहे. त्याचप्रमाणे श्रीमंत शाळांच्या दबावाला राज्य शासन बळी पडले आहे, असे वाटते. आपल्या राज्यघटनेतील बंधुत्वाचे उद्दिष्ट तेव्हाच साध्य होऊ शकते जेव्हा एखादा गरीब विद्यार्थी करोडपती किंवा मुख्यमंत्र्याच्या विद्यार्थ्याच्या शेजारी बसून शिक्षण घेतो. जेव्हा दोघे शाळेत/महाविद्यालयात एकत्र खेळतात तेव्हा हे साध्य होऊ शकते. शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाची तरतूद सामाजिक विषमता संपवण्यासाठी आणि सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी एक ध्येय म्हणून राबवली पाहिजे, असे प्रतिपादन उपरोक्त शब्दांत नुकतेच सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींनी व्यक्त केले. त्यानंतर महाराष्ट्रात शिक्षण हक्क कायद्यातील २५ टक्के आरक्षणाच्या धोरणाबाबत नवी नियमावली नुकतीच जाहीर करण्यात आली, हा एक दुर्दैवी योगायोग आहे. राज्यातील ८६५० स्वयंअर्थसहाय्यित व विनाअनुदानित खासगी शाळांमध्ये एकूण १ लाख १२ हजार ७०६ जागांसाठी ही नियमावली वादात सापडली आहे. या तरतुदीप्रमाणे फक्त १ किलोमीटर अंतरातील शाळाच विद्यार्थ्यांना निवडता येणार आहे. अशा प्रकारचे १ किलोमीटरचे बंधन टाकणे ही तरतूद मूळ कायद्यांशी, तत्त्वाशी विसंगत आहे. शिक्षण हक्क कायद्यात ही तरतूद येण्याची काही कारणे आहेत. काही देशांत एज्युकेशन व्हाउचर विद्यार्थ्यांना दिले जाते ( तीलहशी डूींशा), सरकार एका विद्यार्थ्यांवर जितकी रक्कम खर्च करते, ती रक्कम शाळांना देण्यापेक्षा पालकांच्या हातात कूपन स्वरूपात द्यायची व पालकांनी त्यांना पाहिजे त्या शाळेमध्ये प्रवेश घ्यावा, अशी कल्पना राबवली गेली. ती प्रायोगिक तत्त्वावर भारतात कशी राबवावी, याबाबत अनेकदा चर्चा झाल्या. दिल्लीत सेंटर फॉर सिव्हिल सोसायटी ही संस्था या कल्पनेच्या प्रसारासाठी अनेक वर्षे काम करते. त्यांनी दिल्लीतील काही शाळांमध्ये अशा प्रकारचे कूपन वाटपही केले होते. अकराव्या पंचवार्षिक योजनेत केंद्र शासनाने याविषयी प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी करण्याची सूचनाही केलेली होती.जर श्रीमंतांना हवी ती शाळा निवडता येते तर गरीब, वंचितांनाही ती संधी असली पाहिजे, हे या कायद्यातील मुख्य तत्त्व आहे. गरीब विद्यार्थ्यांना सरकारी शाळांमध्येच शिक्षण घेण्याची सक्ती नको. कोणतीही चांगली शाळा तळागाळातील पालकांना निवडता आली पाहिजे, हे या कायद्यातील प्रमुख तत्त्व या योजनेत डावलले जाणार आहे. दुसरी भूमिका अशी होती, की आज श्रीमंतांच्या शाळा आणि गरिबांच्या शाळा अशी विभागणी शालेय शिक्षणात निर्माण झाली आहे. कोठारी आयोगाने गरीब व श्रीमंत विद्यार्थ्यांनी एकाच शाळेत शिकावे, अशी भूमिका मांडली.




कोणत्याही सरकारांना ते करता आले नाही. मोठ्या प्रमाणात खासगी शाळांना परवानगी दिल्याने व आर्थिक स्तराप्रमाणे शाळांचे वर्गीकरण झाल्याने शालेय शिक्षणातच सामाजिक विषमतेची बीज रोवले गेले. श्रीमंतांसाठी खासगी शाळा व गरिबांसाठी सरकारी शाळा असे समीकरण दृढ झाले. तीच विषमता पुढे समाजात प्रतिबिंबित झाली. आता मागे फिरता येत नसल्यामुळे श्रीमंतांच्या खासगी शाळांमध्ये सक्तीने २५ टक्के गरीब, वंचितांची मुले शिकतील. त्यामुळे श्रीमंत व गरीब मुले एकत्र शिकून सामाजिक विषमता काही प्रमाणात कमी होऊ शकेल, असाही दृष्टिकोन या कायद्यामागे आहे. वास्तविक सर्वांनाच घराजवळच्या शाळेत शिकण्याची सक्ती केली असती व शाळांचे स्तरीकरण केले नसते तर विषमता तयार झाली नसती. एक किलोमीटर अंतराचे कारण हे की ज्या प्रसिद्ध खासगी शाळा आहेत, त्या शाळांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी किमान पाच किलोमीटरमधील पालक प्रयत्न करायचे व त्यांच्या घराच्या जवळ शाळा असूनही त्या शाळां मधील प्रवेश मात्र होत नव्हते.


प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे


कारण त्या कनिष्ठ दर्जाच्या आहेत, असे नागरिकांचे/ समाजाचे मत असते. त्यामुळे विशिष्ट शाळांसाठी गर्दी व इतर शाळा रिकाम्या, यामुळे राज्यातील शाळांची प्रवेश संख्या घटत होती, या तरतुदीनुसार जवळच्या शाळेतच प्रवेश घेणे सक्तीचे केल्याने काही अंशी सर्वच खासगी शाळांमध्ये प्रवेश होतील, हे कारण आहे. या बदलाचा सरकारी शाळांना काही प्रमाणात फायदा होईल. एक किलोमीटरमध्ये जर शाळा उपलब्ध नसेल किंवा त्या शाळेतील प्रवेश होऊन गेले असतील तर विद्यार्थ्यांना आजूबाजूच्या सरकारी शाळांमध्ये सक्तीने प्रवेश घ्यावाच लागेल. त्यामुळे काही प्रमाणात सरकारी शाळांची पटसंख्या सावरायला मदत होईल, असे शासकीय धोरण आहे. सरकारचा यामागचा हेतू फी प्रतिपूर्ती रकमेचा बचत करण्याचा आहे. शाळांना सध्या तीन हजार कोटींपेक्षा जास्त रक्कम द्यायची आहे. केंद्र सरकार त्यातील ६० टक्के वाटा देणार असले, तरी राज्याने अगोदर ती दिली तरच केंद्र सरकार आपला वाटा देणार आहे. अशा वेळी एक किलोमीटर मधीलच शाळा निवडण्याचा कायदा राज्यामध्ये आर्थिक बचतीला हितकारक ठरेल, असा शासनाचा व्यावहारिक विचार आहे. या कायद्याप्रमाणे आदिवासी विद्यार्थी खासगी इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश घेतात. त्यांची प्रतिविद्यार्थी ५० हजार रुपये फी आदिवासी विभाग आज भरतो, असे किमान दीड लाख लाभार्थी आहेत. धनगर व इतर वंचित विद्यार्थ्यांसाठीही अशीच योजना सुरू झाली आहे. या सर्व योजनांमध्ये सर्व इंग्रजी शाळा या दर्जेदार, नामवंत असतात, हे समाजाने गृहीत धरलेले आहे.

शिक्षण हक्क कायद्यात आणखीही सुधारणा अपेक्षित आहेत. आठवीनंतर नववी, दहावीच्या फीचे काय करायचे? खासगी शाळा स्नेहसंमेलन, सहल व इतर अनेक खर्चासाठी पालकांना आर्थिक भार देतात, याबाबतही काही नियमावली आवश्यक आहे. गरीब व श्रीमंत विद्यार्थी एकत्र शिकून सामाजिक समरसता निर्माण होईल, हे अनेक शाळांमध्ये खोटे ठरते आहे. काही शाळांमध्ये त्या विद्यार्थ्यांना वेगळे वसवले जाते, अशा विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड वाढतो. त्यांच्यामध्ये नकारात्मक विचारांची वाढ होते.

विधवा व घटस्फोटीत महिलांच्या मुलांना यात संधी आहे, ही समाधानाची गोष्ट असली तरी परित्यक्ता महिलांच्या मुलांनाही यात संधी मिळायला हवी. नवऱ्याने घराबाहेर काढलेल्या महिला किंवा त्रासाला कंटाळून नवऱ्याचे घर सोडलेल्या; पण न्यायालयात न गेलेल्या महिला यांचे वेगळे राहणे सिद्ध करण्याची पद्धती अजूनही विकसित झालेली नाही.

१ किमी अंतरात चांगली शाळा नसेल तर गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होईल. त्याचप्रमाणे बुद्धिमान विद्यार्थ्यांना एक किमी अंतरातील सुमार दर्जाच्या शाळांना सक्तीने प्रवेश घ्यावा लागेल. यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेला, प्रतिभेला वाव न मिळाल्यामुळे केवळ अशा विद्यार्थ्यांचे नाहीतर समाजाचे व देशाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. त्याचप्रमाणे आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्काची प्रतिपूर्ती राज्य शासनाने वेळेवर न केल्याने आरटीई कायद्याच्या अंमलबजावणीबाबत शाळा/संस्थाचालक उदासीन होत आहेत.

यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी प्रमुख शहरातील नामवंत शाळांचा समावेश आहे. त्यामुळे शासनाची या कायद्याविषयी अनास्था आहे काय, अशी शंका येत आहे. याची गंभीर दखल शासनाने घेतली पाहिजे. १ लाख उत्पन्नाची अट अत्यंत फसवी आहे.



# महागाईचा सांगावा

इराण-इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील युद्ध पश्चिम आशियाच्या प्रदेशात लढले जात असले, तरी त्याचा फटका साऱ्या जगाला बसणार हे स्पष्ट होते; इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने ही झळ आता इतरत्र पोहोचत आहे. सागरी मार्गाने होणाऱ्या एकूण तेलवाहतुकीपैकी २० टक्के वाहतूक जिथून होते, ती सामुद्रधुनी बंद झाल्याने जगाला आता तेलाच्या संकटाला सामोरे जावे लागेल. सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांच्या हत्येनंतर सूडभावनेने पेटलेला इराण अशा प्रकारची कारवाई करू शकतो, ही भीती अखेर खरी ठरली. इराणच्या या कृतीमुळे भारताच्या तेलाच्या आयातीपैकी सुमारे ५० टक्के तेलाचा पुरवठा आटण्याची भीती आहे. पूर्वी महायुद्धाच्या काळात जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, साठेबाजी आणि महागाई यांच्या कहाण्या जुन्या पिढीकडून अनेकांनी ऐकल्या असतील; त्यांची आठवण या निमित्ताने आल्यावाचून राहत नाही. भारताकडे दीड महिना पुरेल, एवढा तेलाचा साठा असल्याने सध्या तरी याबाबत देश 'सुस्थितीत' असल्याचे सरकारने म्हटले आहे; मात्र युद्ध अधिक काळ लांबल्यास हे संकट गहिरे होऊ शकते. त्यातच ट्रम्प यांनी, हे युद्ध दीर्घ काळ चालेल, असे भाकीत वर्तवल्याने त्याचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागणार, असे दिसते.

उलटपक्षी इराणकडून इस्त्रायलसह आखाती देशांवर क्षेपणास्त्रांचा भडिमार सुरू आहे. या हल्ल्यांच्या जोडीने होर्मुझची सामुद्रधुनीही इराणने बंद केली. येथून वाहतूक केल्यास जहाजांना आग लावण्याचाही इशाराही इराणी लष्कराकडून देण्यात आल्याने वाहतूकदारांचे धाबे दणाणले आहे. जगाच्या आर्थिक नाड्या आवळण्यासाठीच इराणने हे दबावतंत्र अवलंबले, हे उघड आहे. ओमानच्या आखातामधून अरबी समुद्राला जोडणाऱ्या मार्गावरील होर्मुझच्या सामुद्रधुनीचा हा चिंचोळा पट्टा जागतिक व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आहे. तो वाहतुकीसाठी बंद झाल्याने तेल पुरवठादार आणि आयातदार अशा दोन्ही बाजूंची अडचण होईल.

सौदी अरेबिया, इराक, कुवेत, बहारीन, संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि खुद्द इराण या प्रमुख उत्पादकांकडून तेलनिर्यात रोखल्यास या देशांची कोंडी होणार आहे; त्यामुळेच कतारने द्रवरूप नैसर्गिक वायूचे उत्पादनही तूर्तास थांबवले आहे. त्याशिवाय या तेलावर अवलंबून असलेल्या भारत, चीन, जपान या देशांपुढे ऊर्जासंकट उभे राहिले आहे. १९८० नंतर हा मार्ग अव्याहत सुरू आहे. काही काळापूर्वी इराणच्या युद्धसरावाच्या निमित्ताने हा मार्ग अंशत: बंद राहिल्याने झालेल्या सहा टक्के दरवाढीमुळे या संकटाची चुणूक दिसून आली होती. होर्मुझच्या मार्गाला तेलवाहिनीसारखे पर्याय पुरेसे नाहीत आणि व्यवहार्यसुद्धा नाहीत. चीननेही हा मार्ग सुरू ठेवण्याचे आवाहन इराणला केले; तसेच ट्रम्प यांनीही तेलवाहतुकीच्या जहाजांना सुरक्षा पुरवण्याचे आश्वासन दिले असले, तरी येथील व्यापार मंदावणार, यात शंका नाही.

भारताच्या इंधनाच्या गरजेपैकी ८५ टक्के तेल आयात केले जाते आणि त्यापैकी ५० टक्के पुरवठा होर्मुझच्या मार्गाने होतो. युद्ध लांबले आणि हा ओघ आटला, तर कच्च्या तेलाचे प्रतिबॅरलचे दर शंभर डॉलरपर्यंत वाढण्याची भीती आहे. त्यामुळे देशात पेट्रोल-डिझेलच्या दरांत वाढ होण्याची शक्यता आहे. इंधनखर्च वाढल्यास वाहतुकीचा खर्च वाढून ही परिस्थिती जीवनावश्यक वस्तूंसह एकूण महागाईला निमित्त ठरते. त्यात साठेबाजी आणि कृत्रिम दरवाढीचीही भर पडण्याची भीती आहे. त्यामुळे परकीय चलनातून होणारा आयातखर्च वाढणार आणि विकासदरावरसुद्धा परिणाम होण्यासारखी संकटे क्रमाने संभवतात.

गेल्या काही काळात भारताने रशिया किंवा अमेरिकेसारखे पर्याय अवलंबून तेलखरेदीमध्ये वैविध्य साधण्याचे प्रयत्न केले असले, तरी अद्याप हे उद्दिष्ट दूर आहे आणि युद्धाने होणाऱ्या परिणामांपासून पूर्णत: दूर राहणे जागतिकीकरणाच्या काळात शक्य नाही. पुरवठा साखळी विस्कळित झाल्याने खतांच्या पुरवठ्यावरही परिणाम होण्याची भीती आहे. दुसरीकडे आखाती देशांमध्ये जाणारी फळे, भाजीपाला; विशेषत: युद्ध लांबल्यास आंब्याची निर्यातही अडचणीत येऊन शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो. रशिया-युक्रेन आणि गाझापट्टीतील युद्धापाठोपाठ सुरू झालेल्या या तिसऱ्या युद्धामध्ये हार-जीत कोणाचीही झाली, तरी जागतिक अर्थव्यवस्थेतील याचे अनर्थ स्पष्ट दिसत आहेत. मात्र, अगदी आत्तापर्यंत अनेक युद्धे थांबवल्याचे दावे करून शांततेचे 'नोबेल' मिळवण्याचे मार्ग खुंटल्यावर आता संपूर्ण जगाला युद्धाच्या खाईत लोटणाऱ्या ट्रम्प महाशयांना रोखणार कोण, हा प्रश्न आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत आघाडीच्या नायिकेला पोलिसांच्या वर्दीत पाहणं हे तसं दुर्मिळच. मात्र आगामी 'सालबर्डी' चित्रपटात ही चौकट मोडत पूजा सावंत एका करारी, निर्भीड आणि तडफदार पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येत आहे. पी.आय. मनोरमा प्रधान असं तिच्या व्यक्तिरेखेचं नाव आहे. नुकताच 'सालबर्डी' या चित्रपटाचा दमदार टिझर आणि कलाकारांचे प्रभावी पोस्टर दिमाखात प्रदर्शित करण्यात आले असून, त्याने प्रेक्षकांची उत्सुकता कमालीची वाढवली आहे.

# करारी पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत पूजा सावंत



मराठी चित्रपटसृष्टीत आघाडीच्या नायिकेला पोलिसांच्या वर्दीत पाहणं हे तसं दुर्मिळच. मात्र आगामी 'सालबर्डी' चित्रपटात ही चौकट मोडत पूजा सावंत एका करारी, निर्भीड आणि तडफदार पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येत आहे. पी.आय.मनोरमा प्रधान असं तिच्या व्यक्तिरेखेचं नाव आहे. नुकताच 'सालबर्डी' या चित्रपटाचा दमदार टिझर आणि कलाकारांचे प्रभावी पोस्टर दिमाखात प्रदर्शित करण्यात आले असून, त्याने प्रेक्षकांची उत्सुकता कमालीची वाढवली आहे. या सोहळ्यात पूजाने डॅशिंग एंट्री घेत आपल्या भूमिकेची झलक दाखवली. पोलिस अधिकाऱ्याच्या व्यक्तिरेखेसाठी तिने विशेष मेहनत घेतली असून, पोलिसांची देहबोली, अधिकारपूर्ण संवादशैली आणि शिस्तबद्ध वर्तन यांचा सखोल अभ्यास करत ही भूमिका पूजाने साकारली आहे. वास्तवदर्शीपणा जपण्यासाठी तिने प्रत्यक्ष पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या कामकाजाचे बारकाईने निरीक्षण केले.

आपल्या भूमिकेबद्दल बोलताना पूजा सांगते, 'वर्दी अंगावर चढताच एक वेगळाच रुबाब आपोआप येतो. तो वेगळा दाखवावा लागत नाही. वर्दीतच एक ताकद असते. माझी ही भूमिका प्रत्येक स्त्रीला प्रेरणा देणारी ठरेल.' चित्रपटातील थरारक स्टंट्स आणि दमदार ॲक्शन सीन्स हे सालबर्डी' चे खास आकर्षण असणार आहेत. येत्या १७ एप्रिलला हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. महाराष्ट्रातील दुर्गम भागात वसलेल्या 'सालबर्डी' गावात घडणाऱ्या रहस्यमय, भयावह आणि अस्वस्थ करणाऱ्या घटनांचा थरारक शोध घेणारा हा चित्रपट नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारण्यात आला आहे. या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून, दिग्दर्शनाची धुरा रमेश साहेबराव चौधरी यांनी सांभाळली आहे.

चित्रपटाचे छायांकन व संकलन सिद्धेश संतोष मोरे यांचे आहे. पटकथा व संवाद रोहित शुक्रे यांचे असून, गुरु ठाकूर आणि मुकुंद भालेराव यांच्या गीतांना पद्मनाभ गायकवाड यांचे संगीत लाभले आहे.

पार्श्वसंगीताची जबाबदारी अमर मोहिले यांनी सांभाळली आहे. अजय गोगावले, जावेद अली आणि आनंदी जोशी यांच्या आवाजाने चित्रपटातील गाणी सजली आहेत.

नृत्यदिग्दर्शन फुलवा खामकर आणि आशीष पाटील यांनी केले आहे. कार्यकारी निर्माते दीपक कुदळे पाटील असून, वेशभूषा प्रणिता चिंदगे, रंगभूषा श्रीनिवास मेनूगे आणि कलादिग्दर्शन प्रदीप गुरव यांचे आहे.

# बहुप्रतीक्षित 'टॉक्सिक'ची रिलीज तारीख पुढे ढकलली




कन्नड स्टार यशच्या बहुचर्चित 'टॉक्सिक: ए फेरी टेल फॉर ग्रोन-अप्स' या चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. जगभर १९ मार्चला प्रदर्शित होणार असल्याची घोषणा करण्यात आलेला हा सिनेमा आता त्या तारखेला थिएटरमध्ये येणार नाही.

'रॉकी भाई'च्या कमबॅकची चार वर्षांपासून रंगलेली चर्चा चाहत्यांना पुन्हा प्रतीक्षा करायला लावणारी ठरली आहे.

**जागतिक तणावाचा फटका**

निर्मात्यांच्या मते, मध्यपूर्वेतील अस्थिर वातावरण आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील तणावाचा परिणाम वितरणावर होण्याची शक्यता आहे. 'टॉक्सिक' हा चित्रपट जागतिक बाजारपेठ डोळ्यासमोर ठेवून तयार करण्यात आला आहे.

कन्नडसोबतच इंग्रजी भाषेतही शूटिंग करण्यात आल्याने परदेशातील प्रदर्शनाला विशेष महत्त्व होते. मात्र सध्याच्या परिस्थितीत जागतिक रिलीज करणे धोकादायक ठरू शकते, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**यशची अधिकृत भूमिका**

सोशल मीडियावर चाहत्यांशी संवाद साधताना यशने स्पष्ट केले की, प्रेक्षक आणि वितरण भागीदारांचे हित लक्षात घेऊन प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. नवीन नियोजनानुसार हा हाय-ऑक्टेन अ?क्शन ड्रामा आता ४ जून २०२६ रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे.

**दमदार स्टारकास्ट**

दिग्दर्शक गीतू मोहनदास यांच्या या चित्रपटात गीतू मोहनदास दिग्दर्शित या चित्रपटात नयनतारा, कियारा अडवाणी, हुमा कुरेशी आणि तारा सुतारिया यांसारखी तगडी कलाकार फळी झळकणार आहे.

# अभिनेत्री सोनल चौहान अडकली दुबईत



अमेरिका आणि इस्त्रायलने मिळून इराणवर हल्ला केला असून मोठा युद्धाचा वणवा पेटला आहे. तिन्ही देशांमध्ये घमासान युद्ध सुरु असून हल्ले-प्रतिहल्ल्यांनी जगभरात खळबळ उडाली आहे. आत्तापर्यंत ८ देशांना या युद्धाची झळ पोहोचली असून आशिया खंडामध्ये युद्धाचे काळे ढग निर्माण झाले आहेत. या युद्धाचा फटका दुबईलाही बसला असून अनेक जण दुबईत अडकले आहेत. अशातच बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री सोनल चौहानही दुबईमध्ये अडकली आहे, तिने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मदत मागितली आहे.

बॉलिवूड अभिनेत्री सोनल चौहान अडकली दुबईत

बॉलीवूड अभिनेत्री सोनल चौहान दुबईमध्ये अडकली आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांनंतर दुबईला जाणाऱ्या विमानांची उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. ज्यामुळे अभिनेत्रीला भारतात परत येणे कठीण झाले आहे. याबाबत तिने इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करत देशाचे पंतप्रधान मोदी यांच्याकडे मदत मागितली आहे.

अभिनेत्रीने भारत सरकार आणि पंतप्रधान मोदींकडून मदतीची विनंती केली आहे. इंस्टाग्रामवर पंतप्रधानांना टॅग अभिनेत्रीने लिहिले आहे की, 'आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, सध्या सुरू असलेल्या संकटात मी दुबईमध्ये अडकली आहे. विमाने रद्द करण्यात आली आहेत

# घरात बनतोय नवीन ग्रुप?



'बिग बॉस मराठी ६'च्या घरात गेल्या रविवारी तीन नवीन सदस्यांनी वाईल्ड कार्ड म्हणून एन्ट्री घेतली. त्यांच्या एन्ट्रीमुळे घरातले वातावरण चांगलेच तापले आहे. या वाईल्ड कार्ड सदस्यांसोबत घरातील काही जुन्या सदस्यांचे वाद होत असतानाच प्राजक्ता शुक्रे मात्र त्यांच्यासोबत नवीन ग्रुप तयार करत आहे. प्राजक्ता, आयुष, करण, सचिन व सागर कारंडे यांचा बाल्कनी ग्रुप होता. मात्र सध्या या पाचजणांपैकी करण, आयुष व सचिन हे घराबाहेर पडले असून फक्त सागर व प्राजक्ता घरात आहेत. अशात प्राजक्ताला टोळी ग्रुपसोबत खेळावे लागत होते. त्यामुळे घरात आलेल्या नवीन वाइल्ड कार्ड एन्ट्रीमुळे प्राजक्ता शुक्रेने तिची रणनीती बदलल्याचे बोलले जात आहे.

आजच्या भागात प्राजक्ता, रेवा आणि संकेत रंगणार आहे. प्राजक्ताचे म्हणणे आहे, मी तुझी चावी घेतली तुला वाईट वाटलं, पण त्यात तुझी देखील चूक आहे त्यावर रेवाचे म्हणणे, मला कुठलाही ग्रुप जॉईन नाही करायचा आहे. आता पण आपण याला ग्रुपचे नाव नं न देता आणि कोणासमोर र्नित् न करता एक काम करू शकतो एकेमकां सोबत उभं राहूया बस प्राजक्ताने त्यावर तिला विचारले, तु अशी व्यक्ती आहेस ना जे बोलशील तेच करशील ?

# बायकोचा संशय खरा ठरला!

गेले काही दिवस साऊथकडील सुपरस्टार विजय थलापती हा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. त्याच्या पत्नीने त्याच्यावर विवाहित असूनही परस्त्रीसोबत प्रेमप्रकरण असल्याचे आरोप केल्याचे म्हटले जाते. ती स्त्री म्हणजे अभिनेत्री त्रिशा कृष्णन असल्याचा अनेकांना संशय होता. अशातच ते दोघं ५ मार्च २०२६ रोजी चेन्नई येथे निर्मात्या कल्पना एस सुरेश आणि मीनाक्षी सुरेश यांच्या मुलाच्या लग्नाच्या रिसेप्शनमध्ये एकत्र दिसले.

लग्नाच्या रिसेप्शनला उपस्थित राहिल्याचा त्यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. डिसेंबर २०२५ मध्ये सुपरस्टार विजयची पत्नी संगीता सोर्नालिंगम यांनी घटस्फोटासाठी अर्ज दाखल केल्यानंतर हा व्हिडिओ समोर आला. तमिळ फिल्म इंडस्ट्रीतील अनेक व्यक्तींनी रिसेप्शनला हजेरी लावली होती, परंतु विजय आणि त्रिशा यांनी एकत्र पोज देऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सोशल मीडियावर अफेअरच्या अफवांमध्ये विजय आणि त्रिशाचा हा व्हायरल व्हिडिओ सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

**चेन्नईच्या रिसेप्शनमध्ये विजय आणि त्रिशा एकत्र**

विजय आणि त्रिशा, यांनी अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे, रिसेप्शनमध्ये दोघेही पारंपारिक पोशाखात खूपच सुंदर दिसत होते. व्हिडिओमध्ये विजय फुलांचा गुच्छ घेऊन उभा आहे, तर अभिनेत्री त्रिशा त्याच्या मागे गाडीतून उतरताना दिसत होती. ते कल्पना सुरेश आणि मीनाक्षीच्या मुलाच्या लग्नाच्या रिसेप्शनमध्ये सहभागी होण्यास गेले होते.

**विजय-संगिता घटस्फोट प्रकरण**

२७ फेब्रुवारी रोजी, संगीताचा घटस्फोट अर्ज सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यामध्ये न्यायालयाला त्यांचे २७ वर्षांचे वैवाहिक जीवन संपवण्याची विनंती करण्यात आली होती. चेंगलपट्टू जिल्हा न्यायालयात दाखल केलेल्या अर्जात तिने घटस्फोट मागण्याची कारणे सविस्तरपणे सांगितली. याचिकेत संगीताने विजयवर विवाहबाह्य संबंध असल्याचा आरोप केला.

याचिकेत असे उघड झाले की संगीताने ऑगस्ट २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान विजयसोबत नोटिस आणि लेटर पाठवले होते जेणेकरुन त्यांच्या संसारात असलेल्या समस्या सोडवल्या जाऊ शकतील. विजय आणि संगीताने १९९८ मध्ये युनायटेड किंग्डममध्ये लग्न केले.

# 'इथेच टाका तंबू' रंगभूमीवर सामाजिक भानाचा ठसा

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठच्या ललित कला केंद्राची पहिली निर्मिती असलेले 'इथेच टाका तंबू' हे दोन अंकी प्रायोगिक नाटक राष्ट्रीय स्तरावर झेपावले आहे. हंडाभर चांदण्या, तो राजहंस एक, कलगीतुरा, दगड आणि माती, गढीवरच्या पोरी यांसारखी अनेक प्रायोगिक नाटके




गाजवल्यानंतर, प्रा. दत्ता पाटील लिखित आणि सचिन शिंदे दिग्दर्शित हे नवे नाटक एका विलक्षण घटनेवर आधारित सामाजिक आशय उलगडते. त्याचे कथासूत्र सांगू नये, तर ते प्रत्यक्ष रंगमंचावर अनुभवावे असे आहे. पत्रकारितेच्या भानातून जन्मलेली ही कथा केवळ एका प्रसंगाची नाही; ती त्या प्रसंगामागील सामाजिक पदर उघडते. सोपी, पण टोकदार भाषा आणि वास्तवाला भिडणारे संवाद हे लेखनाचे वैशिष्ट्य.ओंकार गोवर्धन, अश्विनी कासार, अमेय बर्वे आणि उमेश जगताप यांच्या कसदार अभिनयामुळे नाट्यानुभव अधिक प्रभावी ठरतो. विद्यार्थ्यांच्या सहभागातून साकारलेले नेपथ्य, प्रकाशयोजना आणि तांत्रिक बाजू या प्रयोगाला समर्थ साथ देतात. प्रायोगिक रंगभूमीवर नवा ठसा उमटवणारा हा तंबू खरोखरच 'इथेच' रोवला जावा आणि अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचावा अशीच अपेक्षा!

# 'द ताज स्टोरी' ओटीटीवर होणार प्रदर्शित

गेल्या वर्षी परेश रावल त्यांच्या व्यावसायिक आयुष्यामुळे खूप चर्चेत राहिले. याचं एक कारण म्हणजे त्यांचा 'द ताज स्टोरी' हा चित्रपट. जगातील लोकप्रिय पर्यटन स्थाळांपैकी एक असलेल्या ताज महालावर हा चित्रपट आधारित आहे. परेश रावल यामध्ये मुख्य भूमिकेत आहेत. अशातच आता हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे.

तुषार अमरीश गोइल दिग्दर्शित परेश रावल यांची प्रमुख भूमिका असलेला 'द ताज स्टोरी' हा चित्रपट २५ ऑक्टोबर २०२५ मध्ये चित्रपटगृहात प्रदर्शित झालेला. अशातच आता पूर्ण ४ महिन्यानंतर हा चित्रपट आता ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे, त्यामुळे ज्यांना थिएटरमध्ये हा चित्रपट पाहता आला नाही ते आता घरबसल्या हा चित्रपट पाहू शकतात.

'द ताज स्टोरी' रिलीज झाला तेव्हा या चित्रपटाला प्रोपगेंडा फिल्मही म्हटलं गेलं. एवढंच काय तर चित्रपटात इतिहासाबद्दल उलट सुलट माहिती दिली गेल्याचा आरोपही झाला. 'नवभारत टाइम्स'च्या वृत्तानुसार १२ कोटींचं बजेट असलेल्या या चित्रपटाने देशात फक्त २०.३३ कोटींचा गल्ला जमावला, तर जगभरात या चित्रपटाने २५.३३ कोटींचं कलेक्शन केलं. हा चित्रपट ताजमहाल आणि त्याचा इतिहास याची वेगळी बाजू मांडतो.



**कुठे व कधी पाहायचा 'द ताज स्टोरी'?**

ओटीटी प्लेच्या वृत्तानुसार 'द ताज स्टोरी' याच महिन्यात ओटीटीवर प्रदर्शित होत आहे. येत्या १३ मार्चपासून हा चित्रपट थ्दर्ह्यी ईर्त्व्बिर रिलीज होणार आहे. यामध्ये परेश रावल यांच्याव्यतिरिक्त स्नेहा वाघ, अखिलेंद्र मिश्रा, शिशिर शर्मा आणि बृजेंद्र काला हे कलाकारसुद्धा प्रमुख भूमिकांमध्ये आहेत.

**द ताज स्टोरीची कथा**

'द ताज स्टोरी' या चित्रपटात परेश रावल यांनी विष्णु दास हे पात्र साकारलं असून ते चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहेत. ते एक अनुभवी गाइड असतात, जे तीन दशकांहून अधिक काळ पर्यटकांना ताज महाल दाखवण्याचं काम करत असतात. नशेत असताना खासगी गोष्ट बोलताना ती रेकॉर्ड होते आणि सर्वांपर्यंत पोहचते तेव्हा या चित्रपटात ट्विस्ट येतो. यामध्ये ते ताज महालाच्या इतिहासावर अनेक प्रश्न उपस्थित करतात आणि पूर्वी ते एक हिंदू मंदिर असल्याचा दावा करतात.

विष्णू दास यांच्या लीक झालेल्या या संवादामुळे त्यांच्या सामाजिक नात्यांवर आणि कामावर परिणाम होतो. लोक पर्यटक गाइड म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी संकोच करतात.

यानंतर आपली ओळख पुन्हा मिळवण्यासाठी ते कोर्टात याचिका दाखल करतात. त्यानंतर पुढे चित्रपटात कोर्टरूम ड्रामा पाहायला मिळतो.

# रश्मिकाला मंगळसूत्र घालताना थरथरले विजयचे हात

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील सर्वांत लाडकी जोडी, म्हणजेच अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोडा अखेर विवाहबंधनात अडकले आहेत. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी राजस्थानमधील उदयपूर येथे अत्यंत शाही थाटात आणि पारंपरिक पद्धतीने या दोघांचा विवाहसोहळा पार पडला. गेल्या सात वर्षांपासून ही जोडी एकमेकांना डेट करत होती, मात्र त्यांनी कधीही जाहीरपणे आपल्या नात्याची कबुली दिली नव्हती अखेर लग्नाच्या अवघ्या दोन दिवस आधी सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांना सुखद धक्का देत त्यांनी आपल्या लग्नाची बातमी शेअर केली केवळ जवळचे नातेवाईक आणि मित्रमंडळींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. विशेष म्हणजे, रश्मिका आणि विजय पडद्यावर लग्नबंधनात अडकण्याची ही पहिली वेळ नाही. २०१८ मध्ये 'गीता गोविंदम या सुपरहिट सिनेमाच्या सेटवर या दोघांची पहिली भेट झाली होती. या सिनेमातील त्यांच्या केमिस्ट्रीने प्रेक्षकांना वेड लावले होते. या सिनेमाचा शेवटचा सीन त्यांच्या लग्नावरच चित्रित करण्यात आला होता. मात्र, रंजक गोष्ट अशी की, त्यावेळी तो लग्नाचा सीन शूट करताना विजय देवरकोंडाला काहीसं विचित्र आणि दडपणाखाली असल?यासारखं वाटत होते. कोणाला माहीत होते की, पडद्यावरचं ते 'रील' लग्न एक दिवस उदयपूरच्या शाही थाटात 'रिअल' सम्मात रूपांतरित होईल

उदयपूरच्या शाही विवाह सोहळ्यानंतर अभिनेता विजय देवरकोंडा याने आपल?या लग्नाचे अनुभव आणि रश्मिकाबद्दलच्या भावना अत्यंत मोकळेपणाने व्यक्त केल्या आहेत. विजयने त्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देताना सांगितले की, 'गीता गोविंदम' सिनेमाच्या शूटिंगदरम्यान जेव्हा तो पहिल्यांदा रश्मिकासोबत लग्नाचा सीन शूट करत होता, तेव्हा तो प्रचंड दडपणाखाली होता विजयच्या मते, मंडपात बसणे इथपर्यंत ठीक होते, पण जेव्हा रश्मिकाच्या गळ्यात मंगळसूत्राच्या तीन गाठी बांधायची वेळ आली, तेव्हा तो खरोखरच घाबरला होता. रश्मिका 'पाट्टी' साडीत आणि विजय 'पाट्टू पंचा या पारंपरिक वेशात असल्याने त्याला सर्व काही वास्तव वाटत होते. रश्मिकासाठी ते तिचं तिसरे ऑनस्क्रीन लग्न असल्याने तिला फारसं काही वाटत नव्हतं, पण विजय मात्र कमालीचा अस्वस्थ झाला होता आणि त्याने रश्मिकाला हे सर्व खूप 'विचित्र' वाटत असल्याचेही बोलून दाखवले होते. लग्नानंतर आपल्या भावनांना वाट मोकळी करून देताना किल्यने रश्मिकासाठी एक हृदयस्पर्शी पोस्ट शेअर केली आहे. त्याने लिहिले की, 'एके दिवशी मला तिची इतकी तीव्र आठवण आली की मला जाणवले, जर ती माझ्यासोबत असती तर माझा तो दिवस अधिक सुंदर झाला असता जर ती जवळ असती तर माझ्या जेवणाची चव वाढली असती आणि माझे वर्कआऊटही अधिक जोमाने झाले असते. मला जीवनाच्या प्रत्येक क्षणी फक्त आणि फक्त तिचीच गरज आहे, हे उमजल्यामुळेच मी माझ्या सर्वात चांगल्या मैत्रिणीला आता माझी अर्धांगिनी बनवले आहे. विजयच्या या रोमँटिक पोस्टने चाहत्यांची मने जिंकली असून त्यांच्या या प्रवासाचे सर्वत्र कौतुक होत आहे.रश्मिका हिने देखील भावूक पोस्ट शेअर केली आहे 'आता भेट करून देते माझ्या पतीसोबत.. श्री विजय देवरकोडा! अशी व्यक्ती ज्याने मला खरे प्रेम करणं शिकवलं आहे. असा व्यक्ती ज्याने मला शांतीचा अनुभव करुन दिला आहे.

# 'बोबा टी' आरोग्यासाठी धोकादायक?

तैवानमध्ये प्रथम उगम पावलेला बबल टी किंवा बोबा टी आता हिंदुस्थानातील स्ट्रीट फूडमध्ये प्रवेश करत आहे. त्याच्या रंगीबेरंगी बबल आणि जिभेखाली येणारे टॅपिओका सर्वांनाच आवडत आहेत. परंतु बोबा टी पिल्याने लहान असो किंवा तरुणांमध्ये पचन आणि चयापचय यांसारखे आरोग्य परिणाम होण्याची शक्यता असते. तसेच एका कप कोरड्या टॅपिओका मोत्यांमध्ये ५४४ कॅलरीज असतात. बबल टीचे सर्वात प्रतिष्ठित वैशिष्ट्य म्हणजे टॅपिओका मोतींमुळे सर्वांना आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहे. कसावा वनस्पती नैसर्गिकरित्या मातीतून शिसे आणि कॅडमियम सारख्या जड धातू शोषून घेतात. बोबा टी पिल्यामुळे मळमळ, वेदना आणि क्वचित प्रसंगी पचनसंस्थेत अडथळा देखील येतो. काही बबल टीमध्ये जोडले जाणारे जाडसर ग्वार गम वारंवार सेवन केल्यास शरीरात बद्धकोष्ठता वाढू शकते. विशेषतः लहान मुलांमध्ये हे टॅपिओका मोती गिळल्याने गुदमरण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.



बबल टी पिल्याने या समस्या होण्याची शक्यता

शरीरात साखर आणि चयापचयचे प्रमाण वाढणे बबल टीमध्ये आणखी एक मोठी समस्या म्हणजे टॅपिओका बबल टी मध्ये २०-५० ग्रॅम साखर असते, जी आरोग्यासाठी हानीकारक असते . जे लोक दररोज किंवा आठवड्यातून अनेक वेळा बबल टीचा आनंद घेतात त्यांच्या शरीरात साखरेचे प्रमाण वाढम्याची शक्यता मोठ्या प्रमाणात असते.

**दातांची समस्या**

जास्त साखरेचे सेवन केल्याने दात किडण्यासारख्या समस्या होऊ शकतात. जी मुले नियमितपणे बबल टी पितात त्यांना नऊ वर्षांच्या वयापर्यंत पोकळी निर्माण होण्याची शक्यता जास्त असते. तसेच तरुणांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत ठरणारा एक घटक म्हणून बबल टी. कालांतराने, जास्त साखरेचे सेवन टाइप २ मधुमेह आणि फॅटी लिव्हर रोगाचा धोका देखील वाढवते, जे वारंवार रक्तातील ग्लुकोजच्या वाढीमुळे आणि यकृतामध्ये चरबी साठवण्यामुळे होतात.

**किडनी स्टोन आणि मानसिक आरोग्य समस्या**

बबल टीमधील काही घटक, ज्यामध्ये ऑक्सलेट आणि फॉस्फेटचे प्रमाण जास्त प्रमाणात असते त्यामुळे किडनी स्टोन होण्याचा धोका वाढतो. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये, वारंवार सेवन केल्याने चिंता आणि नैराश्य तसेच थकवा जाणवतो.

# मिल्की पनीर खाण्यास सुरक्षित आहे का?

सोशल मीडिया वरील काही मुद्दे हे फार महत्त्वाचे असतात. केवळ याकडे एक मुद्दा न पाहता जागरुकपणे पाहिल्यास हेही विषय आपल्या कामाचे ठरु शकतात. नुकतेच एक्सवरील एका पोस्टमुळे मिल्की पनीर हे पुनश्च चर्चेत आले आहे. त्यामुळेच आता मिल्की पनीर रोज घेणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एक्सपायरी होण्यास काही दिवस शिल्लक असतानाही ब्रँडच्या दोन वेगवेगळ्या पॅकेटमध्ये फुगवटा दिसत आहे. मिल्की मिस्ट हाय प्रोटीन पनीर एक्सपायरी डेट दोन आठवडे बाकी असतानाही फुगलेले होते. त्यामुळेच एक्सपायरी डेटला दहा दिवस बाकी असतानाही पनीरचे बाह्य आवरण कसे फुगले होते यावर आता चर्चा रंगू लागली आहे. मिल्की मिस्ट पनीरचा असाच अनुभव इतर अनेक ग्राहकांना आल्यामुळे, हा मुद्दा आता सोशल मीडिया वर चांगलाच चर्चिला जाऊ लागला आहे. मिल्की पनीर हे काहीजणांना रबरासारखे लागले त्यामुळे काहींनी हे वापरणे सोडून दिल्याचे प्रतिक्रियांदरम्यान उघड झाले. तसेच हे चक्क्यासारखे दिसत असल्यानेही काहींनी याकडे पाठ फिरवली आहे.

एकूणच काय तर सध्याच्या घडीला मिल्की पनीर संदर्भातील अनेक पोस्ट सोशल मीडियावर दिसते.



# मासिक पाळीत योग करा, पण जपून!

मासिक पाळीच्या काळात योग करावा की नाही, याबाबत अनेक गैरसमज आजही समाजात आहेत. काही जणांच्या मते या दिवसांत पूर्ण विश्रांती घ्यावी आणि कोणतीही शारीरिक हालचाल टाळावी. मात्र तज्ज्ञांचे मत वेगळे आहे. अलीकडील सूचनांनुसार, हलका आणि योग्य प्रकारचा योग पाळीदरम्यान फायदेशीर ठरू शकतो. पाळीच्या वेळी शरीरात हार्मोन्समध्ये मोठे बदल होतात. गर्भाशयाच्या स्नायूंमध्ये आकुंचन-प्रसरण होत असल्यामुळे पोटात दुखणे, कंबरदुखी, थकवा आणि चिडचिड अशी लक्षणे दिसतात. अशावेळी जड व्यायाम टाळणे योग्य असले, तरी सौम्य योगासन शरीराला आराम देऊ शकतात. हलक्या हालचालींमुळे रक्ताभिसरण सुधारते आणि स्नायूंवरील ताण कमी होतो.योगामुळे पोट आणि पाठीच्या खालच्या भागातील स्नायू सैल होतात. त्यामुळे पाळीतील वेदना आणि कळा कमी होऊ शकतात. यासोबतच हार्मोनल बदलांमुळे होणारे मूड स्विंग्स आणि ताणही कमी होण्यास मदत होते. नियमित आणि सौम्य योग केल्यास या दिवसांत शरीराला आवश्यक ऊर्जा मिळते.



तज्ज्ञांच्या मते, पाळीदरम्यान काही विशिष्ट आसने सुरक्षित मानली जातात. **बालासन –** पाठीच्या खालच्या भागातील वेदना कमी करण्यास उपयुक्त. सुप्त **बद्धकोणासन –** पेल्विक भागातील ताण कमी करते. मार्जारीआसन – कंबर आणि पाठीसाठी फायदेशीर, लवचिकता वाढवते. विपरीत करणी – पायातील सूज आणि थकवा कमी करण्यास मदत करते. **शवासन –** मन शांत ठेवण्यासाठी आणि खोल श्वासासाठी उत्तम.

मात्र, काही आसने या काळात टाळणे आवश्यक आहे. विशेषतः डोक्याखाली शरीर उलटे येणारी आसने, जसे शीर्षासन किंवा सर्वांगासन, करू नयेत. अशा इन्व्हर्जन प्रकारातील आसनांमुळे शरीरावर अनावश्यक ताण येऊ शकतो. तसेच रक्तस्त्राव जास्त प्रमाणात होत असेल किंवा वेदना असह्य असतील, तर योग करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. योग करताना काही गोष्टींची काळजी घेणेही महत्त्वाचे आहे. योग नेहमी रिकाम्या पोटी किंवा जेवणानंतर किमान दोन-तीन तासांनी करावा. शरीराला जास्त ताण देऊ नये आणि आपल्या क्षमतेबाहेर जाऊन स्ट्रेचिंग करू नये. प्रत्येक स्त्रीचे शरीर वेगळे असते, त्यामुळे स्वतःच्या प्रकृतीनुसार निर्णय घ्यावा.

# झोपेत पायात मुंग्या येतात?

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेकांना झोपेच्या समस्या जाणवतात. काही जणांना झोपेत अचानक पायांत मुंग्या येतात, जळजळ होते किंवा पाय ओढल्यासारखे वाटते. बरेच लोक हे थकवा, अशक्तपणा किंवा दिवसभराच्या कामामुळे होत असेल असे समजून दुर्लक्ष करतात. पण तज्ज्ञांच्या मते, ही लक्षणे 'रेस्टलेस लेग्स सिंड्रोम' या आजाराची असू शकतात. 'रेस्टलेस लेग्स सिंड्रोम' म्हणजे अशी स्थिती, ज्यामध्ये व्यक्तीला विशेषतः रात्री किंवा विश्रांती घेताना पायांत अस्वस्थता जाणवते. मुंग्या येणे, सुई टोचल्यासारखे भासणे, जडपणा, जळजळ किंवा पाय हलवण्याची तीव्र इच्छा अशी लक्षणे दिसतात. झोपण्याचा प्रयत्न करताना ही समस्या अधिक वाढते.



त्यामुळे व्यक्ती वारंवार उठते, पाय हलवते किंवा फिरते. परिणामी झोप पूर्ण होत नाही. झोप कमी झाल्याने शरीरावर अनेक दुष्परिणाम होतात. थकवा, चिडचिड, एकाग्रता कमी होणे, कामात लक्ष न लागणे अशा तक्रारी वाढतात. दीर्घकाळ झोप न झाल्यास हृदयाच्या आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो. म्हणूनच ही किरकोळ गोष्ट नाही, असे डॉक्टर सांगतात.

हा आजार का होतो, यामागे अनेक कारणे असू शकतात. शरीरात लोहाची कमतरता हे एक प्रमुख कारण मानले जाते. त्याचबरोबर मॅग्नेशियमची कमतरता, नसांमधील समस्या, मधुमेह, मूत्रपिंडाचे आजार किंवा थायरॉईडचे विकार असलेल्या लोकांमध्ये ही समस्या अधिक दिसून येते. जास्त ताणतणाव, कॅफिनचे जास्त सेवन, उशिरापर्यंत मोबाईल किंवा स्क्रीन वापरण्याची सवय यामुळेही ही लक्षणे वाढू शकतात. या समस्येवर काही सोपे उपाय करून आराम मिळवता येऊ शकतो. झोपण्यापूर्वी हलके स्ट्रेचिंग करणे, पायांना मालिश करणे किंवा कोमट पाण्याने पाय धुणे यामुळे स्नायूंना आराम मिळतो. चहा आणि कॉफीचे प्रमाण कमी करणेही फायदेशीर ठरते. आहारात लोहयुक्त पदार्थांचा समावेश करणे महत्त्वाचे आहे. पालक, बीट, गूळ, मसूर डाळ यांसारखे पदार्थ शरीरातील लोहाची पातळी वाढवण्यास मदत करतात.

तरीही समस्या कायम राहत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

योग्य तपासणीनंतरच मूळ कारण समजू शकते. काही वेळा औषधे किंवा पूरक आहाराची गरज भासू शकते. स्वतःहून औषधे घेणे टाळावे. एकूणच, झोपेत पायांत वारंवार मुंग्या येत असतील किंवा अस्वस्थता जाणवत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.

वेळेवर लक्ष दिल्यास आणि जीवनशैलीत बदल केल्यास ही समस्या नियंत्रणात ठेवता येते. चांगली झोप ही निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली आहे, हे लक्षात ठेवा.

# दररोज मालिश केल्याने बाळाची हाडे मजबूत होतात का?

नवजात बाळाला मालिश करण्याची परंपरा आपल्या समाजात खूप जुनी आहे. अनेक घरांमध्ये आजही असा समज आहे की रोज तेलाने मालिश केल्याने बाळ मजबूत होते, त्याचे वजन झपाट्याने वाढते आणि हाडे कणखर बनतात. पण बालरोगतज्ज्ञ यांनी या समजुतींबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांच्या मते, मालिश फायदेशीर असली तरी अनेक गोष्टींबाबत लोकांमध्ये गैरसमज आहेत. डॉक्टर सांगतात की मालिश करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे बाळासोबत जिव्हाळ्याचे नाते तयार करणे. मालिश करताना आई-वडिलांचा स्पर्श, डोळ्यांचा संपर्क आणि संवाद यामुळे बाळाशी भावनिक बंध अधिक मजबूत होतात. तसेच त्वचा मऊ राहते आणि मॉइश्चरायझिंग होते. मात्र काही लोक अतिशय जोरात मालिश करतात, इतके की बाळाच्या हाडांतून आवाज येतो. हे बाळासाठी हानिकारक ठरू शकते. त्यांच्या मते, मालिश केल्याने बाळाच्या हाडांची घनता (बोन डेंसिटी) वाढते किंवा स्नायूंची रचना बदलते, असा कोणताही वैज्ञानिक पुरावा नाही. बाळ मजबूत किंवा कमजोर होणे हे मुख्यतः त्याच्या आनुवंशिक गुणांवर आणि योग्य आहारावर अवलंबून असते. त्यामुळे मालिश न केल्यामुळे बाळ कमजोर राहते, ही भीती चुकीची आहे.



काही लोकांचा असा समज असतो की मालिश केल्याने बाळाच्या डोक्याचा आकार सुधारतो. डॉक्टर स्पष्ट करतात की डोक्याचा आकार विशेष उशी वापरून किंवा मालिश करून बदलत नाही. त्यासाठी बाळाचे झोपण्याचे पोस्चर वेळोवेळी बदलणे अधिक महत्त्वाचे आहे. डोक्यावर दाब देणे टाळावे, कारण बाळाची कवटी खूप नाजूक असते. तसेच, मालिश केल्याने बाळ लवकर बसते, रांगते किंवा चालू लागते, असा समजही चुकीचा आहे.

बाळाचे विकास टप्पे (माइलस्टोन्स) हे त्याच्या आनुवंशिकतेवर आणि त्याला मिळणाऱ्या हालचालीच्या संधींवर अवलंबून असतात. जर बाळ दिवसभर एका जागीच पडून राहिले, तर त्याला हालचाल करण्याची सवय लागणार नाही. पण त्याचा मालिशशी थेट संबंध नाही. वजन वाढण्याबाबतही अनेक गैरसमज आहेत. बाळ बारीक किंवा जाड होणे हे त्याच्या जीन आणि आहारावर ठरते. मालिश करून वजन वाढवता येत नाही. काही बाळांच्या जन्मावेळी पाय वाकडे (बो लेग्स) दिसतात, कारण ते आईच्या पोटात वाकलेल्या अवस्थेत असतात. बाळ चालू लागल्यानंतर काही महिन्यांत पाय आपोआप सरळ होतात. यात मालिशची भूमिका नसते.

मग प्रश्न पडतो की मालिश करावी की नाही? डॉक्टरांच्या मते, नक्कीच करावी; पण चुकीच्या अपेक्षांसाठी नव्हे. मालिशमुळे बाळ रिलॅक्स होते, झोप चांगली लागते आणि आई-वडिलांशी संवाद वाढतो.

योग्य पद्धतीने, हलक्या हाताने आणि प्रेमाने केलेली मालिश बाळासाठी आनंददायी अनुभव ठरू शकते.

# तरूण वयात का होतो संधिवात?

आजच्या काळात 'संधिवात' किंवा 'आर्थरायटिस' हा शब्द उच्चारला की आपल्या डोळ्यासमोर ६० ते ८० वर्षांचे वृद्ध येतात. मात्र, वैद्यकीय क्षेत्रातील बदलती आकडेवारी एक भीतीदायक सत्य समोर आणत आहे. ग्लोबल बर्डन ऑफ डिजीज स्टडी २०१९ च्या एका जागतिक अहवालानुसार, गेल्या दशकात १८ ते ४० वयोगटातील तरुणांमध्ये सांधेदुखीच्या तक्रारींमध्ये तब्बल २०-२५टक्के वाढ झाली आहे. विशेषतः भारतात जिथे बैठी जीवनशैली वाढत आहे, तिथे तरुणांच्या गुडघ्यांचे आणि मणक्याचे आरोग्य दिवसेंदिवस धोक्यात येत आहे.नॅशनल इंस्टिट्यूट ऑफ हेल्थ मधील संशोधनानुसार, शरीरातील 'ऑटो-इम्यून' बदलांमुळे आणि व्हिटॅमिन-डी च्या कमतरतेमुळे हा आजार आता वयाच्या तिशीच्या आतच विळख्यात ओढत आहे.


जेव्हा एक २५ वर्षांच्या मुलाला किंवा मुलीला सांधेदुखीमुळे साधे चालणे किंवा जिने चढणे अशी रोजची साधी कामंही कठीण होऊन बसतात तेव्हा त्या व्यक्तीचे केवळ शारीरिक नुकसान होत नाही तर मानसिक खच्चीकरणही होते. आपल्या भविष्यातील धावपळीच्या स्वप्नांना सांधेदुखीचा ब्रेक लागणे हे अत्यंत वेदनादायी आहे. म्हणूनच, हा आजार नेमका का होतो आणि तो टाळण्यासाठी विज्ञानाने काय निष्कर्ष काढले आहेत हे समजून घेणे काळाची गरज आहे.



अर्थरायटिस हा केवळ एक आजार नसून तो १०० हून अधिक विविध प्रकारच्या सांध्यांच्या विकारांचा एक गट आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर आपल्या शरीरातील दोन हाडे जिथे एकत्र येतात (उदा. गुडघा, कोपर, बोटे), त्या भागाला 'सांधा' म्हणतात. या सांध्यामध्ये 'कार्टिलेज' नावाचा एक मऊ गादीसारखा थर असतो, जो हाडांना एकमेकांवर घासण्यापासून वाचवतो.

# 'थायरॉईडची' ही लक्षणे वेळीच ओळखा

थायरॉईड ही आपल्या गळ्याच्या समोरच्या भागात फुलपाखराच्या आकाराची एक अंतःस्त्रावी ग्रंथी असते. दिसायला ही ग्रंथी छोटी असली तरी ती शरीरात रिमोट कंट्रोलसारखे काम करते. 'अमेरिकन थायरॉईड असोसिएशन'च्या अहवालानुसार, जगभरातील सुमारे १२३लोक त्यांच्या आयुष्यात थायरॉईडच्या समस्येला सामोरे जातात.थायरॉईड संपूर्ण शरीरावर कसा करतो परिणाम-'द लॅन्सेट डायबिटीस अँड एंडोक्राइनोलॉजी'च्या ताज्या संशोधनानुसार, भारतात पुरुषांच्या तुलनेत महिलांमध्ये थायरॉईडचे प्रमाण तिप्पट आहे. ही ग्रंथी 'थायरॉक्सिन'आणि 'ट्रायोडोथायरोनिन'हे हार्मोन्स तयार करते. जे आपल्या हृदयाची गती, शरीराचे तापमान, अन्नाचे ऊर्जेत रूपांतर करण्याची प्रक्रिया नियंत्रित करतात.



जेव्हा या संप्रेरकांचे संतुलन बिघडते, तेव्हा त्याचा परिणाम केवळ शारीरिक ऊर्जेवरच नाही, तर मानसिक आरोग्यावरही होतो. थायरॉईडची समस्या आपल्या शरीराची संपूर्ण लय बदलून टाकते.

थायरॉईड म्हणजे काय आणि त्याचे प्रमुख प्रकार-थायरॉईड ही एक ग्रंथी आहे, आजार नाही; मात्र जेव्हा ती नीट काम करत नाही तेव्हा आजार उद्भवतात. हायपोथायरॉईडीझम : यामध्ये ग्रंथी कमी प्रमाणात हार्मोन्स तयार करते, ज्यामुळे शरीराची क्रिया मंदावते. यामुळे वजन वाढणे, थकवा असे परिणाम दिसतात. थायरॉइड ग्रंथीला शरीराला गरज असलेल्या हार्मोन्सची निर्मिती करता आली नाही तर त्याला 'हायपोथायरॉइडिझम' असे म्हणतात.

जसे की बॅटरी ही सेल्सवर चालते आणि त्यातील सेल संपल्यानंतर जी अवस्था बॅटरीची होते त्याच प्रकारचा हायपोथायरॉइडिझम हा आजार असतो.

हायपरथायरॉईडीझम : यामध्ये ग्रंथी गरजेपेक्षा जास्त हार्मोन्स तयार करते, ज्यामुळे शरीराची क्रिया वेगवान होते जसे की वजन कमी होणे, छातीत धडधडणे हे परिणाम दिसून येतात.

थायरॉइड ग्रंथी गरजेपेक्षा जास्त काम करत असेल तर त्याला 'हायपर थायरॉइडिझम' असे म्हणतात.

# हृदय व किडनीवर ताण?



यकृत हे आपल्या शरीरातील एक असं इंजिन आहे जे रक्तातील विषारी घटक बाहेर काढण्यापासून ते पचनासाठी आवश्यक पित्त तयार करण्यापर्यंत ५०० हून अधिक कामे एकाच वेळी करत असते. मात्र, जेव्हा या लिव्हरच्या पेशींमध्ये अतिरिक्त चरबी साचू लागते तेव्हा त्याला 'फॅटी लिव्हर' असे म्हणतात. धक्कादायक सत्य तर हे आहे की, मद्यपान न करणाऱ्या लोकांमध्ये याचे प्रमाण अधिक वेगाने वाढत आहे.'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च'च्या अहवालानुसार, आपल्या चुकीच्या आहार पद्धतीमुळे यकृत अर्थात लिव्हरवर सूज येऊन ते हळूहळू निकामी होते. लिव्हरचे आजार शेवटपर्यंत वेदना किंवा कोणतीही लक्षणं दाखवत नाही, म्हणूनच लिव्हरच्या आजारांना 'सायलेंट किलर' म्हटले जाते. वेळीच या समस्येकडे लक्ष दिले नाही तर फॅटी लिव्हरचे रूपांतर लिव्हर सोरासिस किंवा कॅन्सरसारख्या गंभीर आजाराचही होऊ शकतेय. त्यामुळे जर भविष्यात निरोगी आयुष्य जगायचं असेल तर लिव्हरवर साचलेल्या चरबीचा थर वेळीच कमी करणे आवश्यक आहे.लिव्हरचे वजन ५टक्के पेक्षा जास्त चरबीने वाढले की त्याला फॅटी लिव्हर म्हणतात. पण हा आजार केवळ यकृतापुरता मर्यादित राहत नाही, फॅटी लिव्हरमुळे शरीरात 'क्रॉनिक इन्फ्लेमेशन' (कायमस्वरूपी सूज) निर्माण होते.

# व्याघ्र प्रकल्पातूनही आपले लक्ष नफेखोरीकडेच?

किशोर जामदार

**पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रालगत 'कोलितमारा संगीत महोत्सव' आयोजित होत असल्याची बातमी वृत्तपत्रात वाचण्यात आली. सदर महोत्सवाची जाहिरात समाजमाध्यमावरही झळकली. या जाहिरातीत पेंच व्याघ्र प्रकल्प आणि एका संस्थेचा आयोजक म्हणून उल्लेख आहे. शिवाय वन विभागाच्या झिरो माइल परिसरात याचे चित्रीकरण झाल्याचाही बातमीत उल्लेख आहे.**

पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रालगत 'कोलितमारा संगीत महोत्सव' आयोजित होत असल्याची बातमी वृत्तपत्रात वाचण्यात आली. सदर महोत्सवाची जाहिरात समाजमाध्यमावरही झळकली. या जाहिरातीत पेंच व्याघ्र प्रकल्प आणि एका संस्थेचा आयोजक म्हणून उल्लेख आहे. शिवाय वन विभागाच्या झिरो माइल परिसरात याचे चित्रीकरण झाल्याचाही बातमीत उल्लेख आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी वन विभागातील 'लोहारडोंगरी' खाण प्रकल्पाचे प्रकरण माध्यमातून आणि समाजमाध्यमातून चर्चिले जात असताना; तसेच उच्च न्यायालयाने स्वत: दखल घेऊन या संदर्भात खटला दाखल करून घेतला असतानाच; मानव-वन्यजीव संघर्ष वाढण्याच्या दृष्टीने संवेदनशील असे हे एक नवीन प्रकरण समोर आले. याआधीही असे अनेक निर्णय शासन घेताना दिसले. पण पर्यावरणप्रेमी नागरिकांच्या सजगतेमुळे आणि ठाम भूमिकेमुळे ते रद्द करावे लागले. चंद्रपूर शहराच्या अगदी जवळ साधारण १५ वर्षांपूर्वी अशीच एक कोळसा खाण ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात येऊ घातली होती. त्यात साधारण दीड लाख मोठे वृक्ष नष्ट होणार होते. पण लोकांनी त्याला कडाडून विरोध केला, तेव्हा ती रद्द करण्यात आली. असा विरोध करणाऱ्यांना 'तुम्ही विकासविरोधी आहात' असे म्हणून नेहमीच हिणवले जाते. या सर्व पार्श्वभूमीवर काही प्रश्न पडतात, एक, व्याघ्र प्रकल्प कशासाठी निर्माण केले गेले? दोन, व्याघ्र प्रकल्प किंवा कोणतेही अभयारण्य हे त्या प्राण्यांच्या संवर्धनासाठी आहेत की पर्यटकांच्या मनोरंजनासाठी? तीन, जंगल महत्त्वाचं की खनिज? विकासासाठी खनिज आवश्यक आहे, असे साधारणपणे लोकांचे म्हणणे असते. पण एकंदर पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी साधारण ३३ टक्के जंगल राखणे आवश्यक आहे. आपल्याकडे ते केवळ २०-२१ टक्केच आहे. म्हणजेच आधीच आपल्याकडे जंगल कमी आहे. हजारो वर्षांत विकसित झालेले जंगल आणि त्याखाली असलेले खनिज यांचा ताळेबंद मांडला तर अर्थातच जंगल राखणे अधिक श्रेयस्कर आहे, असे म्हणावे लागेल. अशा खाणींचा प्रश्न आला की सरकार सांगते की, त्याबदल्यात दुसरीकडे वृक्षारोपण केले जाणार आहे.

लोहार डोंगरीसंदर्भात यवतमाळ जिल्ह्यात वृक्षारोपण करणार असल्याचे सांगितले जात आहे. पण जंगल म्हणजे बगीचा नव्हे. केवळ झाडे लावून जंगल निर्माण होऊ शकत नाही. निसर्ग ज्या पद्धतीने जंगल तयार करतो, ते करणे माणसाला अशक्य आहे. लोहारडोंगरी खाण प्रकल्पासाठी नियोजित जंगलात जाऊन आपण याचा अनुभव घेऊ शकतो. लोह खनिज असलेल्या मोठमोठ्या शिळांमध्ये प्रचंड मोठे वृक्ष उभे असलेले आपल्याला पाहायला मिळतात. हे काम माणूस करूच शकत नाही. हजारो वर्षांत त्या झाडांसोबत जी जैवविविधता निर्माण होते; तो अधिवास अशा वृक्षारोपणाने पुन:स्थापित होऊच शकत नाही. त्यामुळे जंगलाच्या खाली असलेले खनिज सोडून देण्याने विकासाचे जे नुकसान होते, त्यापेक्षा ते जंगल उद्ध्वस्त केल्याने होणारे नुकसान किती तरी पटीने अधिक असते.

आधुनिक भारतात अभयारण्य संकल्पना १९७२ च्या वन्यजीव संरक्षण कायद्यातून आली असली तरी माणसाला त्याच्या उत्क्रांतीच्या प्रवासात बऱ्याच आधी जैवविविधता, तिचे महत्त्व आणि संपूर्ण निसर्गाच्या एकमेकावर अवलंबून असण्याविषयी ज्ञान प्राप्त झाले होते. आणि हे 'आमच्याकडे सर्वच ज्ञान आधीपासून होते' म्हणणाऱ्या पंथासारखे नसून, त्याचे पुरावे आपल्याला आपल्याकडील जीवनशैलीत तसेच साहित्यात सापडतात. आपल्याकडे अनेक वर्षांपासून 'देवराई' ही संकल्पना आणि त्यांचे अस्तित्व आहे. ते दुसरे-तिसरे काहीही नसून जैवविविधता संवर्धनाचाच प्रकार होय. लोक केवळ तज्ज्ञांच्या सांगण्याने ऐकत नाहीत, तर देवाच्या धाकाने ऐकतील, म्हणून 'देवराई'. याशिवाय ज्याचा काहीही संदर्भ माहिती नसला, तरी आपण अनेक वेळा 'जीवो जीवस्य जीवनम्' याचा दाखला देत असतो. हे भागवतातील खालील श्लोकाचे शेवटचे चरण आहे. यात जीवांच्या एकमेकांवर अवलंबून असण्याविषयी चर्चा आहे. अर्थात अन्नसाखळीची चर्चा आहे.

**अहस्तानि सहस्तानामपदानि चतुष्पदाम्।**
**फल्गुणि तत्र महतां जीवो**



**जीवस्य जीवनम् ?**

अर्थात, ज्यांचे हात नाहीत ते हात असलेल्यांचे भक्ष्य बनतात; ज्यांचे पाय नाहीत ते चार पाय असलेल्यांचे भक्ष्य बनतात. दुर्बल हे बलवानांचे अन्न आहेत आणि सामान्य नियम असा आहे की एक प्राणी दुसऱ्याचे अन्न आहे.

यावरून हे स्पष्ट आहे, की माणसाला निसर्गाचे महत्त्व, आणि त्यातील जीवांचे एकमेकांवरील अवलंबित्व फार पूर्वीच ज्ञात झाले होते. याची प्रचीती गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी लोकांशी चर्चा करतानादेखील येते. आपण ज्यांना मागासलेले, अशिक्षित समजतो; त्या आदिवासींमध्ये अशी मान्यता आहे की, 'जंगलाचा मालक अजून जन्माला आला नाही.' याचा अर्थ आम्ही या जंगलाचे केवळ विश्वस्त आहोत. ते आम्हाला त्याच्या मालकाला व्यवस्थित सुपूर्द करायचे आहे. म्हणजेच त्यातील गोष्टींचा टिकाऊ पद्धतीने वापर करायचा. मग पुरातन काळापासून माणसाला हे सर्व ज्ञान असताना आम्ही हा उच्छाद का मांडला आहे? त्याचे साधे सोपे उत्तर गांधीजींनी शतकभरापूर्वीच देऊन ठेवले आहे. ते म्हणत, 'जगात प्रत्येकाच्या गरजेपुरते पुरेसे आहे, पण प्रत्येकाच्या लोभासाठी पुरेसे नाही.' माणसाने आपल्या श्रमाने माकडाचा माणूस होतानापासून, कलेकलेने विकसित होत गेलेल्या आपल्या बुद्धीच्या बळावर निसर्गाचा आपल्या हितासाठी इतर प्राण्यांपेक्षा अधिक उपयोग करून घेतला. कालांतराने तो त्याला निसर्गावर मिळवलेला विजय समजू लागला. इतर प्राणीच काय, पण तो आपल्यातल्याच दुर्बलांवरही हुकमत गाजवून त्यांच्या माध्यमातून आपल्या लालसेपोटी म्हणा, लोभापोटी म्हणा निसर्गाला ओरबाडू लागला.

सरंजामदारी अवस्थेपर्यंत हा लोभ उपभोगाचा होता. माणूस उपभोग घेऊन घेऊन किती घेणार? त्याला काही मर्यादा आहे. निसर्गाच्या क्षमतेपुढे त्याचा उपभोगाचा लोभ थिटा ठरला. त्यामुळे तोवर आजाच्यासारखे असंतुलनाचे प्रश्न निर्माण झाले नाहीत. मात्र सरंजामदारी अवस्था जाऊन उत्क्रांत होत माणूस भांडवली व्यवस्थेत पोहोचला आणि या ओरबाडण्याला मर्यादा राहिली नाही. कारण 'जास्तीत जास्त नफा कमावणे', हाच या व्यवस्थेचा आत्मा राहिला आहे. उपभोगासारखी नफ्याला मर्यादा नाही. त्यामुळे हे निसर्गाला ओरबाडणे अमर्यादपणे सुरू असते. पण जेव्हा अटीतटीची वेळ येते; तेव्हा तेव्हा जागतिक पातळीवर एकत्र बसून यावर उपाय शोधले जातात. त्यातूनच कार्बन क्रेडिट, सीएसआरसारख्या योजना आखल्या जातात. ज्यात अमर्याद नफ्यातून कामावलेल्या पैशाच्याच बळावर जे निसर्गाचं संवर्धन करतात, त्यांना पैसे देऊन आपले अमर्याद ओरबाडणे सुरू ठेवता येते. म्हणजे कोणीतरी निसर्गसंवर्धनासाठी काम करत राहायचं आणि नफा कमावणाऱ्यांनी पैसे फेकून आपला लोभ सुरूच ठेवायचा. ज्यांना पैशाची गरज आहे, ते त्यासाठी हा सौदा मान्य करतात. पण या संवर्धनालाही मर्यादा असते. कधी कधी सामूहिकपणे सर्व नफेखोर लोकांना, जबाबदारी म्हणून ठरावीक शिस्त पाळण्यास बाध्यही केले जाते.

१९९२ साली रिओ द जेनेरीओ येथे झालेली पृथ्वी परिषद ही असाच एक प्रयत्न होता. याशिवाय १९७२ च्या वन्यजीव संवर्धन कायद्यांतर्गत आपल्या देशात अस्तित्वात आलेले विविध प्राण्यांसाठी अभयारण्य तसेच व्याघ्र प्रकल्प हा याच जैवविविधता संवर्धनाच्या गरजेतून निर्माण झालेला निर्णय होता. पण नफ्याची लत माणसाला स्वस्थ बसू देत नाही. तेव्हा याच अभयारण्यात लोकांना पर्यटक म्हणून नेऊन नफा कमावण्याचा नवा मार्ग नफेखोर लोकांनी शोधून काढला. या पर्यटनात नवनवीन गोष्टी आणून त्यातून अधिकाधिक नफा कमावला जाऊ लागला. अभयारण्यात प्रवेश करण्यास फी आकारली जाऊ लागली. फिरण्यासाठी स्वत:ची गाडी नेण्यास बंदी करून, भाडेतत्त्वावर गाड्या आल्या. राहण्यासाठी रिसॉर्ट आले. त्यातही पंचतारांकित रिसॉर्ट आले. २०१० पर्यंत ताडोबा व्याघ्र प्रकल्पाला केवळ सहा गेट होते, ते आता २२ झाले आहेत. म्हणजे जवळपास चौपटीने पर्यटकांची संख्या वाढलेली आहे. इतके करूनही नफा कामावण्याची हाव शमत नाही, म्हणून असे संगीत महोत्सव आले. या सगळ्या उपदव्यापात अभयारण्याचा किंवा व्याघ्र प्रकल्पाचा उद्देश व्याघ्र संवर्धन आहे; याकडे कानाडोळा करण्यात आला. या संगीत महोत्सवामुळे प्राणी बिथरतील आणि त्यामुळे मानव वन्यजीव संघर्ष वाढीस लागेल, हे गौण ठरले. नफा वाढणार असेल तर हे सर्व क्षम्य ठरते.

या संगीत महोत्सवाच्या आयोजकांत प्रत्यक्ष पेंच व्याघ्र प्रकल्पाचे नाव आले आहे. पण प्रकल्पाचे अधिकारी म्हणतात, ''आम्ही हा कार्यक्रम आयोजित केला नाही. पेंच व्याघ्र प्रकल्पाचा याच्याशी काहीही संबंध नाही. आयोजकांना आम्ही तो करू नये, असे निर्देश देत आहोत.'' असेही सदर बातमीत म्हटले आहे. मात्र पेंच प्रशासन आयोजक नाही, तर जाहिरातीत 'पेंच'चा लोगो कसा? वन विभागच्या कार्यालयात या कार्यक्रमाच्या जाहिरातीच्या चित्रीकरणाला परवानगी कशी? आणि हे सर्व विनापरवानगी त्या संस्थेने केले असेल, तर त्यांच्यावर आणि त्यांना वन विभागाच्या कार्यालयात चित्रीकरण करू देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई करणार? असे अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात.

आमचा काही संबंध नाही, म्हणणे ही लोणकढी थाप आहे, यात तिळमात्र शंका नाही.

पर्यावरण

# स्पर्शाची दुनिया सारी

पूजा काळे

स्पर्श म्हणजे जाणीव जागृतींचा काही वेळेसाठी घडलेला सहवास. कळत नकळत होणारा हाताचा हाताशी समेट, शरीराने शरीराला हलकासा दिलेला झोका त्यातून मन पाखरू पाखरू शहारत गेलेला भावनिक गुंतागुंतीचा ओझरता मखमली स्पर्श जणू काही हर्षचं. स्पर्शाला जाणीव आसक्ती जडता भौतिक सुखाच्या मोहमयी ओलाव्याची संवेदनशील छाया असं देखील म्हणता येईल. गरम, मऊ, खरखरीत, ऊबदार या भौतिक संवेदनेत स्पर्शाची सुबक व्याख्या सापडेल. नितळ त्वचेला सुखावणारी संवेदना कधी हवा, पाणी, वस्तूंच्या स्पर्शातून, तर कधी आपुलकी विश्वासाच्या समेवर भावनिक सौम्य स्पर्शाची अनुभुती देईल. सौहार्द प्रेमातून आलेली भावना सहवासायोगे मनाला आधार देत जगण्याची उभारी घेईल. नाजूक शरीराची नाजूक त्वचा स्पर्श संवेदनेचं महत्वाचं अंग असल्याने वरचेवर ते जागृत होईल. मनाला मनाची, सुखाला सुखाची, शरीराला शरीराची कायम ओढ राहील. मानवासाठी स्पर्शाचा अर्था अर्थी संबंध इथून तिथून सारखाचं असल्याने स्पर्शाच्या पहिल्याच पायरीवर असलेला मातेचा उबदार स्पर्श आठवा, जो जगातल्या सर्वोत्तम वेदनेला आश्वासक ऊब देतो. प्रसूती वेदनेनंतर ममत्व जागृती स्पर्शाने आईस पान्हा फुटतो. बाळ जन्मल्यानंतर आईचा परीस स्पर्श झऱ्यागत वाहू लागतो. लोण्यागत मऊशार कुशीतली ऊब हवीहवीशी वाटू लागते. आई म्हणजे ममत्व. आई म्हणजे जगण्याचं एकमेव ठिकाण. विश्वासाचं हक्काचं पान, अशावेळी स्पर्शाची भावना जितकी नाजूक तितकीचं ती संवेदनशील होते. भाव भावनांचे विविधांगी पदर यात अनुभवास येतात. भावनेच्या अत्युच्य अविष्काराकडे मन ओढलं जात.



आयुष्यातला दुसरा माऊली स्पर्श पंढरपूरी विठोबारायाच्या पद स्पर्शाची ओढ लावणारा, भक्तीपुरात दंग करणारा. चराचरात वसलेल्या पांडुरंगाची आस अंतरंग स्पर्शून जावी या प्रतीक्षेत भक्त असतो. ज्ञानामृताच्या स्पर्शासाठी तन मन धन सगळं विसरून जातो. त्यासमयी 'सोहळा पालखीचा नयनी साठवावा, माऊली पदस्पर्श आशीर्वाद घ्यावा' म्हणत अख्खी पंढरी दुमदुमते.

जगण्याच्या असंख्य वाटांवर अनेक स्पर्शांचे कळत नकळत आधार घेत आपण पुढे जात असतो. त्या त्या वेळी ते ते स्पर्श मोलाची कामगिरी करत असतात, जेणेकरून पुढे जाऊन वेदनाही सुखावह होते. 'वेदनेला उमजे, मायेचा पदर... स्पर्शाची भाषा, शब्दातीत सादर.' बऱ्याचं अंशी हे स्पर्श आपण गृहीतचं धरून चालतो. परंतु त्यांना मुकल्यानंतर त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आयुष्यात जाणवू लागते आणि हलक्याशा भावभरल्या स्पर्शासाठी मन आसुसते. तेव्हा काय काय दाटून येतं ठाऊक आहे का? नात्यात पडलेली वजाबाकी आठवते. भाग काढून घातलेला विचित्र गुणाकार साठू लागतो आणि कळू लागत बेरजेचं गणित. 'स्पर्शाची दुनिया सारी, भावार्थ सांगून जाती, स्पर्शाभोवती हळवी, वसती नाजूक नाती...' पुढे स्पर्शाच्या उतरंडीमध्ये वरच्या स्थानावर ज्याची वर्णी लागते तो म्हणजे पारदर्शी मैत्रीचा नितळ आरस्पानी स्पर्श होय. ज्याला स्त्री पुर्‍ष भेदाभेद वय, प्रांत, भाषा अशी कोणतीही भिंत अडवू शकत नाही.


मैत्री करून पाहावी आणि तेवढीचं निभवावी. दुर्बिणीतून न्याहाळावी तशी स्पर्शाची विविध रूपं समोर येऊ लागतात.

स्पर्श नजरेचाही असतो. आश्वासक, आधार देणारा, जपणारा, जोजवणारा, आनंदयात्री, डोळ्यांत आसवं आणणारा, घाबरणारा, घाबरवणारा, किळसवाणा, ओंगळ नजरेचा स्पर्श प्रत्यक्ष शरीर स्पर्शापेक्षाही प्रभावी ठरतो. तान्ह्या बाळाचा स्पर्श हा पृथ्वीतलावरील सर्वात लडीवाळ मुलायम स्पर्श होय.

# मून सिटी

प्रसाद ताम्हनकर

जगातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेल्या आणि टेस्ला, स्पेसएक्ससारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरलेल्या जगप्रसिद्ध कंपन्यांचे मालक इलॉन मस्क यांनी नुकतीच आपल्या पोस्टद्वारे चंद्राबद्दल एक मोठी घोषणा केली आहे. त्यांची स्पेसएक्स ही अंतराळ कंपनी चंद्रावर एक सेल्फ ग्रोइंग सिटी बांधण्याकडे लक्ष केंद्रित करणार आहे. चंद्रावर उपलब्ध असलेल्या संसाधनांचा वापर करून हळूहळू विस्तार करत जाणारे शहर बांधण्याची स्पेसएक्सची योजना आहे. यासंदर्भात कोणताही आराखडा किंवा इतर विस्तृत कल्पना त्यांनी जाहीर केलेली नाही. गेल्या वर्षीपर्यंत स्पेसएक्सचे पूर्ण लक्ष हे मंगळावर केंद्रित होते. मंगळावर मानवी वस्ती उभारण्याच्या दृष्टीने स्पेसएक्स अनेक कल्पनांवर काम करत होती. खुद्द इलॉन मस्क यांनी आमचे लक्ष चंद्रामुळे भरकटणार नसून आम्ही मंगळ हेच प्रमुख उद्दिष्ट ठेवल्याचे गेल्या वर्षीच्या जानेवारीत कबूल केले होते. मात्र अचानक या महिन्याच्या सुरुवातीला त्यांनी स्पेसएक्सच्या गुंतवणूकदारांना यापुढे स्पेसएक्स मंगळाऐवजी चंद्र मोहिमेवर आपले लक्ष आधी केंद्रित करेल असे आश्वासन दिले होते. इलॉन मस्क यांनी अचानक बदललेल्या या निर्णयामुळे सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



बदललेल्या या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर बोलताना इलॉन मस्क म्हणाले की, मंगळावर मानवी वसाहत उभारण्यासाठी २० वर्षांचा कालावधी लागेल, तर चंद्रावर हेच लक्ष आपण १० पेक्षा कमी वर्षांत गाठू शकू. ते सांगतात की, सौर मंडळातील ग्रह एकाच रेषेत येतात, तेव्हाच मंगळाची मोहीम शक्य आहे आणि असा प्रसंग २६ महिन्यांतून एकदा येतो. या प्रवासाला ६ महिन्यांचा कालावधी लागतो. मात्र चंद्रावर आपण दर दहा दिवसांनी मोहीम राबवू शकतो आणि त्याला फक्त २ दिवसांचा प्रवास अवधी लागतो. अर्थात मंगळापेक्षा चंद्रावर मानवी वस्ती उभारणे हे अधिक वेगाने आणि सहजपणे करता येणे शक्य आहे. अनेक नव्या प्रकल्पांच्या घोषणा करणे, त्यांची कालमर्यादा निश्चित करणे आणि नंतर ते प्रकल्प रेंगाळणे हे इलॉन मस्क यांच्या यापूर्वीच्या काही प्रकल्पांच्या बाबतीत अनेकदा घडलेले आहे. त्यामुळे त्यांच्या मून सिटीच्या घोषणेबद्दल अंतराळ विश्वातील तज्ज्ञ सावधपणे प्रतिक्रिया देत आहेत. सरकारी अंतराळ संस्था या अनेक निर्णय सावधपणे आणि सावकाश घेतात. कारण त्या जनतेच्या पैशाने कारभार हाकत असतात. या उलट स्पेसएक्ससारख्या खासगी कंपन्यांवर असे कोणतेही दडपण नसल्याने त्या कोणताही निर्णय अधिक वेगाने आणि विश्वासाने घेऊ शकतात हा त्यांचा सर्वात मोठा फायदा आहे असेदेखील अनेक तज्ज्ञ कबूल करतात. इलॉन मस्क यांनी बघितलेले मून सिटीचे स्वप्न हे फक्त स्वप्न नसून ती खरे तर एक महत्त्वाकांक्षा आहे आणि ती टप्प्याटप्प्याने करत गेलेल्या विकासाने सत्यात अवतरू शकते असेदेखील मन अनेक शास्त्रज्ञांनी व्यक्त केले. मात्र इलॉन मस्क याने निश्चित केलेल्या कालावधीत हे स्वप्न सत्यात उतरणे अवघड असल्याचेदेखील अनेकांना वाटते. या विषयावर व्यक्त होताना अनेक अंतराळ शास्त्रज्ञांनी स्पेसएक्स कंपनीने चंद्राच्या मातीचे, तिथल्या नमुन्यांचे पुन्हा एकदा बारकाईने निरीक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले आहे. चंद्रावर उपलब्ध असलेली संसाधने आपण कशी वापरू शकतो आणि त्यासाठीची लागणारी यंत्रसामुग्री वाहून नेणे आणि चंद्रावर तिची स्थापना करणे हादेखील कळीचा मुद्दा ठरणार आहे.

चंद्रावर तळ स्थापन करणे शक्य झाल्यास त्या अनुभवाच्या आधारावर मंगळावर वस्ती स्थापन करणे अधिक सुलभ जाईल असा विश्वास काही शास्त्रज्ञ व्यक्त करत आहेत. नासाच्या अपोलो १७ या १९७२ साली यशस्वी ठरलेल्या मोहिमेनंतर आजवर कोणीही पुन्हा चंद्रावर पाय ठेवलेला नाही. सध्या जगभरात अनेक खासगी कंपन्या अंतराळ मोहिमांमध्ये स्वारस्य दाखवत आहेत. त्यातच अमेरिका आणि चीन यांच्यात चंद्रावर मानवाला उतरवण्यासाठी मोठी स्पर्धा सुरू असताना मस्क यांच्या या घोषणेने ही स्पर्धा अधिक रंगतदार होणार आहे हे नक्की.

# जीवशास्त्राची नवी वाट

सुजाता बाबर

कमी खर्चातील आणि मुक्तपणे उपलब्ध होणारे फ्लाइटस्कोपसारखे तंत्रज्ञान भविष्यात अंतराळ जीवशास्त्र संशोधनाचा वेग लक्षणीयरीत्या वाढवू शकते. मानवाच्या पृथ्वीबाहेरील वास्तव्यासाठी आवश्यक वैज्ञानिक पाया मजबूत करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. अंतराळ मोहिमा आता केवळ पृथ्वीभोवती फिरणा-या उपग्रहांपुरत्या मर्यादित राहिलेल्या नाहीत. चंद्र आणि मंगळावर मानव मोहिमा पाठविण्याची तयारी जगातील विविध अंतराळ संस्था करत आहेत. मात्र अंतराळातील सर्वात मोठे वैज्ञानिक आव्हान म्हणजे सूक्ष्म पातळीवर सजीव पेशींचे वर्तन पृथ्वीवरील परिस्थितीपेक्षा कसे बदलते हे समजून घेणे. गुरुत्वाकर्षणाचा अभाव म्हणजेच सूक्ष्म गुरुत्वाकर्षण किंवा मायक्रोग्रॅव्हिटी ही अवस्था सजीवांच्या शरीरक्रियांवर खोल परिणाम घडवते. या पार्श्वभूमीवर संशोधकांनी कमी खर्चातील आणि अत्यंत सक्षम असा नवीन सूक्ष्मदर्शक विकसित केला असून तो सूक्ष्म गुरुत्वाकर्षण परिस्थितीत जिवंत पेशींचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यास सक्षम ठरला आहे.



युनायटेड किंग्डममधील न्यूकॅसल विद्यापीठातील संशोधक ॲडम वोलमन यांच्या नेतृत्वाखालील पथकाने विकसित केलेल्या या उपकरणाला 'फ्लाइटस्कोप' असे नाव देण्यात आले आहे. या संशोधनाचे निष्कर्ष सूक्ष्म गुरुत्व संशोधनाशी संबंधित आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रसिद्ध झाले असून ते सॅन फ्रान्सिस्को येथे आयोजित जैवभौतिकशास्त्र परिषदेत सादर करण्यात आले. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर वापरले जाणारे सूक्ष्मदर्शक अत्यंत महाग, गुंतागुंतीचे आणि मर्यादित संशोधकांनाच उपलब्ध असतात. त्यामुळे संशोधनाची व्याप्ती कमी राहाते. या मर्यादेवर मात करण्यासाठी संशोधकांनी आधीच्या सूक्ष्मदर्शक रचनेत सुधारणा करून कमी खर्चातील, मजबूत आणि सहज वापरता येईल असे उपकरण तयार केले. वैज्ञानिक संशोधन अधिक लोकशाही पद्धतीने उपलब्ध व्हावे हा या प्रयत्नामागील प्रमुख उद्देश होता.

फ्लाइटस्कोपची निवड युरोपियन अंतराळ संस्थेच्या पॅराबोलिक उड्डाण म्हणजेच विशेष कमानी मार्गावरील उड्डाण प्रयोगासाठी करण्यात आली. एक खास सुधारित विमान एका तीक्ष्ण चापात उडते, ज्यामुळे सुमारे वीस सेकंद वजनहीनतेची स्थिती निर्माण होते. या उड्डाणांना अनौपचारिकपणे 'व्हॉमिट कॉमेट' असे म्हटले जाते. अशा परिस्थितीत तीव्र कंपन, वेगातील बदल आणि अचानक गुरुत्व परिवर्तनामुळे वैज्ञानिक उपकरणांची कार्यक्षमता टिकवणे अत्यंत कठीण असते. या आव्हानांवर मात करण्यासाठी सूक्ष्मदर्शकाला मजबूत आधाररचना, कंपन नियंत्रक प्रणाली आणि द्रव हाताळणीची विशेष यंत्रणा जोडण्यात आली. म्हणून, प्रत्येक वजनरहित चक्रादरम्यान वेगवेगळे प्रयोग जलद करता आले. संशोधकांनी यीस्ट या सूक्ष्मजीवाचा नमुना म्हणून वापर केला आणि फ्लुरोसंट चिन्हांकित ग्लुकोज पेशींमध्ये कसा प्रवेश करतो याचे प्रत्यक्ष चित्रण केले. निरीक्षणांनुसार सूक्ष्म गुरुत्वाकर्षण अवस्थेत ग्लुकोजचे शोषण पृथ्वीवरील परिस्थितीपेक्षा तुलनेने मंद गतीने होत असल्याचे आढळले. या उपकरणाचा उपयोग केवळ पॅराबोलिक उड्डाणांपुरता मर्यादित नाही. संशोधकांनी ब्रिटनमधील बौल्बी या मीठ खाणीतही त्याचा वापर केला. चंद्र किंवा मंगळावरील प्रतिकूल वातावरणासारख्या परिस्थितीत टिकून राहणा-या आर्किया प्रकारातील सूक्ष्मजीवांचा अभ्यास येथे करण्यात आला.